Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १९० * * नागपूर * गुरुवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

निवडणूक आयोग घेणार वोट जिहादविषयी सल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६:
लोकसभेच्या निवडणुकीत वोट जिहादच्या नावाने विशिष्ट समाजाचे मतदान झाल्याचा आरोप केला जातो आहे. विधानसभेच्या निवडणुकीत वोट जिहाद हा शब्दप्रयोग होण्याची शक्यता आहे.

परंतु, धर्माच्या आधारे मतदान आणि आचारसंहितेचा भंग होतो का, या विषयी महाराष्ट्र राज्य निवडणूक अधिकारी कायदेशीर सल्ला घेऊन धोरण निश्चित करेल. तसेच वोट जिहाद वक्तव्यामुळे आचारसंहितेचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास १०० मिनिटांत कारवाईचा बडगा उगारला जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोकलिंगम आणि सह निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

अग्राग्रलेख

खरीखरी...

जय फुकटेगिरी !

भारतात लोकशाही असे आपण म्हणतो आणि ते खरेही आहे. सध्या महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका लागल्या आहेत. म्हणजेच आपल्या राज्यात लोकशाहीचा उत्सव आहे. या उत्सवापूर्वी गेले महिनाभर महाराष्ट्रात घोषणाच घोषणा होत आहेत. या घोषणा म्हणजे मतदारांना आपण काहीच न करता, काय काय देऊ शकतो. याचा पाढा प्रत्येक पक्ष आणि सरकार वाचत असते. जवळजवळ शंभर वर्षांपूर्वी भारतावर इंग्रजांचे राज्य होते. त्यांच्या काळातही निवडणुका होत असत. पण त्यावेळेचे मतदार श्रीमंत वर्गातील किंवा इतर काही वैशिष्ट्ये असणारे असत. त्याकाळी प्रत्येकाला मतदानाचा अधिकार नव्हता. पण त्यानंतर भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि देशातील प्रत्येकाला मतदानाचा अधिकार मिळाला. महात्मा गांधी म्हणत असत की, देशाचा राष्ट्रपती आणि सामान्य माणसाच्या उत्पन्नात फार जास्त फरक असू नये. पण आता परिस्थिती अशी आहे की, देशातील धनदांडगे जेवढे एका दिवसात कमावतात. तेवढे उत्पन्न एक लाख माणसांचेही नसते. वेगळ्या शब्दात सांगायचे. तर या देशात आजही 80 कोटी लोक दरमहा फुकट धान्य मिळवणारे आहेत. या 80 कोटींपैकी पाच ते दहा टक्के लोक काम खरोखरच न करू शकणारे असतील. पण बाकी सर्व मंडळी धडधाकट आहेत. त्यापैकी काहींची कमाई कमी नाही. पण तरीही त्यांना फुकटचे धान्य मिळते कारण त्यांना हवे असते. म्हणजेच ते गरीब आहेत. या फुकटच्या धान्याच्या भेटीमुळे या देशातील प्रत्येक पक्ष सामान्यजनांना तुम्ही काही काम न करता, आम्ही तुम्हाला काय काय देऊ शकतो याच्या घोषणा करण्यात मग्न आहे. एखादा पक्ष लाडक्या बहिणीला पंधराशे देत असेल तर दुसरा पक्ष दरमहा आम्ही 2000 देऊ, असे आश्वासन देण्यात जराही लाज बाळगत नाही. निवडणूकीच्या ऐन तोंडावर कित्ती कित्ती योजना जाहीर झाल्या. याचा पाढा आम्ही अनेक वेळा वाचला आहे. निवडणूक जाहीर होणार हे माहीत असूनही अगदी त्याच दिवशी मुंबईच्या प्रवेशद्वारावरील (एकूण पाच) जे जे टोलनाके आहेत. त्यांना आता 'फोलनाके' ठरवून विनामूल्य योजनेखाली श्रीमंताच्या चार चाकी गाड्यांनाही टोलमाफी देण्यात आलेली आहे. गरिबाला फुकट दिले, मग श्रीमंताने कोणाचे घोडे मारले. म्हणून त्यांनाही टोल माफी मिळत आहे. आपल्या महाराष्ट्राने देशात सर्वप्रथम रोजगार हमी योजना सुरू केली होती. या योजनेत मागेल त्याला काम आणि त्या कामाचे बऱ्यापैकी दाम मिळायचे. आता सर्व काही फुकट मिळते. मग कशाला काम करायचे. यामुळे अगदी लहान लहान शेतकऱ्यांना सुद्धा गरज पडल्यास कामासाठी गडी किंवा मजूर मिळत नाही. रेवड्या वाटणाऱ्या अशा या अनेक योजनांमुळे बिचारा गरीब शेतकरी दबून पिचून कर्जबाजारी झाला आहे. म्हणजेच कर्ज काढून शेती करा. एखाद्यावेळी पैसा नसला आणि मजूर नसले. त्यामुळे एखादी फवारणी चुकली की पीक हातचे जाते. शेतीमधील गवताला तण म्हणतात. उगवून येणाऱ्या पिकाच्या रांगेमधील अंतराला काकरी असे म्हणतात. त्या काकरीमध्ये तण असते ते काढावे लागते. तेव्हा त्या पिकाची नीट वाढ होते. ते पण खुरप्याने काढण्याच्या कामाला निंदण किंवा भांगलण असे म्हणतात. विशेष म्हणजे आता दिवसेंदिवस या साध्या साध्या कामालाही मजूर मिळत नाहीत आणि मिळाले तर त्यांना कलेक्टर सारखी मजुरी हवी असते. याचे कारण ही फुकटेगिरी आहे. आता ही शोकांतिका म्हणावी काय? कारण याचे दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. मुद्दामहून मजूर मिळू नये. अशी परिस्थिती निर्माण करून शेतकऱ्यांची शेती बड्या बड्या भांडवलदारांच्या घशात घालून, यांत्रिकीकरण करण्यास आणि मोठमोठ्या उद्योगपतीच्या नफ्यात विकासाचे स्वप्न दाखवण्याचे धोरण आखले जात आहे. या व्यवस्थेसाठी कोणा एका पक्षाला जबाबदार धरता येत नाही. याबाबतीत सर्वपक्षसमभाव आहे. राहुल गांधी अदानी आणि अंबानी यांच्या नावाने कितीही बोटे मोडत असले. तरी आपल्या पक्षातील बड्या बड्या नेत्यांना अंबानी पुत्राच्या विवाहात जाण्यापासून रोखू शकले नाहीत. अशा परिस्थितीत एकटे राहुल गांधी तरी काय करणार? कारण तेही या फुकटेगिरीचे मोठे प्रचारक आहेत. सर्वोच्च न्यायालयात हे फुकट वाटप म्हणजे एक प्रकारची लाच आहे, अशा तक्रारी करून अनेक याचिका दाखल झालेल्या आहेत. सरन्यायाधीश चंद्रचूड साहेबांनी या याचिका दाखल करून घेतलेल्या आहेत. अशा पायलीच्या 50 याचिका दररोज दाखल होतात. कोळशाने चालणाऱ्या पूर्वीच्या पॅसेंजर गाड्यांप्रमाणे या याचिका वर्षानुवर्ष पडून राहतात, याचिकाकर्ते सडून राहतात आणि पुढारी मंडळी आनंदात बुडून राहतात. आजपर्यंत साध्या साध्या याचिकांचा निकालही लागलेला नाही. खरी शिवसेना आणि राष्ट्रवादी कोणती? याचा संभ्रम आजही कायम आहे. किती आमदार पात्र आणि किती आमदार अपात्र? हेही गुलदस्त्यातच आहे आणि मस्त फुकटेगिरी सुरू आहे. आता खालपासून वरपर्यंत 'कर्ज काढा आणि फुकट वाढा' हाच आपल्या सरकारचा एका मात्र नारा आहे. जर असलाच तर, या देशाचा ईश्वरही यात कोणताही बदल करु शकणार नाही. ही दगडावरची नव्हे किंवा सिमेंटच्या रस्त्यावरची भेग नसून कधीच न मिटणारी रेघ आहे. जय फुकटेगिरी, आळशीपणाचा विजय असो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

मुख्यमंत्र्यांनी मांडला लेखाजोखा..

आम्ही बोलतो ते करतो!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६:
महायुतीमधील प्रमुख नेत्यांनी आज १६ ऑक्टोबर रोजी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारच्या मागील अडीच वर्षांच्या कारभाराचा लेखाजोखा मांडला. यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी एकनाथ शिंदे यांना मराठा आरक्षणाचा तिढा आणि मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाविषयी प्रश्न विचारला.

त्यावर ते म्हणाले, आमचं सरकार मराठा समाजाला आरक्षण देणार. या पत्रकार परिषदेत शिंदे यांना विचारण्यात आलं की महायुतीसमोर सध्या मनोज जरांगे यांचं मोठं आव्हान उभं आहे. आचारसंहिता लागू होईपर्यंत मराठा आरक्षणाचा निकाल लागला नाही तर आम्ही वेगळा निर्णय घेऊ अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली होती. त्यामुळे निवडणुकीत महायुतीला मनोज जरांगे यांच्यामुळे मोठा फटका बसू शकतो का? यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आम्ही बोलतो ते करतो. आम्ही मराठा समाजाला आरक्षण देणार आहोत. ओबीसी समाजाला किंवा इतर कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्ही मराठा समाजाला आरक्षण देणार.

एकनाथ शिंदे म्हणाले, मी भर दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायाची शपथ घेतली, त्यानंतर ताबडतोब विधानसभेचं अधिवेशन बोलावलं आणि मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलं. परंतु, ते आरक्षण रद्द करण्यासाठी न्यायालयात कोण गेलं हे सर्वांना माहिती आहे.

त्या आरक्षणाविरोधातील याचिकाकर्ते कोण आहेत ते सर्वांना माहिती आहे. तरीदेखील आम्ही ते आरक्षण टिकवलं. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने देखील मराठा समाजाला आरक्षण दिलं होतं. मात्र, महाविकास आघाडीने ते आरक्षण घालवलं. सर्वोच्च न्यायालयात त्या आरक्षणासाठी भक्कम बाजू मांडायला हवी होती, त्यासाठी पुरावे मांडायला हवे होते. मात्र, ते सरकार अपयशी ठरलंह्व.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा मनोज जरांगे पाटलांना सल्ला

मुख्यमंत्री म्हणाले, ह्लमराठा समाजाला न्याय मिळावा यासाठी मनोज जरांगे पाटील रस्त्यावर उतरले. पण, त्यांनी हा विचार करावा की महायुतीने मराठा समाजासाठी काय काय केलं? या सरकारने मराठा समाजाला काय-काय दिलं ते देखील पाहावं. सारथी संस्थेला निधी दिला, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला भरघोस निधी दिला. एक लाख तरुणांना उद्योग उभारून दिले.

आता ओबीसींप्रमाणे मराठा समाजालाही सवलती मिळत आहेत. हे सगळं कोणी केली. मात्र, ज्यांनी मराठा समाजासाठी काहीच केलं नाही, ज्यांनी केवळ समाजाचा वापर केला, ज्यांना समाजातील लोकांना वंचित ठेवलं, त्यांच्याबद्दल विचार करावा. देणारा कोण आणि फसवणारा कोण याचा निर्णय घ्यावा, असेही ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांचे शरद पवारांना आव्हान

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६:
आज महायुतीने पत्रकार परिषद घेऊन त्यांचं रिपोर्टकार्ड सादर केलं. आम्हाला महाराष्ट्राचा विकास करायचा आहे, खुर्ची हे आमचं लक्ष्य नाही असंही एकनाथ शिंदे म्हणाले. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंखनाद या एका शब्दाने एक्स पोस्ट केली होती. राज्यात निवडणुकींचा शंखनाद झालाय, असं त्यांना म्हणायचं होतं.

आजच्या पत्रकार परिषदेला संबोधित करताना त्यांनी विरोधकांवर टीका केली. ते म्हणाले, निवडणुकीचा शंखनाद झालाय. अर्थात आमच्याकरता शंखनाद झाला आहे असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

महायुतीचं रिपोर्ट कार्ड सादर करण्यात आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट शरद पवारांना आव्हान दिलं आहे. फडणवीस म्हणाले, सत्ता पक्षाला कुठलीही चिंता नाही. मुख्यमंत्री स्वतःच इथे आमच्याबरोबर बसले आहेत. त्यांना विचारा तुमचा चेहरा कोण. माझं शरद पवारांना खुलं आव्हान आहे शरद पवारांनी तुमचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण ते सांगा?

देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिल्यानंतर एकनाथ शिंदे म्हणाले, आमच्याकडे कुणालाही मुख्यमंत्री होण्याचे डोहाळे लागलेले नाहीत. आमचं काम हाच आमचा चेहरा आहे. महाविकास आघाडीने आता विरोधी पक्षनेत्याचा चेहरा ठरवावा, असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला. आम्ही अगदी अंतिम टप्प्यावर आहोत. या सगळ्यात आम्ही साधारणपणे कुठल्या पक्षाचा कुठे जोर आहे? तीन पक्ष मिळून कुठे जिंकता येईल? या सगळ्या गोष्टी सांगू. फॉम्युर्ला असा मध्येच सांगता येणार नाही. सगळं ठरलं की आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

ओमर अब्दुल्ला जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. १६:
नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसने मिळून जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक लढवली होती. आघाडीला बहुमत मिळाले. मात्र आता सरकार स्थापन झाले तर काँग्रेस बाहेर आहे. आज म्हणजेच १६ ऑक्टोबर रोजी ओमर अब्दुल्ला यांनी जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

त्यांच्यासोबत नॅशनल कॉन्फरन्सचे चार आमदार आणि अपक्ष आमदार सतीश शर्मा यांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली. जोपर्यंत जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा मिळत नाही, तोपर्यंत त्यांचा एकही आमदार मंत्री होणार नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे.

जम्मू-काश्मीर सध्या केंद्रशासित प्रदेश आहे. 2019 च्या जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायद्यानुसार, मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांची संख्या एकूण आमदारांच्या 10% पेक्षा जास्त असू शकत नाही.

जम्मू-काश्मीर विधानसभेत 90 आमदार आहेत. उपराज्यपालांनी नामनिर्देशित आणखी 5 आमदार जोडले तर एकूण मंत्रिमंडळ सदस्यांची संख्या फक्त 95 होऊ शकते. त्यामुळे जम्मू-काश्मीर सरकारमध्ये मुख्यमंत्र्यांव्यतिरिक्त फक्त 9 मंत्री शपथ घेऊ शकतात. आज ओमर अब्दुल्लांचा शपथविधी पार पडला.

मुख्यमंत्र्यांनी रेटकार्डवर बोलावे... पटोले यांचा टोला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६:
कटकारस्थान, बेईमानी आणि असंवैधानिक मागार्ने सत्तेत आलेल्या एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील खोके सरकारने पत्रकार परिषदेत केलेले विकासाचे सर्व दावे खोटे तसेच बनावट असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

काँग्रेस सरकारच्या काळात महाराष्ट्र सर्वच आघाड्यांवर नंबर एक होता. पण फडणवीसांच्या काळात तसेच शिंदे सरकारच्या काळात महाराष्ट्राची अधोगती झाली हे उघड सत्य आहे. आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राची गुजरातच्या हस्तकांनी मागील दोन वर्षात मात्र पुरती वाट लावली. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रिपोर्टकार्ड वर बोलणे हास्यास्पद असल्याने त्यांनी रेटकार्डवर बोलले पाहिजे, असा टोला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी लगावला.

महायुतीच्या नेत्यांनी आज पत्रकार परिषदेत सरकारच्या गेल्या दोन वर्षातील कामाची माहिती देणारे रिपोर्ट कार्ड प्रकशित केले. या रिपोर्ट कार्डमध्ये केलेल्या दाव्यांची पोलखोल करताना नाना पटोले म्हणाले, या सरकारने दोन वर्षात मोदी-शाह यांच्या आदेशाने महाराष्ट्राला लुटण्याचे काम केले. महाराष्ट्र हे मोदी शाह यांच्यासाठी फक्त एटीएम असल्याचेही ते म्हणाले.

दगडाने ठेचून हत्या

■ महासागर प्रतिनिधी
वाडी/ नागपूर, दि. १६:
येथील लाव्हा खडगाव मार्गाच्या ५०० मिटर बाहेरील भागात सुभाष गुलाब बोरकर (वय ५५) रा. वाडी यांच्या डोक्यावर दगड घालून हत्या केल्याची घटना मंगळवारच्या रात्री ११ वाजता घडली. परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार बुधवार १६ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास वाडी पोलीस ठाण्याला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह मिळाल्याची माहिती मिळताच वाडी पोलीसांनी घटनेचा पंचनामा केला. सुभाषच्या कुटुंबीयांनी सांगितले की, तो मंगळवारी रात्री १०.३० वाजता पासून बेपत्ता होता आणि तो फोनही उचलत नव्हता.सुभाषला तीन मुले असून तो अनेक दिवसांपासून दारू विक्रीचा व्यवसाय करत होता.

घटनास्थळी डी.सी.पी लोहित मतानी, एसीपी सतीश गुरव, पोलीस निरीक्षक राजेश तटकरे पोहचून पुढील तपास करीत आहे. अवैध दारू विक्रीमुळे किंवा पैसाच्या देवाणघेवाण मुळे खून झाल्याचे नागरीकांचे म्हणणे आहे. घटनास्थळी सीसीटीव्ही असल्याची माहिती असूनही आरोपी अद्याप फरार असल्याचे समजते.

३ दिवसांत १९ विमानांना बॉम्बची धमकी

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १६:
इंडियन एअरलाइन्सच्या आणखी सात विमानांना बुधवारी बॉम्बच्या धमक्या मिळाल्या. यामध्ये इंडिगोच्या चार, स्पाइसजेटच्या २ आणि अकासाच्या एका फ्लाइटचा समावेश आहे.

गेल्या ३ दिवसांत १९ विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. १५ ऑक्टोबर रोजी ७ फ्लाइट्सवर बॉम्बच्या धमक्या आल्या होत्या. दिल्ली ते शिकागो या एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाचाही या उड्डाणांमध्ये समावेश होता. त्याला कॅनडाला वळवण्यात आले आणि इक्लुइट विमानतळावर उतरवण्यात आले.

तपासादरम्यान या विमानांमध्ये बॉम्ब असल्याच्या बातम्या खोट्या असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, सर्व विमानतळांवर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. सततच्या धमक्यांमुळे केंद्राने बुधवारी उड्डाणांवर एअर मार्शलची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय घेतला. ते विमानात साध्या कपड्यातच राहतील. याशिवाय गृह मंत्रालयाने विमान वाहतूक मंत्रालयाकडून अहवाल मागवल्याची माहिती आहे.

न्यायमूर्तींनी लंडनमध्ये ४०० कोटींचा व्हिला खरेदी केला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १६:
महाराष्ट्रातील घटनाबाह्य सरकार वाचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींवर दबाव होता असा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. इतकेच नाही तर एका न्यायमूर्तींनी आणि त्यांच्या कुटुंबाने लंडमध्ये ४०० कोटी रुपयांचा बंगला खरेदी केला आहे. आणि त्यासाठी कोणाच्या पैशांचा वापर झाला हे मी लवकरच जाहीर करणार असल्याचा गंभीर इशारा देखील त्यांनी दिला आहे.

सर्वोच्च न्यायावरती कमलीचा दबाव असू शकतो. निवडणुका जाहीर झाल्या असल्या तरी आमदार अपात्रेसंदर्भात न्यायालय निर्णय घेणार नसेल तर, हे घटनाबाह्य सरकारला न्यायालयाने समर्थन असल्याचे दिसून येत, असे राऊत म्हणाले.

शिंगणे शरद पवार गटात?

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १६:
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसला आणखी एक जबरदस्त झटका बसण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादीचे सिंदखेड राजाचे आमदार राजेंद्र शिंगणे यांनी बुधवारी उघडपणे आपली शरद पवार गटात जाण्याची इच्छा असल्याचे स्पष्ट केले. शरद पवार गटात जायचे तर मी उघडपणे जाईल. त्यासाठी मी फाईलने तोंड लपवणार नाही. पण मी तुतारी चिन्हावर निवडणूक लढवावी ही आमच्या ९५ टक्के कार्यकर्त्यांची इच्छा आहे, असे ते म्हणालेत.

राजेंद्र शिंगणे यांनी बुधवारी आपल्या मतदारसंघातील कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेतल्या. यावेळी बोलताना त्यांनी उपरोक्त मत प्रकट केले. ते म्हणाले, मी १९९५ पासून राजकारणात आहे. त्यापूर्वी माझे वडील व शरद पवारांचे चांगले संबंध होते. सध्या मी अजित पवार यांच्या पक्षात आहे. पण आगामी निवडणूक मी शरद पवार यांच्या गटाच्या तुतारी चिन्हावर लढावी अशी ९५ टक्के कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्यानुसार पुढील २ दिवस मी मतदारसंघाचा दौरा करून सर्व कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेईन. त्यानंतर २ दिवसांनी माझा निर्णय जाहीर करेन.

भाजप कापणार आमदारांसह काही मंत्र्यांची तिकिटे?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :
मराठा ओबीसी आरक्षण, कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, महिलांवरील अत्याचार व इतर समस्यांमुळे सरकारविरोधात राज्यात तीव्र रोष आहे. लोकसभेला त्याचा फटका महायुतीला बसला. विधानसभेला त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून भाजपने आपल्यापैकी सुमारे २५ ते ३० निष्क्रिय आमदारांची तिकिटे कापण्याचा निर्णय घेतल्याची खात्रीलायक माहिती आहे.

यात काही मंत्र्यांचा समावेश असेल. ३ टर्मपेक्षा जास्त काळ आमदार राहिलेले व अंतर्गत सर्वेक्षणात ज्यांच्याबद्दल मतदारांनी नकारात्मक मत नोंदवले आहे. अशा आमदारांना पुन्हा उमेदवारी न देण्याचा निर्णय भाजपने घेतला असल्याची माहिती पक्षातील खात्रीलायक सूत्रांनी दिली.

मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणाचा पॅटर्न महाराष्ट्रातही राबविण्याची दाट शक्यता

मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणातही भाजप सरकारविरोधात अंटी इन्कम्बन्सी होती. त्याचा विरोधकांना फायदा होऊ न देण्यासाठी भाजपने सातत्याने निवडून येणारे आपल्याच पक्षाचे उमेदवार बदलले, मुख्यमंत्रिपदासाठीही नवीन चेहरा दिला. त्यामुळे जनतेचा रोष कमी होऊन नष्या चेहऱ्यांना संधी देण्याची भूमिका मतदारांनी घेतली.

हरियाणात नुकत्याचा विधानसभेच्या निवडणुका झाल्या. तिथेही भाजपने ४० पैकी १४ आमदारांची तिकिटे कापली होती. त्यापैकी १० जागा पक्षाने पुन्हा जिंकल्या, मुख्यमंत्र्यांसा दोन विद्यमान आमदारांचे मतदारसंघाती बदलले. त्यापैकी मुख्यमंत्र्यांची जागा निवडून आली. आता हा बदलाबदलीचा प्रयोग महाराष्ट्रातही होणार आहे. २०१९ मध्येही भाजपने विनोद तावडे, प्रकाश मेहता, चंद्रशेखर बावनकुळे यासारख्या दमाज मंत्र्यांचेही तिकीट कापले होते.

दरम्यान, भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीची बुधवारी दिल्लीत बैठक होणार आहे. त्यात पहिली यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. यात विद्यमान आमदारांचा समावेश आहे.

मित्रपक्षांचा मात्र नकार

ॲन्टी इन्कम्बन्सी कमी करण्यासाठी आपल्या मित्रपक्षांनीही निष्क्रिय उमेदवारांची तिकिटे रद करून तिथे नवे चेहरे द्यावेत, यासाठी भाजप आग्रही आहे.

आता उमेदवार निवडीत भाजपचा हस्तक्षेप सहन करण्यास मित्रपक्षांनी स्पष्ट नकार दिला आहे. आमचे उमेदवार आम्हाला ठरवू द्या, बंडात साथ देणाऱ्यांची तिकिटे आम्ही कापणार नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिदि व अजितदादांनी भाजपला सुनावले. त्यामुळे त्यांच्या आमदारांची तिकिटे मात्र भाजपाला कापता येणार नाहीत. स्वतःच्या पक्षातील अनेकांना मात्र भाजप नारळ देण्याच्या तयारीत असल्याचे समजते.

पाच कोटींची रक्कम पळवली

■ वृत्तसंस्था, सातारा, दि. १६:
पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील कराडजवळच्या मलकापूर हद्दीत शस्त्राच्या धाकाने कारमधील पाच कोटींची रक्कम लुटल्याची घटना पहाटे घडली. सदरची रक्कम ही व्यापाऱ्याची असून ती मुंबईहून दक्षिण भारतात हवाला मार्फत नेली जात होती, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेमुळे सातारा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून पोलिसांनी संशयितांची धरपकड सुरू केली आहे.

हवाला मार्फत पैसे पोचविणाऱ्या कंपनीचा कारभार दक्षिण भारतातील एका मोठ्या शहरातून चालतो. सुमारे पाच कोटींची रक्कम घेऊन मुंबईहून दक्षिण भारतात निघाली होती. मंगळवारी पहाटे पाचच्या सुमारास कार कराडमध्ये आल्यानंतर मलकापूर हद्दीत कारला दुसरे वाहन आडवे रक्कम लुटण्यात आल्याची माहिती आहे.

परतीच्या पावसामुळे उरणमधील शेतीचे नुकसान

कृषी विभागाने पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी

उरण, दि. १६ : प्रतिनिधी

गेल्या आठवडा भर सायंकाळी सुरू असलेल्या परतीच्या पावसामुळे पिकलेली भात पिके जमीनीवर आणि पावसात कोसळून कुजू लागल्याने उरण मधील शेतकऱ्यांच्यता हाता तोंडाशी आलेल्या पिकांचे नुकसान होत आहे. या शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्याची मागणी चिरनेर येथील शेतकऱ्यांनी तालुका कृषी विभागाकडे केली आहे.

उरणमध्ये परतीचा पाऊस हा विजेच्या कडकडाटसह सुरू झाला आहे. त्यामुळे याचा नागरिकांना फटका बसत आहे. मात्र या पावसाने शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. यावर्षी ऑगस्ट महिन्यात सलग पंधरा दिवस पावसाचा खंड पडला होता. त्यामुळे उरण मधील शेकडो हेक्टर जमिनीवरील भातपिके संकटात आली होती. मात्र त्यानंतर जोरदार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे भात शेतीत पाणी वाढल्याने भात पिकांना संजीवनी मिळाली होती. त्यामुळे उरण तालुक्यातील नागाव,केगाव,चाणजे व खोपटे,कोप्रोली, चिरनेर, विंधणे, रानसई, वशेणी, पूनाडे, आवरे पाले, पिरकोन, वेश्वी, गोवठणे, बोरखार आदी गावात भात शेतीचे पीक घेणारे शेतकरी आनंदले होते.

उरण तालुक्यात साधारण २ हजार ५०० हेक्टर पेक्षा अधिक भात क्षेत्र आहे. यातील बहुतांशी शेती ही खाडी किनाऱ्यावर आहेत. त्यातच यातील शेतीचा वापर हा उद्योग आणि रस्ते तसेच इतर विकास कामासाठी केला जात असल्याने पिकत्या शेतीचे क्षेत्र कमी झाले आहे. मात्र जेथे शेती होत आहे, तेथे पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकरी संकटात आला आहे. सध्या परतीच्या पावसाने कहर केला आहे. दररोज सायंकाळी वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे भात पीके आडवी पडून पाण्याखाली येऊ लागली आहेत. परिणामी ती कुजून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे ४० टक्के नुकसान झाले असून यात भर पडण्याची शक्यता आहे. या नुकसानीचे कृषी विभागाने लवकरात लवकर पंचनामे सुरू करण्याची मागणी केल्याची माहिती चिरनेर येथील शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी दिली आहे.

शेतकरी संकटात

उरण तालुक्यात साधारण २ हजार ५०० हेक्टर पेक्षा अधिक भात क्षेत्र आहे. यातील बहुतांशी शेती ही खाडी किनाऱ्यावर आहेत. त्यातच यातील शेतीचा वापर हा उद्योग आणि रस्ते तसेच इतर विकास कामासाठी केला जात असल्याने पिकत्या शेतीचे क्षेत्र कमी झाले आहे. मात्र जेथे शेती होत आहे, तेथे पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकरी संकटात आला आहे.

संपूर्ण पुणे शहराचा पाणीपुरवठा उद्या राहणार बंद

पुणे, दि. १६ : प्रतिनिधी

पुणे शहराला पणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला जॅकवेल, नवीन, जुने पर्वती जलशुध्दीकरण केंद्र, लष्कर, वडगाव, वारजे, एसएनडीटी जलशुद्धीकरण केंद्र तसेच भामा आसखेड प्रकल्प अंतर्गत पाणी पुरवठा होणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत विषयक तसेच देखभाल दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. या कामामुळे संपूर्ण पुणे शहर तसेच उपनगरांचा पाणीपुरवठा येत्या गुरुवारी (१७ ऑक्टोबरला) पूर्ण दिवस बंद राहणार आहे.

या देखभाल दुरुस्तीच्या कामामुळे दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (१८ ऑक्टोबरला) उशीरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. तरी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी केले आहे. जलशद्धीकरण केंद्रातील कामे एका दिवसातच पूर्ण करण्याचा प्रयत्न पालिकेचा असल्याचे पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

पाणीपुरवठा बंद असलेला पर्वती जलकेंद्रातील भाग पुढील प्रमाणे...

शहरातील सर्व पेठा, दत्तवाडी परीसर, रोहन कृतिका, राजेंद्रनगर, लोकमान्य नगर, डेक्कन परिसर, शिवाजीनगर परिसर, स्वारगेट परिसर, सहकार नगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणी नगर, लेक टाऊन, शिवतेजनगर, अप्पर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, महेश सोसायटी, बिबवेवाडी गावठाण, प्रेमनगर, आंबेडकरनगर डायस प्लॉट, सॅलेसबरी पार्क, ठाकरे वसाहत, पर्वती गावठाण, मिठानगर, शिवनेरी नगर, भाग्योदय नगर, कोंढवा खुर्द, पर्वती दर्शन, तळजाई, कात्रज परीसर, धनकवडी परीसर, गुरुवार पेठ, बुधवार पेठ, काशेवाडी, क्वार्टरगेट परिसर, गंज पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहिया नगर, सोमवार पेठ, अरुण वैद्य स्टेडीयम परिसर, घोरपडे पेठ

लष्कर जलकेंद्र अंतर्गत पाणी पुरवठा बंद असणारा भाग : हडपसर परिसर, सातववाडी, ससाणे नगर, काळे पडळ, बी.टी-कवडे रोड, भीमनगर, कोरेगाव पार्क, रामटेकडी इंडस्ट्रीयल एरिया, वानवडी, जगताप चौक परिसर, जांभूळकर मळा, काळेपडळ, हांडेवाडी रोड, महमदवाडी गाव, कोंढवा खुर्द, कोंढवा गावठाण, मिठानगर, भाग्योदय नगर, लुल्लानगर, पुणे कॅन्टोनमेंट बोर्ड, केशवनगर, साडेसतरा नळी, फुरसुंगी, उरुळी देवाची, मांजरी, शेवाळवाडी, खराडी, वडगाव शेरी, संपूर्ण ताडीवाला रोड, मंगळवार पेठ, मालधक्का रोड, येरवडा गाव, एनआयतीएम रोड, रेसकोर्स, लोहगाव, विमाननगर, वडगाव शेरी, कल्याणीनगर, विश्रांतवाडी, फुलेनगर, येरवडा

वडगाव जलकेंद्र परीसर : हिंगणे, आनंदनगर, वडगाव, धायरी, आंबेगावपठार, दत्तनगर, धनकवडी, कात्रज, भारती विद्यापीठ परीसर, आंबेगाव खुर्द, आंबेगाव बुद्रुक, येवलेवाडी, आंबेडकरनगर, दाते बस स्टॉप परिसर.

एस.एन.डी.टी. (पाण्याची टाकी) : गोखलेनगर, औध, बोपोडी, पुणे विद्यापीठ, लॉ कॉलेज रोड, महाबळेश्वर हॉटेल पर्यंत बाणेर रोड, बीएमसीसी कॉलेज रोड, भोसलेनगर, सेनापती बापट रोड, भांडारकर रोड, प्रभात रोड, पौड रोड, भीमनगर, वेदांतनगरी, करिष्मा सोसायटी समोरील परिसर, मयुर कॉलनी परिसर, दशभुजा गणपती ते नळस्टॉप, सहकार वसाहत म्हात्रे पुलापर्यंत, मंगेशकर हॉस्पिटल, हिमाली सोसायटी, वकीलनगर, गिरीजा शंकर, नवसह्याद्री, ताथवडे उद्यान परिसर, निलकमल युनायटेड वेस्टर्न

चांदणी चौक टाकी परिसर : पाषाण, भूगाव रोड, कोकाटे वस्ती, संपूर्ण बावधन परिसर, उजवी भुसारी कॉलनी व डावी भुसारी कॉलनी, चिंतामणी सोसायटी, गुरुगणेश नगर, सुरज नगर, सागर कॉलनी, भारतीनगर, बावधन परिसर, सारथी शिल्प सोसायटी, पूजा पार्क, शांतीबन सोसायटी परिसर, डुक्कर खिंडीकडील भाग, शास्त्रीनगर, न्यू लक्ष्मीनगर, परमहंस नगर, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी, निम्हणमळा, सुस रोड.

गांधी भवन टाकी परिसर: काकडे सिटी, होम कॉलनी, सिप्ला फाउंडेशन, रेणुकानगर, पाप्युलर कॉलनी, वारजे माळवाडी, गोकुळनगर, महात्मा सोसायटी परिसर, भुजबळ टाऊनशिप, एकलव्य कॉलेज परिसर, कुमार परिसर, धनंजय सोसायटी, रोहन गार्डन परिसर, अमित पार्क, कांचन गंगा, अलक नंदा, शिवप्रभा, श्रावणधारा झोपडपट्टी, शांतीवन, गांधी स्मारक, किर्लोस्कर डीझेल कंपनी, लक्ष्मीनगर झोपडपट्टी, मुंबई पुणे बायपास रोड दोन्ही बाजू. श्रीराम सोसायटी, गिरीष सोसायटी, तिरुपती नगर, कुलकर्णी हॉस्पिटल परिसर, हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर गावठाण, तपोधाम परिसर, राम नगर, गोसावी वस्ती, कॅनॉल रोड.

वारजे जलकेंद्र : कर्वेनगर गावठाण परिसर, तपोधाम सोसायटी, शाहू कॉलनी, इंगळेनगर, वारजे जकात नाका परिसर, कर्वेनगर, बाणेर, बालेवाडी, चाकणकर मळा, पॅनकार्ड क्लबरोड, विधाते वस्ती, मेडिपॉईंट रोड, आंबेडकरनगर, दत्तनगर, अहिरेगाव, माळवाडी, यशोदिप चौक, मामासाहेब मोहोळ शाळा परिसर, गणपती माथा परिसर, एनडीए रोड. होळकर जलकेंद्र : मुळा रोड, खडकी कॅन्टोनमेंट संपूर्ण परिसर, हरीगंगा सोसायटी, कोंढवे-धावडे जलकेंद्र : वारजे हाय-वे परिसर, रामनगर, उत्तम नगर, शिवणे, कोंडवे धावडे, न्यु कोपरे परिसर तरी नागरिकांनी गुरुवारी आणि शुक्रवारी महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

रेल्वेत कारकून पदभरती करतो असे सांगून सव्वाकोटी रुपयांची 20 जणांची फसवणूक

पनवेल, दि. १६ : प्रतिनिधी

भारतील रेल्वे प्रशासनात कारकून या पदावर नोकरी लावण्याच्या बहाण्याने तब्बल २० जणांना गंडा घातल्याची घटना खारघर पोलीस ठाण्यात सोमवारी नोंदविण्यात आली. या प्रकरणी खारघर पोलीसांनी सहा जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदविला असून सध्या हा भामटा फरार आहे.

खारघरमध्ये राहणाऱ्या संबंधित भामट्याने दोन वर्षांपूर्वी (ऑक्टोबर २०२२) कबड्डी शिकविण्याच्या निमित्ताने सूशिक्षित व क्रीडा क्षेत्रातील तरुणांच्या पालकांना गाठले. त्यांचा विश्वास संपादन केला आणि रेल्वेत कारकून म्हणून नोकरी लावतो असे भासवले. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराने १० लाख रुपये द्यावे लागतील, असेही सांगितले. लगेच नोकरी लागेल या अपेक्षेने पालकांनी संबंधित ४३ वर्षीय भामट्यावर विश्वास ठेवला. त्यानंतर या भामट्याने पालकांचा विश्वास दृढ होण्यासाठी रविवारी सुट्टीच्या दिवशी मुंबई चर्चगेट येथील रेल्वेच्या कार्यालयात पालकांच्या भेटीगाठी घेतल्या. रेल्वे कार्यालयातच भेट झाल्याने हा भामटा नोकरी लावेलच असा विश्वास पालकांना वाटल्याने त्यांनी भामट्याने दिलेल्या बँक खात्यावर आणि रोख रक्कम या भामट्याला दिली. त्यानंतर काही महिन्यांनी नोकरी कधी लागेल यासाठी भामट्याकडे विचारणा केली. मात्र तो अनेक कारणे देऊन नोकरी लावण्याचे टाळू लागला. अखेर पालकांना त्याच्यावर संशय आल्याने त्यांनी या भामट्याविषयी अधिक माहिती गोळा करण्याची सुरुवात केली.

कबड्डी शिकविण्याचा प्रशिक्षक अशी स्वत:ची ओळख करणाऱ्या या भामट्यावर यापूर्वी फसवणुकीचे गुन्हे दाखल असून त्याची पत्नी व इतर चार जणांनी मिळून ही सर्व पालकांची फसवणूक झाल्याचे समजताच पालकांनी त्याच्याकडे दिलेले पैसे मागण्यासाठी पाठपुरावा केला. या भामट्याने स्वीकारलेल्या पैशातून त्याने कोल्हापूर येथील त्याच्या मूळ गावी घर बांधल्याचे पालकांना समजल्यावर पालकांनी भामट्याला दिलेले १ कोटी ३१ लाख रुपये परत मागण्याची सुरुवात केली. मात्र दिलेले पैसे परत मिळत नाहीत याची खात्री झाल्यावर खारघर पोलीस ठाण्यात पालकांनी एकत्र येऊन मार्च महिन्यात याविषयी तक्रारीअर्ज दिला. या अर्जाची पडताळणी केल्यावर पोलिसांना ही फसवणूक असल्याचे प्रथम दर्शनी दिसले. त्यामुळे सोमवारी याबाबत खारघर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांनी रितसर गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले. पालकांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यापासून हा भामटा व त्याची पत्नी फरार असल्याचे समजते. याबाबत अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पराग लोंढे हे करीत आहेत.

घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता संघ व सेना यांच्या वतीने माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन डॉ अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस हा वृत्तपत्र विक्रेता दिवस म्हणून सर्व विक्रेत्यांनी एकत्रित येत वामनराव कोठावदे चौक घाटकोपर पाश्चिम येथे साजरा केला.यावेळी प्रकाश वाणी,प्रकाश गिलबिले,दीपक गवळी,रवी संसारे,सचिन भांगे,अंकुश खरात,नितीन गंभीर,विजय कोठावदे,नितीन रेणुसे,धनंजय शेलार ,रवी मोरणकर,वैभव पावस्कर,जगन वाघ,शिवाजी सुर्वे, विलास कोठावडे,अशोक अवती अशोक हांडे,दिपक पवार व मोठ्या संख्येने वृत्तपत्र विक्रेता बांधवांनी उपस्थित राहत डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जागवत अभिवादन केले.

किन्हवली येथील विद्या प्रसारक मंडळ संस्थेचा संचालक लाखाची लाच घेताना अटकेत

कल्याण, दि. १६ प्रतिनिधी

शहापूर तालुक्यातील किन्हवली येथील विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचा एक संचालक तथा सहसचिव चंद्रकांत हरिभाऊ धानके (६०) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सोमवारी शहा चंदुलाल स्वरुपचंद विद्यालय शाळेच्या समोरील बस थांब्यावर एक लाख १० हजार रूपयांची लाच एका शिक्षकाकडून घेताना रंगेहाथ पकडले. ज्येष्ठ पत्रकार अरविंद उर्फ अप्पा भानुशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, तर त्यांचा मुलगा संतोष भानुशाली हे सचिव आहेत. या शैक्षणिक संस्थेचे शैक्षणिक उपक्रमांबद्दल यापूर्वी अनेक मान्यवरांनी कौतुक केले आहे. संचालक चंद्रकांत धानके यांच्या विरुध्द किन्हवली पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धानके हे राज्य परिवहन महामंडळातून निवृत्त झालेले बस वाहक आहेत.

मिळालेली माहिती अशी की, विद्या प्रसारक मंडळ संचलित शहा चंदुलाल स्वरुपचंद विद्यालयातील एक शिक्षक यापूर्वी काही कारणावरून संस्थेने निलंबित केला होता. त्यांना नंतर पुन्हा सेवेत दाखल करून घेण्यात आले होते. निलंबन काळातील या शिक्षकाची रोखण्यात आलेली वेतनवाढ पूर्ववत करण्यासाठी हा शिक्षक प्रयत्नशील होता. ही वेतनवाढ पूर्ववत करण्यासाठी तक्रारदार शिक्षकाकडून काही मागण्या संस्थेकडून करण्यात आल्या. चंद्रकांत धानके यांनी तक्रारदार शिक्षकाकडे एक लाख १० हजार रूपये दिले तर तुमचे काम होईल, असे सांगून त्यांच्याकडे लाचेची मागणी केली.

तक्रारदार शिक्षकाने या प्रकरणी तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलीस आयुक्त संदीप दिवाण यांना संपर्क केला. मिळालेल्या तक्रारीप्रमाणे अपर पोलीस अधीक्षक महेश तरडे, गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक धर्मराज सोनक यांनी शिक्षकाच्या तक्रारीची खात्री केली. त्यात धानके हे लाच मागत असल्याचे स्पष्ट झाले. सोमवारी चंद्रकांत धानके यांनी तक्रारदार शिक्षकाला एक लाख १० हजार रूपये शहा चंदुलाल स्वरुपचंद विद्यालयासमोरील बस थांब्याजवळ घेऊन येण्यास सांगितले. या बस थांबा भागात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा लावला होता. धानके आपल्या मोटारीत बसून तक्रारदार शिक्षकाकडून एक लाख १० हजार रूपयांची लाचेची रक्कम स्वीकारत असताना पथकाने धानके यांना रंगेहाथ पकडले.

भिवंडी ग्रामीणच्या ग्राहकांसाठी टोरेंट पॉवरचा संवाद कॅम्प संपन्न



भिवंडी दि. १६ प्रतिनिधी

टोरेंट पावरने नुकताच तालुक्यातील पूर्णा ग्राहक सेवा केंद्रात ग्राहकांसाठी संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते.यामध्ये २०० हून अधिक ग्राहकांनी सहभाग घेतला होता.दरम्यान या कार्यक्रमात टोरेंट अधिकाऱ्यांनी ग्राहकांच्या समस्येचे निराकरणासह पीडी ग्राहकांच्या महावितरणच्या थकबाकीसाठी विशेष व्याज माफी योजना, "महावितरण अभय योजना २०२४", प्रलंबित कनेक्शन, विजिलेंस, बिल संबंधित आणि डिजिटल पेमेंट सेवा, नवीन वीज दर, आदी सारख्या मुद्द्यांवर ग्राहकांना माहिती दिली.यापूर्वी टोरेंटने भिवंडी शहरात अशा अनेक संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते.त्यामध्ये ३ हजाराहून अधिक ग्राहक सहभागी झाले होते.या संवाद कार्यक्रमात टोरेंट पॉवरचे महाव्यवस्थापक अंकित साहा, बिनु सेतुमाधवन, राघवेंद्र राव, विजय राणे, जनसंपर्क अधिकारी मंदार घाणेकर, अमित कडू आदींसह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी अनेक ग्रामीण आणि शहरी ग्राहकांनी टोरेंट पॉवरचा या संवाद कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद देवून उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी विविध विषयांची चर्चा केली.

बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघर्ष समितीचा यशस्वी ठाणे दौरा

मुंबई दि. १६ प्रतिनिधी

समाजात वृत्तपत्र विक्रेत्यांचे कार्य हे अत्यंत महत्वाचे असून त्यांची सुरक्षा व कल्याण हे महत्वाचे आहे, सकाळी साडेतीन वाजल्यापासुन धावणारा विक्रेता हा लोकशाहीचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. हेच जाणुन या विक्रेता समाजासाठी गेली सुमारे आठ वर्षापासून महाराष्ट्र शासानाकडे कल्याणकारी मंडळाची मागणी करुन त्याचा सातत्याने पाठपुरावा केला गेला अन त्यात यश आले आहे. या कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातुन विक्रेत्याची सुरक्षा व त्याचे कल्याण यांचा विचार केला जाईल या सोबतच विक्रेत्यांच्या मुलाचे शिक्षण, त्यांचे आरोग्य, आदी बाबींचाही विचार केला जाईल. असे आमदार श्री संजय केळकर यानी बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघर्ष समितीच्या प्रतीनिधींशी बोलताना सांगितले. संघर्ष समितीने श्री संजय केळकर यांची विक्रेत्यांसाठी कल्याणकारी मंडळ व्हावे, यासाठी केलेल्या प्रयत्नाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सदिच्छा भेट घेतली. यावेळी दादर, सी.एस.टी., चर्चगेट, काळबादेवी, कांदीवली, ठाणे, गोरेगाव, लोखंडवाला, ओशिवरा, नवी मुंबई आदी विभागातुन विक्रेत्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

'डेटिंग ॲप'च्या जाळ्यात ओढून लुटमार करणारी टोळी गजाआड

पुणे, दि. १५ प्रतिनिधी

समाज माध्यमातून मैत्रीचे आमिष दाखवून लूटणार करणाऱ्या टोळीला पुणे ग्रामीण पोलिसांनी अटक केली. या टोळीने पुणे शहरासह, ग्रामीण भागातील तरुणांना लुटल्याची माहिती उघडकीस आली आहे. नगर रस्त्यावरील शिक्रापूर परिसरात ९ ऑक्टोबर रोजी एका तरुणाचे अपहरण करुन त्याला लुटण्यात आले होते. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी पोलिसांनी सुशांत पोपट नागरे (वय २५), मयूर राजू गायकवाड (वय २४, दोघे रा. बोल्हेगाव, अहमदनगर) आणि श्रेयस भाऊसाहेब आंग्रे (२४, रा, नागापूर, अहमदनगर) यांना अटक केली होती. तरुणांना डेटिंग ॲपच्या माध्यमातून जाळ्यात ओढून आरोपींनी लुटमारीचे गुन्हे केले, अशी माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

पोलिसांनी आरोपींकडून एक मोटार जप्त केली आहे. या टोळीने लुटमारीचे तीन गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. पुणे पोलीस आयुक्तालयातील लोणीकंद पोलीस ठाण्यात दाखल असलेला लुटमारीचा गुन्हा उघडकीस आला आहे. पोलीस अधीक्षक देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षकअविनाश शिळीमकर, शिक्रापूर पोलिस ठाण्याचे दीपरत्न गायकवाड, अमित सिदपाटील, तुषार पंदारे, जनार्दन शेळके, राजू मोमीन, संजू जाधव, सागर धुमाळ यांनी ही कारवाई केली.

आरोपी नागरे आणि गायकवाड सराइत आहेत. त्यांच्याविरुद्ध नगरमधील तोफखाना आणि कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी भीती दाखवून लुटमारीचे गुन्हे केले. एका तक्रारदार तरुणाकडून त्यांनी ८० हजार रुपये उकळल्याचे तपासात उघडकीस आले आहे. पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे तपास करत आहेत. डेटिंग ॲपच्य माध्यमातून फसवणूकीचे प्रकार वाढीस लागले आहेत. तरुणींशी मैत्रीच्या आमिषाने चोरट्यांनी अनेकांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

ठाण्यात 23 हजार लिटर पेट्रोल-डिझेलच्या टँकरला आग; चालकाच्या प्रसंगावधानाने जीवितहानी टळली

ठाणे, दि. १५ प्रतिनिधी

घोडबंदर रोडमार्गे ठाण्याहून वसईकडे निघालेल्या तब्बल २३ हजार लिटर पेट्रोल आणि डिझेल भरलेल्या टँकरच्या टाकीवरील पेट्रोल भरण्याच्या होझ पाइपला सोमवारी दुपारी ३:४५ वाजता किरकोळ आग लागली. गायमुख जकात नाक्याजवळ घडलेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन टँकरचालक मनोज यादव यांनी अग्निशामक यंत्राच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. वसईकडे जाणाऱ्या टँकरमध्ये प्रत्येकी पाच हजार लिटरचे पेट्रोल आणि डिझेलचे पाच कंपार्टमेंट होते. तब्बल २५ हजार लिटर क्षमतेच्या या टँकरमध्ये सुमारे २३ हजार लिटर डिझेल आणि पेट्रोल होते. यातील एका कंपार्टमेंटच्या झाकणाच्या तोंडावरील होझ पाइपला अचानक आग लागली. आग लागल्याचे निदर्शनास येताच टँकरचालक मनोज यादव यांनी प्रसंगावधान राखून घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान पोहोचण्यापूर्वीच फायर एक्सटिंग्युशरच्या साहाय्याने आग नियंत्रणात आणली. आग न भडकल्याने या घटनेमध्ये कोणीही जखमी झाले नाही. आगीवर नियंत्रण मिळविल्यानंतर हा टँकर पुढे वसईला रवाना झाल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

दिवाळी येताच तिकिट दरांमध्ये पुन्हा प्रचंड वाढ तक्रार करण्यासाठीचे संपर्क क्रमांक मात्र बंद !

प्रवाशांची लूट कधी थांबणार ? - सुराज्य अभियानाचा शासनाला प्रश्न

मुंबई, दि. १६ प्रतिनिधी

दिवाळीच्या आगमनापूर्वी खासगी प्रवासी बस चालकांकडून पुन्हा तिकिट दरांमध्ये वाढ करत प्रवाशांची लूट चालू झाली आहे. सुट्ट्या आणि सण यांच्या काळात प्रवासासाठी अधिक तिकिट दराचा भुर्दंड भरावा लागणारच, अशी धारणा सर्वसामान्यांची झाली आहे. वर्ष २०१८ मध्ये राज्य शासनाने आदेश काढला आणि प्रवासी बसचे तिकिटदर निश्चित केले. परंतु ६ वर्षे होऊन गेली परिस्थिती 'जैसे थे' आहे. आदेशात अधिक तिकीटदर आकारणाऱ्या खासगी बस चालकांच्या विरुद्ध तक्रार करण्यासाठी (०२२) ६२४२६६६६ आणि १८००२२०११० हे दोन संपर्क क्रमांक दिले होते. ते सध्या बंद स्थितीत आहेत. ते बंद का आहेत ? हे म्हणजे प्रवाशांना 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' दिल्यासारखे आहे. ही प्रवाशांची लूट केव्हा थांबणार, असा प्रश्न हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'चे महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे यांनी केला. या संदर्भात एक निवेदन महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्तांना यांना दिले त्या वेळी ते बोलत होते.

काही प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी तक्रार करण्यासाठी व्हॉट्सॲप हेल्पलाइन क्रमांक जाहीर केले खरे; पण आयुक्त कार्यालयाने असे करण्यासाठी आदेश निर्गमित केले असल्यास, अन्य प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी असे क्रमांक का जाहीर केले नाहीत? जेव्हा आम्ही परिवहन अधिकाऱ्यांची भेट घेऊन अधिक तिकिट दर आकारणाऱ्या खासगी बस चालकांविरुद्ध काय कार्यवाही केली, असे विचारले, त्या वेळी 'आमच्याकडे तक्रारीच आल्या नाहीत' असे उत्तर मिळाले. जर तक्रारीसाठीचा क्रमांकच बंद आहे, तर तक्रारी येणार कशा? अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी. तसेच हे संपर्क क्रमांक तत्काळ चालू करून ते २४ तास चालू रहायला हवेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत राज्यात चार लाखांपेक्षा जास्त लाभार्थ्यांच्या खात्यात 123 कोटी रुपये अनुदान वर्ग

मुंबई, दि. १६ प्रतिनिधी

राज्यातील ६५ वर्षे आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या वृद्धावस्थेत मदत करण्यासाठी आवश्यक उपकरणे खरेदीसाठी, मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी "मुख्यमंत्री वयोश्री योजना" राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत दि.१४ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यातील आधार प्रमाणीकरण झालेल्या ४ लाख १२ हजार ११३ पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीव्दारे प्रति लाभार्थी तीन हजार प्रमाणे १२३.६३ कोटी रुपये अनुदान वर्ग करण्यात आले आहे, अशी माहिती सामाजिक न्याय विभागाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. या योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ९ ऑक्टोबर २०२४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील ४० हजार २२० पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर डीबीटीव्दारे निधी वर्ग करुन करण्यात आला होता. या योजनेअंतर्गत राज्यात १७ लाख ८३ हजार १७५ ज्येष्ठ नागरिकांचे अर्ज प्राप्त आहेत. या अर्जाची छाननी व आधार प्रमाणीकरणाचे काम सुरु आहे.

उल्हासनगर महापालिकेच्या कर्मचाऱ्याना मिळणार 17 हजार रुपये दिवाळी बोनस

उल्हासनगर, दि. १६ प्रतिनिधी

उल्हासनगर महापालिकेतील कर्मचाऱ्याची दिवाळी गोड होणार असुन या कर्मचाऱ्याना १७ हजार रुपये बोनस मिळणार आहे. आज महापालिका आयुक्त व युनियन चे पदाधिकारी यांच्यात झालेल्या बैठकीत बोनस बाबत चर्चा करुन चर्चे अंती या कर्मचाऱ्याना १७ हजार रुपये दिवाळी बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उल्हासनगर महापालिका कर्मचाऱ्याना दर दिवाळीला बोनस देण्यात येते. मात्र या बोनस ची रक्कम दर वर्षी ५०० रुपयानी वाढते. गेल्या वर्षी या कर्मचाऱ्याना १६५०० रुपये दिवाळी बोनस देण्यात आले होते. तर या वर्षी आयुक्ता सोबत युनियन पदाधिकाऱ्याशी झालेल्या बैठकीत १७ हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान या बैठकीला आयुक्त विकास ढाकणे , अतिरिक्त आयुक्त जमिर लेंगरेकर , मुख्य लेखाधिकारी किरण भिलारे , महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे अध्यक्ष दिलीप थोरात , लेबर फ्रंट युनियन चे अध्यक्ष श्याम गायकवाड , अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस चे अध्यक्ष चरणसिंग टाक आणि भारतीय कामगार सेनेचे राधाकृष्ण साठे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

उल्हासनगरात बॅनर्स काढताना विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

उल्हासनगर, दि. १६ प्रतिनिधी

कॅम्प नं-४, श्रीराम चौकात नवरात्री निमित्त लावण्यात आलेले बॅनर्स काढताना एका २५ वर्षीय तरुणाचा विजेचा धक्का बसून मृत्यू झाला. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असलीतरी अधिक चौकशी सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पडवळ यांनी दिली.

उल्हासनगर महापालिका हद्दीत शेकडो पोस्टर्स, बॅनर्स व रस्त्यावर कमानी उभारण्यात आल्या आहेत. यातील बहुतांश कमानी, पोस्टर्स व बॅनर्स विनापरवाना लावल्याचे बोलले जात आहे. अशीच भली मोठी कमान श्रीराम चौक परिसरात एका राजकीय नेत्यांच्या नावाने लावण्यात आली होती. रस्त्याच्या कमानीवरील पोस्टर्स व बॅनर्स काढतांना कल्याण पूर्व चिंचपाडा येथे राहणाऱ्या २५ वर्षीय सोहल अनिल भिंगारदिवे याला विजेचा जोरदार धक्का बसला. ही घटना रविवारी सायंकाळच्या दरम्यान घडली असून सोहलचा जागीच मृत्यू झाला. विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली असलेतरी पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत असल्याचे संकेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पडवळ यांनी दिली.

शहरात पोस्टर्स व बॅनर्स परवानगी प्रकरण ऐरणीवर आल्यानंतर, महापालिकेने ३ महिन्यांपूर्वी फक्त ६८ पोस्टर्स-बॅनर्सला अधिकृत परवानगी दिल्याचे सांगितले होते. याव्यतिरिक्त असलेले पोस्टर्स व बॅनर्स अवैध व विनापरवाना असून त्यावर प्रभाग समिती निहाय्य कारवाई सुरू केली होती. मात्र ३ ते ४ गुन्हे दाखल केल्यावर पोस्टर्स, बॅनर्स कारवाई बंद पडली. आजही विनापरवा

भगवी पताका, पालखी अन् दिंडीने गुरुकुंजमध्ये वेधले भाविकांचे लक्ष

■ महासागर प्रतिनिधी,
तिवसा, दि. १६:
राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवास श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम येथे महासमाधीजवळ मंगळवारी पहाटे साडेचार वाजता प्रारंभ झाला. या प्रसंगी सामुदायिक ध्यानानंतर गुरुकुंज आश्रमातून राष्ट्रसंतांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या वेळी श्रीगुरुदेव मानवसेवा छात्रालयाच्या विद्यार्थ्यांनी मानकर स्वामी, सुधीर कडू व प्रतिक बारी यांच्या मार्गदर्शनात महाकाल दिंडी, टाळ, पदन्यास नृत्य सादर कले. विद्यार्थ्यांच्या या कलेने उपस्थित गुरुदेव भक्तांना मंत्रमुग्ध केले.
संत शंकर महाराज यांच्या हस्ते तीर्थस्थापना, चरण पादुका पूजन व महासमाधी अभिषेकाने गुरुदेवाच्या गजरात राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवाला पहाटे साडे चार वाजता धार्मिक व विधिवत प्रारंभ झाला. या वेळी गुरुकुंजातील राष्ट्रसंतांच्या समाधी स्थळी परिसरातील हजारो गुरुदेव भक्तांची उपस्थिती होती. चरण पादुका पूजन व महासमाधी अभिषेकप्रसंगी भजन, मंत्रघोष व शंख नादाने परिसरातील वातावरण भक्तिमय झाले होते. तीर्थ स्थापनेनंतर सामुदायिक ध्यानाचा कार्यक्रम महासमाधी स्थळी घेण्यात आला. या वेळी शंकर महाराज यांनी सामुदायिक ध्यानाच्या महत्त्वावर चिंतन केले. चिंतनप्रसंगी शंकर महाराज म्हणाले, राष्ट्रसंतांची समाधी सर्वांचे प्रेरणास्थान आहे. जीव व शिवाचा संयोग म्हणजे समाधी. या समाधीमुळे जीव शिवाचा समन्वय होऊन आत्म साक्षात्काराचा भाव जागृत होतो. तसेच समाधी स्थळाच्या दर्शनातून बंधुत्व प्रेमभाव व प्रसन्नता निर्माण होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अनेक विषयावर व्यापक विचार आहे. त्याचे शब्दांमध्ये मला वर्णन करता येणार नाही. त्यामुळे निर्विकारपणे एकाग्र होऊन चिंतन करत त्यांच्या चरणी लीन होणे आवश्यक आहे. राष्ट्रसंतांनी आपल्या गतिमान आयुष्यात सर्व धर्माचा अभ्यास करून सामुदायिक ध्यान व प्रार्थनेची निर्मिती केली आहे. यथार्थ ज्ञान प्रगट होण्यासाठी जीवनाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता सर्वांनी नियमितपणे सामुदायिक ध्यान व प्रार्थना करणे महत्त्वाचे आहे, असे आवाहन त्यांनी गुरुदेव भक्तांना केले. सामुदायिक ध्यानानंतर काढण्यात आलेल्या दिंडीचे संयोजन अमोल बांबल यांनी केले. या वेळी अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या संचालक मंडळांच्या अध्यक्ष पुष्पा बोंडे, सर्वाधिकारी लक्ष्मण गमे, प्रचार प्रमुख प्रकाश वाघ, उपसर्वाधिकारी दामोदर पाटील, सरचिटणीस जनार्दन बोथे, ॲड. दिलीप कोहळे, गोपाल कडू, बाबाराव पाटील, कार्यकारिणी सदस्य तथा हजारो गुरुदेव भक्त उपस्थित होते. राष्ट्रसंतांची व शिवाच्या वेशभूषेने वेधले लक्ष राष्ट्रसंतांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त काढण्यात आलेल्या दिंडीत यावली शहीद येथील कार्यकर्त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची वेशभूषा धारण करत उपस्थितांचे लक्ष वेधले, तर भोळ्या शंकराच्या वेशभूषेने अनेकांना महादेवाचे दर्शन घडल्याची प्रचिती आली आहे.
डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल चिंतन आज पुण्यतिथी महोत्सवा दरम्यान बुधवारी (दि.) पहाटे साडेपाच वाजता सामुदायिक ध्यानावर डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल चिंतन करतील. सकाळी वाजता योगाचार्य अक्षय धानोरकर हे गुरुदेव भक्तांना योगाचे धडे देतील. ८ वाजता प्रतिक बारी यांचे ग्रामगीता प्रवचन, ११ वाजता आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा, सायंकाळी वाजता सामुदायिक प्रार्थनेवर अरविंद राठोड यांचे चिंतन, रात्री सव्वा सात वाजता तिवसा येथील सद्गुरू आडकोजी महाराज भजन मंडळाद्वारा खंजिरी भजन, ८ वाजता चंद्रपूर येथील श्रीगुरुदेव महिला भजन मंडळाचे खंजिरी भजन व रात्री सव्वा नऊ वाजता गजानन दिघडे यांचे कीर्तन होईल.

विविध मागण्यांसाठी वंचित' चे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,
जळगाव जामोद, दि. १६:
परतीच्या पावसाने झालेल्या नुकसानीचा तालुक्यातील शेतकऱ्यांना मोबदला देण्यात यावा, कापसाला १५ हजार तर सोयाबीनला ८ हजार रुपये प्रती क्विंटल भाव देण्यात यावा. पावसामुळे झालेल्या नुकसानीची सरसकट हेक्टरी ५०,००० रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, यासह इतर मागण्यांचे

निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज १५ ऑक्टोबर रोजी तहसीलदार यांना दिले आहे.
शेतकऱ्याचे नगदी पीक असलेला कापूस व सोयाबीन पावसामुळे वाया गेले आहे. सोयाबीन पिकाची सोंगणी व काढणी करणे दुरापास्त झाले आहे. त्यात भरीस भर म्हणून शेत मालाचे भाव पडले आहेत.
या संकटातुन बाहेर काढण्यासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संतोष गवई, साहेबराव भगत, देवाभाऊ दामोदर, सरपंच रमेश नाईक, सुरेश वाघोदे, सुनील भटकर, परमेश्वर पारवे, सुरेश सिरसाट, भास्कर जुमळे व महेंद्र जाधव यांनी दिला आहे.

कार्यालय नगर परिषद उमरेड
(जिल्हा नागपुर)

क्रमाकः- एमसीयु/कवि /१०६७/२०२४ दिनांकः- १०/१०/२०२४

जाहीरनामा

द्याद्वारे नागरिकांना सुचित करण्यात येते की, नगर परिषद परिसरातील खाली नमुद केलेल्या मालमत्तेचे फेरफार करण्याबाबत खालील अर्जदारानी कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

अनु क्रमांक	हल्ली नगर परिषद रेकार्ड वर असलेले नाव	वार्ड क्रमांक	मालमत्ता क्रमांक	शिट क्रमांक / न.भु. क्र. सर्वे क्रमांक	अर्जदाराचे नाव (ज्याचे नावे फेरफार घ्यावयाचे आहे त्याचे नाव)	फेरफाराकरिता सादर केलेले दस्ताएवज
१	सुरज विठ्ठलराव सहारे	२० ईतवारी ब	१०९४९/१	मौजा बेलगाव, प.ह.न..४५ . सर्व्हेनं. ६/७ प्लॉट नं. १, त्रिस्ट्रारले आऊट, एकूण क्षेत्रफळ २७२.२५ चौ.मी.	१) विद्या सुरज सहारे २) वैभव सुरज सहारे ३) ऐश्वर्या सुरज सहारे	वारसान शपथपत्राप्रमाणे व ७/१२ नोंदीप्रमाणे,
२	जगदीश पारीशनाथ रामटेके	१३ मंगळवारी पेठ	६५३८	मौजा उमरेड, प.ह.न..४६, सिट क्र.६०, न..भु.क्र.४६८३, एकूग क्षेत्रफळ १५२.७० चौ. मी.. पैकी ५३.४१ चौ. मी.	१) कोमल जगदीश रामटेके २) कु आवृत्ती जगदीश रामटेके	शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हेयेथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
३	बैजु रामफल तांबेकर	२ बुधवारी पेठ	६६१	मौजा उमरेड, प.ह.न..४६, सिट क्र.३३. न..भु.क्र.२३२८. एकूण क्षेत्रफळ १२०.०० चौ. मी.	१) सिंधु बैजु तांबेकर २) रवि बैजु तांबेकर ३) दिनेश पैजु तांबेकर	शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
४	चंद्रभागाबाई बाबुराव पेटकर	१६ जोगीठाणा पेठ	७५४३	मौजा उमरेड, प.ह.न..४५, सिट क्रं. ५९, न.भु.क्रं.४४५६, एकूण क्षेत्रफळ ३०.०६ चौ.मी.	१) विजय बाबुराव पेटकर २) रूखमा विनोद भिवनकर ३) पुष्पा वासुदेव सोनटक्के	शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
५	तुकाराम जागो जोधे	१३ मंगळवारी पेठ	६२७४	मौजा उमरेड, प.ह.न.. ४६, सिट क्र. ५१. न. भु.क्र.३६४८ एकूण क्षेत्रफळ ११७.८० चौ. मी	१) शेवंताबाई सुर्यभान साठवणे २) किरान तुकाराम जोधे ३) राघो तुकाराम जोधे ४) राजु बळीराम तलगले ५) छाया नारायण घुगडे ६) शोभा रानुजी ढोबळे ७) देवका राजु लेंडे ८) देवराव बळीराम तलमले	शपथपत्राप्रमाणे व सिटी सर्व्हेयेथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
६	पांडुरंग फागोजी गजभिये शेख मेहमुद शेख मेहबुब	२० ईतवारी ब	१०६२५	मौजा, उमरेड, प.ह.न. ४५, सर्व्हे नं. ८ प्लॉट नं. ३५/१, मानव शक्ती ले आऊट, एकूण क्षेत्रफळ ९० चौ.मी.	१) अनुप पांडुरंग गजभिये २) सुलोचना पांडुरंग गजभिये	वारसान शपथपत्रा-प्रमाणे व ७/१२ नोंदीप्रमाणे.
७	आनंदराव गणपत आंबेकर	५ गंगापूर	२१०६	मौजा उमरेड, प.ह.न. ४६, सिट क्र, न.भु.क्र. ३७७ एकूण क्षेत्रफळ २८.१० चौ.मी.	१) बारूबाई आंनदराव आंबेकर २) केशव आंनदराव आंबेकर ३) सुरेश आंनदराव आंबेकर ४) वंदना भैय्या गायधने ५) पुण्या पुरूषोत्तम बेले	वारसान शपथपत्रा-प्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
८	लक्ष्मीबाई सदाशिव बालपांडे	१० पेठ मंगळवारी	५४४९	मौजा उमरेड, प.ह.न..४६. सिट क्र.५०, न.भु.क्र.३२६३ एकूण क्षेत्रफळ ९२.१५ चौ.मी.	१) प्रभाकर सदाशिव बालपांडे २) गोविंदा सदाशिव बालपांडे ३) पुष्पा सदाशिव बालपांडे ४) लता बापुराव क्षिरसागर ५) सुमन मधुकर बालपांडे ६) पंकज मधुकर बालपांडे ७) सचिन मधुकर बालपाडे ८) संध्या अरुण क्षिरसागर ९) सुषमा सुरेश बालपांडे १०) प्रतिक सुरेश बालपांडे ११) मयुर सुरेश बालपांडे	वारसान शपथपत्रा-प्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
९	विनायक गणपत लव्हे	२ बुधवारी पेठ	७०५/अ	मौजा उमरेड, प.ह.न..४६. सिट क्र ३३ न.भु.क्र. २२४२ एकूण क्षेत्रफळ ११४.१० चौ.मी.	१) छाया विनायक लव्हे २) तनय विनायक लव्हे ३) पोर्णीमा विनायक लव्हे	वारसान शपथपत्रा-प्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
१०	महाराष्ट्र शासन भोगवटादार - रमेश नारायण चाचरकर	६ कावरापेठ	२७९३	मौजा उमरेड, प.ह.न.. ४६. सिट क्र, न.भु.के.-- एकूण क्षेत्रफळ --- चौ. मी.	महाराष्ट्र शासन भोगवटादार- १) वंदना रमेश चाचरकर २) अभय रमेश चाचरकर ३) अमोल रमेश चाचरकर	वारसान शपथपत्राप्रमाणे
११	शांताबाई बकाराम वाकुडकर	८ कावरापेठ	३९४८	मौजा उमरेड, प.ह.न. ४६, सिट क्रं.२९, न.भु.क्र.१५९८ एकूण क्षेत्रफळ २०८.६० चौ.मी.	१) दिलीप बकाराम वाकुडकर २) रमेश बकाराम वाकुडकर ३) बेबी सुखदेव खडसे	वारसान शपथपत्रा-प्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
१२	असदअली अहमद अली सय्यद शराफत अली अहमद अली सय्यद	४ बुधवारी पेठ	१७८६/१	मौजा उमरेड, प.ह.न. ४६, सिट क्रं. ३१. न..भु.क्र. १७५३/२ एकूण क्षेत्रफळ ५३.५७ चौ. मी.	शराफत अली अहमद अली सैय्यद हे नाव कायम ठेऊन, १) जाहेदा बेगम असद अली सैय्यद २) सादिक अली असद अली सैय्यद ३) इमदाद अली असद अली सैय्यद ४) राजिक अली असद अली सैय्यद	वारसान शपथपत्रा-प्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
१३	स्वनिल हरिभाऊ अरेलकर, विमल हरिभाऊ अरेलकर, घनश्याम हरिभाऊ अरेलकर, कल्पना टिकेश कालेश्वर, संदिप हरिभाऊ अरेलकर, तुकाराम भानु अरेलकर	११ पेठ मंगळवारी	५८५६	मौजा उमरेड, प.ह.न..४६, सिट क्रं. ६०, न..भु.क्रं.४६३८ एकूण क्षेत्रफळ ७०.९७ चौ.मी.	स्वनिल हरिभाऊ अरेलकर, विमल हरिभाऊ अरेलकर, घनश्याम हरिभाऊ अरेलकर, कल्पना टिकेश कालेश्वर, सदिप हरिभाऊ अरेलकर ही नावें कायम ठेऊन, १) चरनेश्वर तुकाराम अरेलकर २) शेषराव तुकाराम अरेलकर ३) पुष्पा शंकर बोकडे	वारसान शपथपत्रा-प्रमाणे व सिटी सर्व्हे येथील मालमत्ता पत्रकातील घेतलेल्या फेरफार नोंदीप्रमाणे,
१४	नरेंद्र श्रीरामसिंह ठाकूर	१५ जोगीठाणा	७२००/A	मौजा उमरेड, प.ह.न. ४६, सिट क्रं..., न.भु.क्रं.... एकूण क्षेत्रफळ चो मी	आशा नरेंद्र ठाकूर	वारसान शपथपत्राप्रमाणे
१५	गोविंदराव काशीरामजी बालपांडे	२४ ईतवारी ब	१३९२/१	मौजा, उमरेड, प.ह.न. ४५, सर्व्हेनं.५४/२/६६ प्लॉट नं. ६६ घुमडे ले आऊट, एकूण क्षेत्रफळ १९८ चो.मी.	१) चुळाराम गोविंदराव बालपांडे, २) नंदा मधुकर पर्वत ३) सुशिला गोविंदराव बालपांडे	वारसान शपथपत्रा-प्रमाणे व ७/१२ नोंदीप्रमाणे

उपरोक्त नमुद मालमत्तेवरील व त्या व्यतीरिक्त ज्याचा हक्क संबंध असेल त्यानी सदरहू मालमत्तेबाबत कोणताही आक्षेप असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्याने तारखेपासुन आवश्यक दस्ताऐवजासह लेखी आक्षेप १५ दिवसाचे आत मुख्य अधिकारी, नगर परिषद उमरेडला सादर करावा. नमुद मुदतीचे आत कोणत्याही स्वरुपाचे आक्षेप प्राप्त न झाल्यास वर नमुद अर्जाचे अनुषंगाने दायित्व बदलविण्याचा निर्णय घेण्यात येईल, तरी संबधितांनी नोंद घ्यावी.

स्वा/-
मुख्य अधिकारी
नगर परिषद उमरेड

बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणाचे अकोला कनेक्शन?

अकोला : राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येप्रकरणात आता अकोला कनेक्शन समोर आले आहे. त्यांच्या हत्येची जबाबदारी स्वीकारणारी फेसबुक पोस्ट शुबू लोणकर महाराष्ट्र या पानावरून शेयर केली. पोलिसांकडून आता त्याचा तपास केला जात आहे. शुबू हा अकोला जिल्ह्याच्या अकोट येथील शुभम रामेश्वर लोणकर आहे का? या दृष्टीने पोलीस तपास करीत आहेत. राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दीकी यांची शनिवारी मुंबई येथे हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली. या घटनेमागे बिश्नोई गँगचा हात असल्याचे समोर आले. या प्रकरणात शुबू लोणकर महाराष्ट्र नामक फेसबुक पानावर पोस्ट शेयर करीत जबाबदारी स्वीकारली आहे. बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील प्रसारित पोस्टची सत्यता, या पोस्टच्या मागे कोण आहेत, याचा तपास आणि पडताळणी मुंबई पोलिसांकडून केली जात आहे.

शुबू आणि शुभम लोणकर एकच?, शस्त्र तस्करी प्रकरणात कारवाई

अकोट शहर पोलिसांनी जानेवारी रोजी दाखल गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपींना अटक केली होती. या आरोपींपैकी एक आरोपी शुभम रामेश्वर लोणकर मूळ गाव नेव्हरी बु. ता. अकोट हा होता. शुभम लोणकरला जानेवारी रोजी वारजे नगर पुणे येथून अटक केली होती. तपासानंतर जामिनावर त्याची सुटका झाली. दरम्यान, काल रात्री बाबा सिद्दीकी यांची हत्या झाल्याची माहिती मिळताच अकोट पोलिसांनी विचारपूस करण्यासाठी पैकी आठ आरोपींना अकोट व अंजनगाव सुर्जी येथून ताब्यात घेतले. दोन आरोपी शुभम लोणकर व त्याचा भाऊ प्रवीण लोणकर यांचे घरी तपासणी केली असता दोघेही आढळून आले नाहीत. ते दोघेही जून महिन्यापासून अकोट सोडून गेल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले. गुन्ह्यासंबंधी अकोला पोलीस मुंबई गुन्हे शाखेसोबत संपर्कात असून त्यांना सहकार्य करीत आहे, अशी माहिती अकोटचे सहायक पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांनी दिली.

गँगस्टर बिश्नोईच्या संपर्कात

गँगस्टर लॉरेंस बिश्नोई आणि त्याचा लहान भाऊ अनमोल बिश्नोई यांच्या संपर्कात शुभम लोणकर होता. त्या दोघांच्या संपर्काच्या अनेक चित्रफित पोलिसांच्या हाती लागल्या होत्या. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी वर्तुळाशी त्याचा चांगला संपर्क असल्याचे समोर आले होते.

या गावचे दैवत आहे रावण दसऱ्याच्या दिवशी दहन नव्हे पूजा: ग्रामस्थ म्हणतात

राज्यातील एकमेव मंदिर

अकोला जिल्ह्यातील सांगोळा येथे सदुणांमुळे रावणाची पूजा करण्यात येते. या ठिकाणचे मंदिर राज्यातील एकमेव असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विदर्भातील काही आदिवासी भागात देखील रावणाला पूजले जाते.

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १६:
भारतात श्रीरामाची पूजा होणे आणि त्याचा शत्रू म्हणून रावणाचे दहन होणे, ही सर्वसामन्य बाब; परंतु, एका ठिकाणी रावणाची पूजा होते, तीही सदुणांमुळेहे सांगितले तर खरे वाटणार नाही. मात्र, हे सत्य असून, अकोला जिल्ह्यातील सांगोळा नावाच्या गावी रावणाची सदुणांमुळे पूजा केली जाते. या प्रथेला तब्बल २११ वर्षांची प्राचीन परंपरा लाभली आहे.
वाईट ते सोडावे आणि चांगले ते घ्यावे, अशी शिकवण आपल्या संस्कृतीने दिली. रावणात दुर्गुण होते, पण काही चांगले गुणही होते. याच गुणांमुळे अकोला जिल्ह्यातील सांगोळा गावात रावण दहनऐवजी पूजा केली जाते. बाळापूर तालुक्यातील वाडेगावनजीक हे गाव आहे. गावाच्या पूर्वेस एका ओट्यावर रावणाची पुरातन मूर्ती आहे. उघड्यावर ही मूर्ती वसलेली आहे. हे मंदिर या गावाचे वैशिष्ट्य तसेच श्रद्धस्थानही आहे. रावण या गावाचे दैवत असून ही मूर्ती स्थापन केल्यापासून गावावरील संकटे दूर झाल्याचे ग्रामस्थ सांगतात. रावण स्वभावाने कपटी, अहंकारी होता, असे मानल्या जाते. अमर्याद लालसा आणि अर्निवचनीय महत्त्वाकांक्षा या अवगुणांमुळे त्याच्यात असुरी वृत्ती होती. रावणातील हे दुर्गुण बाजूला सारले तर त्याच्यातील गुणांचे दर्शन होते. तपस्वी, बुद्धिमान, शक्तिशाली, वेदाभ्यासी आदी गुणांमुळेच सांगोळ्यात रावणाची पूजा केली जाते. २११ वर्षांपूर्वी या भागात वास्तव्य असणाऱ्या एका ऋषीने गावाच्या पश्चिम असलेल्या जंगलात तपश्चर्या केली होती. त्यांच्याच प्रेरणेने गावात अनेक धार्मिक उपक्रमही होतात. आजही त्यातील काही उपक्रम सुरू आहेत. ऋषी ब्रह्मालीन झाल्यानंतर एका शिल्पकाराकडे त्यांची मूर्ती बनवण्याचे काम सोपवण्यात आले. पण त्याच्या हातून दशानन रावणाची मूर्ती घडली. दहा तोंडे, काचा बसवलेले २० डोळे, सर्व आयुधे असलेले २० हात, अशी विराट मूर्ती या मूर्तिकाराने घडवली. दहा फाटे असलेले सिंदीचे झाड आणि अवचित घडलेली ही लंकेश्वराची मूर्ती, हा योगायोग श्रद्धळू ग्रामस्थांनी हेरला आणि गावात लंकेश्वर स्थिरावले. भक्तिभावाने रावणाची पूजा केली जाते. दसऱ्यानिमित्त सर्वत्र रावणाचे दहन होत असतांना या गावात मात्र विशेष पूजा होते. गावात रावणाचे भव्य मंदिर बांधले जावे, अशी आता ग्रामस्थांची इच्छा आहे.

शुद्धिपत्र

ही जाहिरात खावडा फेज IV-C पॉवर ट्रॉन्स्मिशन लि. यांनी 7 ऑक्टोबर 2024 रोजी वर्तमानपत्रांत प्रसिध्द केलेल्या जाहिर सूचना जाहिरातीच्या अनुषंगाने आहे.
या स्किम अंतर्गत समाविष्ट असणाऱ्या पारेषण वाहिन्या खालील गावे, कसबे व शहरे यांच्या आतून, वरुन, भोवतीच्या भागातून आणि मधून जातील.

i) दक्षिण ओलपाड (जीआईएस)-बोईसर -II (जीआईएस) 765 केव्हि डी/सी वाहिनी

अनु. क्र	गावांची नावे	तहसील	जिल्हा	राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र
1.	सोंसक, करंज, नेश, जिनोद, मिर्जापोर, मोर, भागवा, देलसा, कपासी, कुंडियाना, दांडी, लावछा, आडमोर, भांडूंत, सेलूत, नरथान, पिंजरात, दिहेन, अरियाना, आंभेटा, कुंकणी, सिठना, सेग्वाछमा, बारबोधन, तेना, उमरा, गोठण, परिया, सयान, बालकस, बाल्कश, सेग्वास्यादला कंतारा, वास्वारी, नवापरा, काकड, सायला	ओलपाड	सूरत	गुजरात
2.	बरोडिया	महुवा	सूरत	गुजरात
3.	मुंजलाव	कामरेज	सूरत	गुजरात

ii) बोईसर -II (दोन्ही सर्किट) येथील नवसारी (न्यु)-पडघे (पीजी) 765 केव्हि डी/सी वाहिनीचा लिलो

अनु. क्र	गावांची नावे	तहसील	जिल्हा	राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र
1.	लहांगेपाडा, भिलिया डोंगर, खाणेचापाडा, देहेरजा, झिरवपाडा	विक्रमगड	पालघर	महाराष्ट्र

iii) बोईसर -II (सेक्शन-II)-वेळगाव (एमएच) 400 केव्हि डी/सी (क्वॅड एसीएसआर/एएएसी/एएल 59 मूस इक्विव्हॅलन्ट) वाहिनी

अनु. क्र	गावांची नावे	तहसील	जिल्हा	राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र
1.	फुटारकंडी, भिलिया डोंगर, कुंभस्तोपदा, हातने, देहेरजा, खाणेचापाडा, भोईरपाडा, झिरवपाडा, घोंडपाडा, झाडपोली, चंदनपाडा, गुणांगनपाडा, पंबाचापाडा, चिंचपाडा, वामनपाडा, राध्याचापाडा	विक्रमगड	पालघर	महाराष्ट्र

iv) (दोन्ही सर्किट्सवर) नाममात्र व्होल्टेजने प्रत्येक सर्किटला किमान 1700 एमव्हिए क्षमतेच्या ट्विन एचटीएलएस कंडक्टरचा वापर करुन बोईसर -II (सेक्शन-I) येथील बाभळेश्वर- पडघे (एम) 400 केव्ही डी/सी वाहिनीचा लिलो

अनु. क्र	गावांची नावे	तहसील	जिल्हा	राज्य/संघ राज्य/राज्य क्षेत्र
1.	सजन, झादापोली	विक्रमगड	पालघर	महाराष्ट्र

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

महाराष्ट्राचा रणसंग्राम अधिकच रंगतदार!

महाराष्ट्र विधानसभेच्या रणसंग्रामाला आता खऱ्या अर्थाने सुरूवात होत असून, महायुती विरूद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना रंगणार आहे. निर्मितीच्या प्राथमिक स्वरूपातील तिसरी आघाडी, जरांगे, ॲड. प्रकाश आंबेडकर, मनसे आणि इतर काही लहान पक्ष त्यांची ताकद आजमावणार आहेत. एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचे बंड, नंतरच्या काळातील मोठ्या घडामोडी, सरकारकडून लाडकी बहिण आणि अशाच कित्येक योजनांचा पाऊस, या पार्श्वभूमिवर यावेळची निवडणूक प्रचंड रंगतदार ठरणार आहे.

'साहेब' कात्रजचा घाट दाखवणार?

शरद पवार भल्याभल्यांना कात्रजचा घाट दाखवतात. आपण 2019 मध्ये झालेली लोकसभा निवडणूक, त्यांचे पावसातले भाषण आणि त्यानंतर लागलेला निकाल पाहिला. विशेषतः अजितदादा सोडून गेल्यानंतर झालेल्या 2024 मधील लोकसभा निवडणुकीतही त्यांनी 8 खासदार निवडून आणले.

गेल्या लोकसभेच्या तुलनेत त्यांचा हा स्ट्राइक रेट चक्क दुप्पट गणला गेला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही एकनाथ शिंदेप्रमाणेच अजितदादा पक्ष, चिन्ह, आमदार सारे काही घेऊन भाजपसोबत गेले. मात्र, थोरल्या पवारांचा आत्मविश्वास चक्क दुणावलेला दिसतोय. ते पायाला भिंगरी लागल्यागत फिरतायत. तरुण वर्गाचे मोहोळ त्यांच्याभोवती घोंघावताना दिसते. अनेक जण पवारांच्या राष्ट्रवादी प्रवेश करतायत. येणाऱ्या काळात जो काही निकाल लागेल तो शरद पवारांच्या राजकीय कारकीर्दीच्या झोळीत फक्त आणि फक्त यश घालणारा असेल. कारण त्यांच्याकडेही गमावण्यासारखे काहीच नाही.

अजित पर्वाचा खरा कस

काकांचे बोट धरून राजकारणात आले. काकांचे बोट धरून शेवटपर्यंत राजकारण केले. काकांनी स्थापन केलेल्या पक्षामध्ये आमदार, मंत्री ते उपमुख्यमंत्री सारीच पदे भूषवली. मात्र, तरीही अचानकपणे काकांवर सारा दोष लावला. नंतर पहाटेचा शपथविधी ते त्यानंतर काकांचा पक्ष, आमदार सारे काही घेऊन भाजपसोबत गेले.

अजित पवारांचे राजकारण इथवर खूप सुकर होते. मात्र, इथून पुढे त्यांना पदोपदी संघर्ष करावा लागेल. कारण लोकसभा निवडणुकीत त्यांना स्वतःच्या पत्नीलाही जिंकून आणता आले नाही. फक्त एक जागा कशीबशी मिळाली. सध्याची विधानसभा निवडणूक एकनाथ शिंदे यांच्याप्रमाणेच अजित पवारांचा खरा कस पाहणारी असेल.

जितकी कमाई करावी तितकीच कमीच, अशी अजित पवारांची स्थिती आहे. सर्वाधिकवेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झालेल्या अजितदादांना मुख्यमंत्री होण्यासाठी महायुतीतला सर्वात मोठा पक्ष म्हणून जागा जिंकून दाखवाव्या लागतील. तरच त्यांना जर खरेच आश्वासन मिळाले असेल, तर त्या पदावर दावा सांगता येईल. अन्यथा पंतप्रधान मोदींनी केलेल्या आरोपाचे किटाळ तेवढे मिटले, पण राजकीय कारकीर्द पणाला लागली, अशी अवस्था होऊ शकते.

काँग्रेसला गतवैभवाचा वेध

काँग्रेस फक्त तगणारा पक्ष आहे. कितीही संकटे येऊ द्या आणि जाऊ द्या. काँग्रेस आहे तशी राहिल, असे दिवंगत विलासराव देशमुख आपल्या भाषणात विशिष्ट शैलीत म्हणायचे. त्यांची भाषणे ऐकाला लोक दूरदूरवरून यायचे. आता काँग्रसमध्ये अशी सभा गाजवणारे नेते नाहीत आणि पक्षाचे जुने गतवैभवही नाही. मोदी-शहांच्या राजकारणापुढे देशातला प्रमुख पक्ष असणा?या काँग्रेसला स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी झुंजावे लागते आहे. इतके दिवस ज्यांना हिणवले गेले ते राहुल गांधी आता गांभीर्याने राजकारण करताना दिसतात. त्यांची भाषणे ऐकण्यासारखी असतात. त्यांची भारत जोडो यात्रा अभूतपूर्व होती. मात्र, तरीही पक्षाचा मताचा टक्का आणि जागा सत्तेत येण्यासारख्या वाढताना दिसत नाहीत. जिंकले-जिंकले अशा विश्वासात असताना हरियाना केसरी म्हणून ऐनवेळी भाजपने बाजी मारली.

मात्र, महाराष्ट्रात काँग्रेसचे भाजपसमोर मोठे आव्हान असेल. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने चक्क 1 खासदारावरून 13 जागांवर विजय मिळवला. तरीही हे काहीच नाही. कारण राज्य असो की देश स्वातंत्र्यलढ्यापासून या पक्षाने खूप काही गतवैभव पाहिले आहे. ते मिळवण्याचे ध्येय इतके सोपे दिसत नाही.

मनसे कधी उभारी घेणार?

शिवसेनेतून बाहेर पडून महाराष्ट्र निवनिर्माण सेनेची स्थापना केल्यानंतर झालेल्या 2009 मधील विधानसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी चक्क 13 जागा जिंकल्या. मात्र, त्यानंतर झालेल्या निवडणुकीत विधिमंडळात पक्षाचा फक्त एक आमदार असतो. ही संख्या वाढवणे हे राज ठाकरे यांच्यासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.

राज ठाकरे यांच्यावर पूर्णवेळ राजकारण करत नसल्याची टीका होते. ते फक्त निवडणुका आले की तयारीला लागतात, असे टोमणे सारेच राजकीय पक्ष मारतात. विशेष म्हणजे गेल्या काही वर्षांत त्यांनी मारलेल्या राजकीय कोलांटउड्या. लावरे तो व्हिडिओपासून ते मोदींचे कोडकौतुक. त्यांचे सारेच राजकारण बेभरवशाचे असेच म्हणावे लागेल.

नाशिक महापालिका ताब्यात असताना मनसेने चांगले काम केले. नाशिकचे रूप बदलले. खरे तर राज ठाकरे यांचा जाहीरनामा खूप चांगला असतो. दूरदृष्टी असणारा हा नेता. त्यांची भाषणे ऐकायला आजही हजारोंची गर्दी होते, पण तिचे मतात रूपांतर होत नाही. राज ठाकरे यांनी सुरुवातीच्या काळात पक्ष बांधणी केली. त्यानंतर तिकडे दुर्लक्ष झाले. आता मनसेची स्थापना झाल्यापासून गेल्या अठरा वर्षात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. आता मनसे कधी उभारी घेणार, हे काळच सांगेल.

वंचितच्या प्रयोगाला यशाची प्रतीक्षा

प्रकाश आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू. अतिशय अभ्यासू , सुजाण आणि उच्च विद्याविभूषित नेतृत्व. भारिप बहुजन महासंघाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष. महाराष्ट्रातल्या वंचित बहुजन आघाडीचे नेतृत्व त्यांनी अनेक सामाजिक, राजकीय आंदोलनाचेही नेतृत्व केले. अनेक राजकीय प्रयोग केले. मात्र, त्यांच्या राजकारणाला अजून तरी म्हणावे तसे भरघोस यश मिळालेच नाही.

ही निवडणूक तरी त्यांच्या पदरात जास्त जागा टाकणार का, हे पाहावे लागेल. विशेष म्हणजे प्रकाश आंबेडकर चोवीस तास राजकारण करतात. या विधानसभा निवडणुकीसाठीही सर्वात अगोदर उमेदवार यादी त्यांनीच जाहीर केली. रावेरमधून शमिभा पाटील हा ट्रान्सजेंडर उमेदवार त्यांनी दिला.

प्रकाश आंबेडकर प्रत्येक निवडणुकीत वेगळीचूल मांडतात. त्यामुळे काँग्रेससह इतर समविचारी पक्षाकडून प्रकाश आंबेडकर भाजपला अप्रत्यक्ष मदत करतात, असे आरोप होतात. मात्र, आरोप करणारे त्यांना सन्मानजनक जागा देत नाही, असे उत्तर आंबेडकरांच्या पाठीराख्यांकडे असते. काहीही असो, आता वंचितला कणखर राजकारण करायचे असेल, तर यशाच्या प्रतिक्षेला पूर्णविराम द्यावा लागेल.

तिसऱ्या आघाडीचा प्रयोग

राज्यामध्ये महायुती आणि महाविकास आघाडीला पर्याय म्हणून तिसरी आघाडी स्थापन करण्यात आली. त्यात शेतकरी नेते राजू शेट्टी, आमदार बच्चू कडू यांच्यासह युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या पक्षाचा समावेश आहे. संभाजीराजे छत्रपती यांनी निवडणूक आयोगाकडे नुकतीच आपल्या पक्षाची नोंदणी केली आहे. या आघाडीला परिवर्तन महाशक्ती असे नाव देण्यात आले आहे. या आघाडीच्या माध्यमातून राज्यातील 288 विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्याची घोषणा देखील करण्यात आली आहे. ही आघाडी या निवडणुकीत जादू दाखवते का, हे पाहावे लागेल.

जरांगे-हाकेंची जादू चालणार का?

ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी करणारे मनोज जरांगेंचा प्रभाव या निवडणुकीत किती पडणार, हे पाहणे औत्सुक्याचे असेल. जरांगे यांनी थेट भाजप आणि विशेषतः देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य करणे सुरू केले होते. आरक्षण नाही दिले, तर उमेदवार पाडू, अशी घोषणा त्यांनी केली.

मराठा आरक्षणासाठी त्यांनी सुरू केलेली बेमुदत उपोषणे सरकारने नाना चतुराईने सोडवली. शेवटी तर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी जरांगे यांच्या उपोषणाला विरोध म्हणून उपोषण सुरू केले. त्यामुळे जरांगे विरुद्ध हाके असा आरोप-प्रत्यारोपाचा सामना पाहायला मिळाला. हे दोन्ही घटक या निवडणुकीत कशी भूमिका निभावतील, राजकीय पक्षाचे उमेदवार पाडतील की एका विशिष्ट पक्षाला लक्ष्य करतील, हे पाहावे लागेल.

●●●●●●●●●

साधी राहणी, सोज्वळ स्वभाव असा दानवीर रतन टाटा

रतन टाटा हे एक भारतीय उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष होते. 1990 ते 2012 या काळात ते टाटा समूहाचे अध्यक्ष होते आणि ऑक्टोबर 2016 ते फेब्रुवारी 2017 या कालावधीत ते समूहाचे अंतरिम अध्यक्ष होते, तसेच त्यांच्या चॅरिटेबल ट्रस्टचे नेतृत्व करीत होते. ते पद्मविभूषण आणि पद्मभूषण या भारतातील दोन सर्वोच्च नागरी पुरस्कारांचे प्राप्तकर्ते आहेत.

रतन टाटा यांना 2000 मध्ये पद्मभूषण आणि 2008 मध्ये पद्मविभूषण, भारत सरकारचा तिसरा आणि दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. टाटा यांना 2006 मध्ये महाराष्ट्रातील सार्वजनिक प्रशासनातील त्यांच्या कामासाठी महाराष्ट्र भूषण आणि आसाममध्ये कर्करोगाच्या उपचारात योगदान दिल्याबद्दल 2021 मध्ये आसाम वैभव असे विविध राज्य नागरी सन्मानही मिळाले आहेत.

त्यांचा जन्म 28 डिसेंबर 1937 रोजी ब्रिटिश राजवटीत मुंबई येथे झाला होता. रतन हे नवल टाटा यांचे पुत्र आणि टाटा कुटुंबातील वंशज हाते, ज्यांना नंतर टाटा समूहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांचे पुत्र रतनजी टाटा यांनी दत्तक घेतले होते. टाटा समूहाचे संस्थापक जमशेदजी टाटा यांच्या भाची सूनी टाटा या त्यांच्या आई होत. टाटांचे आजोबा होर्मुसजी टाटा हे रक्ताने टाटा कुटुंबाचे सदस्य होते.

1948 मध्ये टाटा 10 वर्षांचे असतांना, त्यांचे आई-वडील विभक्त झाले तेव्हा आणि त्यानंतर त्यांचे संगोपन केले आणि रतनजी टाटा यांच्या आजी आणि विधवा नवजबाई टाटा यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यांना एक धाकटा भाऊ (जिम्मी टाटा) आहे आणि नोएल टाटा हे सावत्र भाऊ आहेत, जे त्यांच्या वडिलांच्या दुसऱ्या पत्नी सिमोन टाटा यांचे पुत्र आहेत. टाटा यांनी कधीही लग्न केले नाही आणि त्यांना मूलबाळ नव्हते. 2011 मध्ये त्यांनी सांगितले की, मी चार वेळा लग्न करण्याच्या जवळ आलो आणि प्रत्येक वेळी मी भीतीने किंवा एका कारणास्तव मागे हटलो.

मुंबईच्या कॅम्पियन स्कूलमध्ये त्यांनी आठवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल, शिमला येथील बिशप कॉटन स्कूलमध्ये शिक्षण घेतले. नंतर त्यांनी 1955 मध्ये न्यूयॉर्क येथील रिव्हरडेल कंट्री स्कूलमध्ये पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पदवी घेतल्यानंतर टाटा यांनी कॉर्नेल विद्यापीठात प्रवेश घेतला, ज्यामधून त्यांनी 1959 साली वास्तुशास्त्र मध्ये पदवी प्राप्त केली. कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलचे व्यवस्थापन कार्यक्रमाचे ते माजी विद्यार्थी होते. 1975 मध्ये त्यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या सात-आठवड्याच्या प्रगत व्यवस्थापन कार्यक्रमात भाग घेतला. कॉर्नेलमध्ये असतांना टाटा अल्फा सिग्मा फी फ्रेटरनिटीचे सदस्य बनले. त्यानंतर ते त्यांच्या कंपनीत रुजू झाले. तेव्हा ते टाटा स्टीलच्या शॉप फ्लोअरवर काम करायचे.

टाटा समूहाचे संस्थापक असलेल्या जमशेदजी टाटांचा नातू अशा पद्धतीने धडपड करतो आहे हे पाहून जे.आर.डी. प्रभावित झाले. आजीची तब्येत बिघडल्यामुळे तिला भेटायला भारतात आलेल्या रतन यांना जे.आर.डी. यांनी टाटा उद्योग समूहामध्ये येण्याचे निमंत्रण दिले. 1962 च्या डिसेंबर महिन्यात रतन टाटा समूहात दाखल झाले, मात्र समूहाच्या परंपरेनुसार 62 ते 71 त्यांना विविध कंपन्यांमध्ये काम करण्यास सांगण्यात आले. जमशेदपूरच्या टाटा स्टीलमध्ये अगदी कोळसा उचलण्यापासून ते भट्टीपाशी काम करण्यापर्यंतचे सर्व अनुभव घेतल्यानंतरच 1971 मध्ये त्यांच्याकडे टाटा समूहातील नेल्को या कंपनीची धुरा सोपविण्यात आली.

नेल्को ही त्यावेळी तोट्यात चालणारी कंपनी होती. रेडिओ आणि टेलिव्हिजनचे उत्पादन करणारी ही कंपनी पुढील तीन वर्षांमध्ये स्वतःच्या पायावर उभी करण्यात रतन टाटा यांनी यश मिळविले. संपूर्ण बाजारपेठेतील नेल्कोचा हिस्सा दोन टक्क्यांवरून वीस टक्के झाला, पण देशात आणीबाणी जाहीर झाली. पाठोपाठ आलेल्या मंदीमध्ये नेल्कोला आपल्या कामगारांच्या मागण्या मान्य करण्यात अपयश आले आणि ही कंपनी बंद पडली. रतन टाटा यांना अनुभवाला आलेले ते पहिले अपयश होते.

1977 मध्ये रतन टाटांवर एम्प्रेस मिल या टाटा समूहातील बंद पडावयास आलेल्या मिलची जबाबदारी सोपविण्यात आली. एम्प्रेस मिलच्या यंत्रसामग्रीमध्ये अनेक वर्षांमध्ये गुंतवणूक करण्यात आली नव्हती. कामगारांची संख्याही मोठी आणि त्याच्या तुलनेत उत्पादन तूटपुंजे असे चित्र असलेल्या या मिलमध्ये पन्नास लाख रुपयांची गुंतवणूक करण्याची विनंती रतन टाटा यांनी टाटा उद्योग समूहाला केली, पण नानी पालखीवाला, अजित केरकर आणि रुसी मोदी या संचालकांनी त्याला विरोध केल्याने अखेर ही मिलही बंद करण्यात आली. रतन टाटांच्या नावावर दुसरे अपयश जमा झाले. या सर्व प्रकारामुळे रतन टाटा चांगलेच दुखावले गेले होते, पण त्याचबरोबर अनुभवाच्या शाळेमध्ये बरेच काही शिकले होते.

1981 मध्ये जे.आर.डी. टाटा यांनी त्यांच्याकडे टाटा इंडस्टीजची सूत्रे सोपविली. त्याच वेळेस ते त्यांचे वारसदार आणि टाटा उद्योगसमूहाचे भावी प्रमुख असणार हे स्पष्ट झाले होते. 1991 मध्ये जे.आर.डी. यांनी स्वतःच उद्योगसमूहाची सर्व सूत्रे रतन टाटांकडे सोपवून निवृत्ती पत्करली.

त्यानंतर सुरू झालेली यशाची मालिका आणि नवे विक्रम अजूनही सुरूच आहेत. कोरस, जग्वार, टेटली आणि लँड रोव्हर सारख्या जगातल्या नामांकित कंपन्या टाटांनी खरेदी केल्या. त्यात 2000 मध्ये त्यांनी टाटा टी मिळवून टेटली विकत घेतली आणि जगातील सर्वात मोठी टी बेग्ज बनवणारी कंपनी निर्माण केली. 2004 मध्ये साऊथ कोरिया मधील डेवू कमर्शियल व्हेईकलला रतन टाटा यांनी विकत घेतले. टाटा मोटर्स घेऊन जग्वार लँड रोव्हर विकत घेतली आणि टाटा स्टील घेऊन कोरस कंपनीचे अधिग्रहण केले. 2007 मध्ये टाटा ने लंडनमधील कोरस ग्रुप ही स्टील कंपनी विकत घेतली, नंतर तिचे नाव टाटा स्टिल युरोप ठेवण्यात आले.

2008 मध्ये टाटाने कॉर्नेलला 50 दशलक्ष डॉलर भेट दिले, जे विद्यापीठाच्या इतिहासातील सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय देणगीदार बनले. याच काळात टाटा समूहाचे तत्कालीन प्रमुख जे.आर.डी. टाटा यांच्याशी त्यांची भेट झाली. त्यांनी मोठ्या प्रमाणावर भारत-केंद्री गटातील टाटा समूहाला जागतिक व्यवसायात रूपांतरित करण्याच्या प्रयत्न केला.

या भरारीनं देशातल्या तरुणांना नवी ऊर्जा दिली. मोठी स्वप्न पाहाणं आणि ती प्रत्यक्षात आणणं हा रतन टाटांचा स्वभाव होता. याच स्वप्नांमधून इंडिगो आणि नॅनोची निर्मिती झाली आणि कुठलीच गोष्ट अशक्य नाही, हे सुध्दा टाटांनी कतृत्वाने सिद्ध करुन दाखविले.

हे यश मिळवत असतांना टाटांनी कधीच आपल्या मुल्यांशी तडजोड केली नाही. यामुळंच सचोटी, गुणवत्ता म्हणजे टाटा हे समीकरण तयार झालंय. निवृत्तीनंतर ते नवउद्योजकांना प्रोत्साहन देत असतांना त्यांना श्वासोच्छवासामुळे गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आणि 7 ऑक्टोबर 2024 पासून त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. वय-संबंधित समस्यांमुळे 9 ऑक्टोबर 2024 रोजी वयाच्या 86 व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला.

त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र सरकार आणि झारखंड सरकारने एक दिवसाचा शोक जाहीर केला. 10 ऑक्टोबर रोजी टाटा यांचे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंतिम संस्कारादरम्यान त्यांना लष्करी आणि 21 तोफांची सलामी देण्यात आली. मुंबई पोलिसांनी समारंभपूर्वक ह्यगार्ड ऑफ ऑनरह्न दिला आणि त्यांचे पार्थिव भारतीय ध्वजात गुंडाळले गेले.

पद्मविभूषण रतन टाटा यांच्या निधनाने संपूर्ण देश हळहळला. तांत्रिक, औद्योगिक सर्वच क्षेत्रात टाटा समूहाचे नाव अग्रणी आहे. त्यांनी अनेकांना कौशल्य प्रदान करून रोजगार दिलेला आहे तसेच, त्यांचे विविध क्षेत्रांच्या व उद्योगांच्या विकासासाठी दिलेले योगदान हे अतुलनीय आहे, त्यामुळे भारतातील पहिला कौशल्य विद्यापीठास त्यांचे नाव मिळावे ही अतिशय सन्मानाची गोष्ट आहे.

त्याचबरोबर नवीन उद्योगांना सुद्धा त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेऊन सहकार्य केले. ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्या स्मृतींचे जतन करण्यासाठी आणि उद्योग क्षेत्रातील या महान विभूतीच्या कायार्ला आदरांजली देण्याच्या उद्देशाने नुकतेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

पद्मविभूषण रतन टाटा कौशल्य विद्यापीठ असे या विद्यापीठाचे नाव असेल. या नामकरणामुळे विद्यापीठाच्या माध्यमातून होणा?या तांत्रिक प्रगतीस चालना मिळेल आणि युवकांना रतन टाटा यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठात शिक्षण घेण्याचा अभिमान वाटेल. या विद्यापीठाच्या माध्यमातून उद्योगांना कुशल मनुष्यबळ पुरवणे तसेच नवोदितांच्या संकल्पनांना बळ देण्याचे उद्दिष्ट आहे. हा उद्देश रतन टाटा यांच्या विचारांचा आरसा असून त्याचे आचरण म्हणजेच त्यांच्या कायार्ला खरी आदरांजली आहे. देशातील एक आदर्श व्यक्तिमत्व, सुप्रसिद्ध उद्योगपती व टाटा समूहाचे अध्यक्ष रतनजी टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

■ ■ ■

प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

मुलींच्या प्रगतीतच समाजाची प्रगती

(आंतरराष्ट्रीय बालिका दिन सप्ताह विशेष)

आंतरराष्ट्रीय बालिका दिन दरवर्षी ११ ऑक्टोबरला साजरा केला जातो. हा दिवस मुलींच्या हक्कांसाठी आणि त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी महत्त्वाचा आहे. शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, आणि सामाजिक समानता यांसारख्या मुद्द्यांवर जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश या दिवसामागे आहे. विशेषतः विकसनशील देशांमध्ये मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणे, बालविवाह, आणि लैंगिक भेदभावासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

आंतरराष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने मुलींच्या शिक्षणावर जोर देऊन त्यांना संधी देण्याची गरज अधोरेखित होते. या दिवसाच्या माध्यमातून जगभरात मुलींच्या विकासासाठी धोरणात्मक उपक्रम राबवले जातात. मुलींना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी विविध सामाजिक संस्था, शाळा, आणि सरकारांकडून प्रयत्न केले जातात. समाजातील प्रत्येक मुलगी आपली स्वप्ने साकार करू शकेल, अशी समानता निर्माण करण्यासाठी हा दिवस महत्त्वपूर्ण आहे. मुलींच्या प्रगतीतच समाजाची प्रगती आहे, ही शिकवण या दिवसाद्वारे दिली जाते.

बालिका दिनाचे औचित्य साधण्यासाठी अनेक देशांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. काही युनायटेड नेशन्सद्वारे प्रायोजित आहेत, जसे की मुंबई, भारतातील मैफिली. गर्ल गाईड्स ऑस्ट्रेलिया सारख्या गैर-सरकारी संस्था, आंतरराष्ट्रीय मुलींच्या दिवसासाठी कार्यक्रम आणि उपक्रमांना देखील समर्थन देतात.

स्थानिक संस्थांनी त्यांचे स्वतःचे कार्यक्रम विकसित केले आहेत, जसे की गर्ल्स आणि फुटबॉल दक्षिण आफ्रिका, ज्यांनी सन २०१२मध्ये २० हजार महिलांनी सन १९५६च्या ब्लॅक सॅश मार्चच्या स्मरणार्थ मुलींच्या आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त टी-शर्टचे वितरण केले. सन २०१३मध्ये लंडनच्या साउथ बँकेवर एक दिवसभराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये बॉडी गॉसिप या संस्थेने तयार केलेले थिएटर आणि चित्रपट सादरीकरण होते, जे शरीराची प्रतिमा आणि मानसिक आरोग्य समस्यांवर मोहीम राबवते.

मुलींच्या पहिल्या दिवसासाठी हजारो व्यक्ती आणि संस्थांना ऑनलाइन एकत्र आणण्यासाठी सेज गर्ल आणि इट्वाज द्वारे एक आभासी कार्यक्रम विकसित केला गेला. सन २०१६ साली लंडनमध्ये वुमन ऑफ द वर्ल्ड-डब्ल्यूओडब्ल्यू फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये लंडनच्या २५० शालेय वयोगटातील मुलींना महिला मार्गदर्शकांसोबत जोडण्यात आले होते. तसेच सन २०१६मध्ये युनायटेड स्टेट्सचे राष्ट्राध्यक्ष, बराक ओबामा यांनी लिंग विषमता संपुष्टात आणण्यासाठी एक घोषणा जारी केली.

युनायटेड नेशन्सने घोषित केलेला आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा आंतरराष्ट्रीय दिवस आहे, याला मुलींचा दिवस आणि मुलींचा आंतरराष्ट्रीय दिवस असेही म्हणतात. दि.११ ऑक्टोबर २०१२ हा मुलीचा पहिला दिवस होता. हे निरीक्षण मुलींसाठी अधिक संधीचे समर्थन करते आणि त्यांच्या लिंगाच्या आधारावर जगभरातील मुलींना भेडसावणाऱ्या लैंगिक असमानतेबद्दल जागरूकता वाढवते.

या असमानतेमध्ये शिक्षण, पोषण, कायदेशीर हक्क, वैद्यकीय सेवा आणि भेदभावापासून संरक्षण, महिलांवरील हिंसाचार आणि बालविवाह यासारख्या क्षेत्रांचा समावेश होतो. दिवसाचा उत्सव देखील विकास धोरण, कार्यक्रम, प्रचार आणि संशोधनात मुली आणि तरुणींचा एक वेगळा समूह म्हणून यशस्वी उदयास प्रतिबिंबित करतो. आंतरराष्ट्रीय महत्त्व- शिक्षण, पोषण, सक्तीचे बालविवाह, कायदेशीर हक्क आणि वैद्यकीय अधिकार यासारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मुलींना भेडसावणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवणे हे आहे.

मुलीचा आंतरराष्ट्रीय दिवस जगभरातील मुलींना भेडसावणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवतो. अनेक जागतिक विकास योजना मुलींचा समावेश किंवा विचार करत नाहीत आणि त्यांचे मुद्दे ₹अदृश्यर बनतात. जगभरातील ६२ दशलक्षाहून अधिक मुलींना शिक्षणाची सोय नव्हती, इ.स.२०१४, यूएसएआईडी अनुसार. जगभरात आणि एकत्रितपणे ५ ते १४ वयोगटातील मुली त्याच वयोगटातील मुलांपेक्षा १६० दशलक्ष तास जास्त घरकामात घालवतात.

जागतिक स्तरावर, चार मुलींपैकी एका मुलीचे वय १८ वर्षापूर्वी लग्न केले जाते. दि.११ ऑक्टोबर २०१६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महिला सदिच्छा दूत एम्मा वॉटसन यांनी जगभरातील देश आणि कुटुंबांना जबरदस्तीने बालविवाह बंद करण्याचे आवाहन केले. जगभरातील अनेक मुली लैंगिक हिंसाचाराला बळी पडतात आणि गुन्हेगार अनेकदा मोका फिरतात.

मुलींचा दिवस केवळ मुलींना भेडसावणाऱ्या समस्यांबद्दलच नव्हे तर त्या समस्यांचे निराकरण झाल्यावर काय घडण्याची शक्यता आहे, याबद्दलही जागरूकता निर्माण करण्यात मदत करतो. उदाहरणार्थ, मुलींना शिक्षित केल्याने बालविवाह, रोगाचे प्रमाण कमी होण्यास मदत होते आणि मुलींना उच्च पगाराच्या नोकऱ्यांमध्ये प्रवेश मिळण्यास मदत करून अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होते.

कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
गडचिरोली,
9423714883.

●●●●●●●●●

त्याला जग पिकासो पेटींगप्रमाणे दिसायचं

कोणाला कसला आजार होईल याचा काही नेम नाही. मुंबईतील एका व्यक्तीला सहा महिने सभोवतालचं जग एका पेटींग प्रमाणे दिसायचं. प्रत्येक चेहरा आणि वस्तू चित्रविचित्र दिसायची.या दुर्दैवी स्थितीने त्यांचे जीवन भयानक बनले होते.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे सतरा डॉक्टर देखील त्यांच्या आजाराचा पत्ता लावू शकले नाहीत. काय होता हा विचित्र आजार ? ज्यात माणसाला सभोवतालचं जग देखील नीट दिसायचं नाही. एखाद्या अमूर्त चित्रकले सारखे जग दिसायचं ?

रुग्णांना चित्र विचित्र आजार होत असतात. अनेकांना शारीरिक आणि मानसिक आजार होता. एका व्यक्तीला चांगली झोप येत नव्हती. त्याअला चित्रविचित्र आणि घाबरवणाऱ्या स्थितीचा सामना करावा लागत होता.

पुणे स्थित सह्याद्री हॉस्पिटलमध्ये न्युरोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ.एन.आर. इचापोरिया यांनी सांगितले की, एक व्यक्ती माझ्या क्लिनिकमध्ये आला होता. त्याची तपासणी केली तेव्हा त्याला थोडा हलका ब्लडप्रेशर होते. त्याचा पायात थोडी हालचाल आणि अधून मधून झटके येत होते. परंतू त्याची सगळ्यात विचित्र तक्रार होती की त्याला सर्व काही चित्र विचित्र आणि भयानक दिसत होते.

त्याच्या असमान्य तक्रारीमुळे त्याला डॉ. एन.आर. इचापोरिया यांनी सभोवतालचं जग कसे दिसते याचे चित्र काढायला सांगितलं. त्याने काढलेले चित्र पिकासोच्या एखाद्या पेटिंग प्रमाणे होते. त्यामुळे त्याच्या मानसिक स्थितीचा अंदाज आला. त्यानंतर त्याच्या अनेक चाचण्या केल्या गेल्या. त्याला एक दुर्लभ ऑटोइम्युन आजार असल्याचे समजले. चाचण्यात CASPR2 एंटीबॉडी असल्याचे समजले. ज्यामुळे ऑटोइम्युन इंसेफेलाइटीस झाला होता.

काय आहे का दुर्लभ आजार?

या दुर्लभ आजाराने त्याच्या नर्व्हस सिस्टीमवर हल्ला होत होता. त्यामुळे त्याची दृष्टी आणि मेंदूत त्रास निर्माण होत होता. आम्ही तात्काळ उपचार सरु केले. त्याला इम्यूनोग्लोबुलिन आणि स्टिरॉईड दिले गेले. काही महिने त्याला बरे वाटले. पुन्हा नवीन लक्षणे दिसू लागली. शेवटी योग्य उपचाराने दुसऱ्यांदा त्याला बरे केले गेले. या स्थितीत समजले की ऑटोइम्यून या आजाराची ओळखण्यात सावधानता आणि आधुनिक तंत्राचा वापर करणे किती महत्वाचे आहे. ■

अक्षौकायन

बिगुल वाजला!

शंखनाद होताच भौ
सारेच पक्ष झाले सतर्क
विजय आमचाच होणार
स्वप्नवत मांडु लागले तर्क..

आरोप - प्रत्यारोपांच्या
झडतील आता फैरी
आश्वासनांचा पाऊसही
घेईल आता भरारी ...

मतांसाठी येतील उमेदवार
घेऊन हाती कटोरे
लेखाजोखा पाहूनच
मत दिले तर होईल बरे

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

अन्नदान: एक फारच पुण्याचे काम

कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.
गडचिरोली.
९४२३७१४८८३

आंतरराष्ट्रीय अन्न दिवस सप्ताह विशेष. अन्नाची नासाडी हा फक्त सामाजिक प्रश्न नाही तर पर्यावरणाचा प्रश्न आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत अन्नाची नासाडी रोखण्यासाठी ठोस पाऊल उचलले गेलेच पाहिजे. गरज आहे तितकेच अन्न शिजवले गेले पाहिजे. रियुज म्हणजे वस्तू दीर्घकाळ वापरा. रिसायकलिंग म्हणजे जुन्या वस्तूला नव्या वस्तू तयार करण्यासाठी वापर करा. या तीन तत्वावर अन्नाची नासाडी थांबून प्रत्येकापर्यंत अन्न पुरेशा प्रमाणात पोचेल. कारण अन्नाची बचत ही कुणा एकाची जबाबदारी नाही तर प्रत्येकाने या कामात सहभागी व्हायला हवे. अन्नाचे कंपोस्टिंग करणेही तितकेच महत्त्वपूर्ण आहे. अन्न बचतीसाठी स्टोरेज वाढवण्यासाठी प्रयत्न व्हायला हवे. गरज आहे तितकेच अन्न घ्या. तुम्ही जे पिकवता ते लगेच खाऊ शकत नाही. ते अन्न फ्रीझ करा किंवा उरलेले अन्न दुस ?यांच्या कामी पडू शकते असाही विचार करा. वस्तूंचा जास्तीत जास्त वापर करा. वस्तू दीर्घकाळ वापरता यायल्या हव्या. अन्नाचे कंपोस्टिंग करा. म्हणजे अन्नातील पोषण तत्व जमिनीत रूजवा. याच मातीतून स्वत:च्या भाज्या आणि फळे पिकवा. रिसायकलिंग म्हणजे जुन्या वस्तूला नव्या वस्तू तयार करण्यासाठी वापर करा. या तीन तत्वावर अन्नाची नासाडी थांबून प्रत्येकापर्यंत अन्न पुरेशा प्रमाणात पोचेल. कारण अन्नाची बचत ही कुणा एकाची जबाबदारी नाही तर प्रत्येकाने या कामात सहभागी व्हायला हवे. गरीब देशात पुरेसे अन्न मिळत नाही. जगात अजूनही काही गरीब देश आहेत. जिथल्या लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही. ती मोठ्या कष्टाने जगतात. इंटरनेटवर महत्त्वाच्या आणि अधिकृत वेबसाईटवरून माहिती घ्याल तर भूकबळींची आकडेवारी, कुपोषण आणि पर्यावरणातील बदल यावरूनच अन्न बचत किती आवश्यक आहे, हे सहज समजेल. म्हणूनच शास्त्रांत अन्नास पूर्ण ब्रह्म संबोधले गेले. ते जसे खावू, तशी आपली मनोवृत्ती बदलते. यासाठीच जागतिक अन्न दिन दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेची स्थापना प्रथम १९४५ मध्ये झाली. उपासमारीवर कारवाई करणे हा या संघटनेचा उद्देश होता. त्यानंतर १९७९ मध्ये पहिल्यांदा जागतिक अन्न दिन साजरा करण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जाऊ लागला. हा दिवस साजरा करण्याचे विशेष महत्त्व आहे. अन्न दिनानिमित्त अन्न सुरक्षा आणि पौष्टिक आहाराची गरज याबाबत लोकांना जागरुक केले जाते. कोणत्याही शरीराला निरोगी ठेवण्यासाठी पौष्टिक आहार अत्यंत आवश्यक आहे. आरोग्याची तसेच चवीची काळजी घेण्यासाठी आहारात पौष्टिक पदार्थांचा समावेश करणे अत्यावश्यक ठरते. ही संस्था अन्न सुरक्षा आणि पोषक तत्वांवर काम करते. संस्थेच्या प्रयत्नांमुळे १९७९ मध्ये जागतिक अन्न दिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि दि.१६ ऑक्टोबर १९८१ पासून जागतिक अन्न दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटने-फुड एण्ड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेशन-एफएओने जागतिक अन्न दिन हा उपक्रम सुरू केला. सन १९८१ मध्ये पहिल्यांदा जागतिक अन्न दिन साजरा केला गेला होता. त्यानंतर हा दिवस दरवर्षी जगभरात १५० हून अधिक शहरांमध्ये साजरा केला जातो. उपासमारी पिडीतांना मदत करणे तसेच अन्नाचे महत्व सर्वांना सांगणे हे उद्देश जागतिक अन्न दिनाचे आहेत. आमची कृती आमचे भविष्य-चांगले उत्पादन, चांगले पोषण, चांगले वातावरण आणि चांगले जीवन अशी सन २०२१ सालच्या जागतिक अन्न दिनाची थीम होती. सन १६ ऑक्टोबर १९४५ साली एफएओची स्थापना झाली. ही संघटना कृषी आणि खाद्य सुरक्षा या गोष्टींवर काम करते. या संघटनेचे मुख्य कार्य कुपोषणाचे प्रमाण कमी करणे हे आहे. याच अन्न आणि कृषी संघटनेने जगभरातील उपासमार आणि कुपोषणाने ग्रस्त लोकांबद्दल चिंता व्यक्त केली. त्यानंतर त्यांनी जागतिक अन्न दिन साजरा करण्याची घोषणा केली. सन १९८१ साली अन्न आणि कृषी संघटनेने जागतिक अन्न दिनाची स्थापना केली. दरवर्षी ही संस्था जागतिक अन्न कार्यक्रम आणि आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीद्वारे अन्नसुरक्षेचे महत्त्व अधोरेखित करण्याचे काम करते. संस्था या दिवसासाठी विशिष्ट थीम ठरवते. सन २०२२ वर्षी जागतिक अन्न दिनाची थीम कुणालाही मागे सोडू नका ही होती. आपण उत्पन्न घेतले, म्हणून कुण्या गरजवंतास न देता ते आपणच गरजेपेक्षा अधिक खाल्ले, तर अपाय होऊ शकतो. अजिबात अन्नाचा त्याग केला, तर प्रकृती ढासळत जाऊन शेवटी जगाचा निरोप घ्यावा लागतो. त्यामुळेच अन्न तारी, अन्न मारी! असे शहाणे लोक म्हणतात. अन्नाची नासाडी थांबवण्याचे हे आहेत तीन सोपे उपाय- अन्नाची नासाडी थांबवण्यासाठी न्यूट्रीशिएनालिस्ट लवनीत बोरा यांनी काही पर्याय सुचवले. अनेकजण सांगतात त्यापेक्षा अन्न नासाडी खूप मोठी समस्या आहे. आपल्या चुकीच्या सवयीमुळे नैसर्गिक स्रोतांवर अतिरिक्त ताण आणतो. यामुळे पर्यावरणाला नुकसान पोचते. अन्नाची नासाडी म्हणजे फक्त अन्न वाया घालवणे नव्हे तर धान्य, फळ-भाज्या पिकवण्यासाठी लागलेली मजूरी, श्रम, गुंतवणूक आणि स्रोतांचे नुकसान आहे. थोडक्यात काय तर अन्न वाया घालवणे म्हणजे पर्यावरणाचेही अपरिमित नुकसान आहे. होय या आपल्या बेजबाबदारपणामुळे आपण ग्रीन हाऊस उत्सर्जन आणि क्लायमेट चेंजसाठी जबाबदार ठरतो. हे थांबवण्यासाठी गरजेपेक्षा जास्तीचे म्हणजे अन्नाचा अनावश्यक साठा वा अतिरिक्त अन्न विकत घेणे बंद करायला हवे. जगातील अनेक देश सध्या दारिद्र्यरेषेखाली आहेत. या देशांतील लोकांना संतुलित आहार मिळत नाही. त्यामुळे बहुसंख्य जनता कुपोषित होत आहे. संतुलित आणि पौष्टिक आहाराच्या अभावामुळे लोक अनेक आजारांना बळी पडतात. कुपोषणाची समस्या दूर करणे आणि लोकांना संतुलित आणि पौष्टिक आहाराची जाणीव करून देणे या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. जागतिक अन्न दिनाचे महत्व असे, की गरीब लोकांना उपासमारी, कुपोषण या समस्यांचा सामना करावा लागतो. संतुलित आहार न घेतल्याने अनेकांचं कुपोषण होते, परिणामी मृत्युही ओढवतो. याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि ही समस्या कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचे काम जागतिक अन्न दिनाच्या निमित्ताने केले जाते. त्यामुळे जागतिक अन्न दिन हा खुप खुप महत्वाचा आणि अन्नबचत शिकविणारा आहे, हे पक्के मनात ठसवावे. हीच एक सार्थ अपेक्षा या लेखप्रपंचाद्वारे केली आहे.

ॲमेझॉनने भारतीय लघु उद्योगांसाठी अतिप्रगत तंत्रज्ञान आणि एआयविषयक नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी सादर केले संभव हॅकेथॉन

नवी दिल्ली, १६ ऑक्टोबर : ॲमेझॉन इंडियाने आज ॲमेझॉनसंभवहॅकेथॉनही स्पर्धा आयोजित करीत असल्याची घोषणा केली.ही ई-कॉमर्समधीलभारतीय लघु व मध्यम व्यवसायांकरीता (एसएमबी) अतिप्रगत तंत्रज्ञान आणि एआय आधारीत नवकल्पना तयार करण्यासाठीची देशव्यापी स्पर्धा आहे. ॲमेझॉनतर्फे भारतात पाचवी वार्षिक शिखर परिषद होत आहे. त्या निमित्ताने आयोजित झालेलेहॅकेथॉन हा ॲमेझॉनसंभवच्या कार्यक्रमाचा एक भाग आहे. भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वाढीस हातभार लावण्यासाठी देशभरातील नवकल्पकांना यामध्ये आमंत्रित करण्यात आले आहे.

ॲमेझॉनने स्टार्टअप इंडिया, डीपीआयआयटी, राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान (नॅशनल इनोव्हेशन फाऊंडेशन -एनआयएफ) आणि एनआयएफइन्क्युबेशनअँडआंत्रप्रुनर शिप कौन्सिल ()यांच्यासोबत भागीदारी केली आहे; जेणेकरून देशाच्या कानाकोपऱ्यातील नव्या दमाच्या, कल्पक युवकांच्या अफाट क्षमतेला वाव मिळावा. ही स्पर्धा विद्यार्थी, उद्योजक, तळागाळातील नवोन्मेषक, सेवा पुरवठादार, कार्यरत व्यावसायिक, लहान व मध्यम व्यवसाय आणि ईकॉमर्सची व्यापकपरिसंस्था यांसह वर्षांवरील सर्व भारतीय नागरिकांसाठी खुली आहे.ई-कॉमर्सच्या परिसंस्थेतील प्रमुख आव्हानांना तोंड देण्यासाठी भारताच्या नाविन्यपूर्ण प्रतिभेचा उपयोग करण्याचा प्रयत्न हॅकेथॉनमध्ये करण्यात येतो. विद्यमान विचारपद्धती बदलणारी एखादी कल्पना मनात असणारे महाविद्यालयीन विद्यार्थी, छोट्या गावातून काम करणारे उत्साही तंत्रज्ञ किंवा स्थानिक व्यावसायिक आव्हाने पेलणारे उद्योजक, अशा कोणालाही ई-कॉमर्सच्यापरिसंस्थेत अर्थपूर्ण बदल घडवून आणण्याची संधी हॅकेथॉनमध्ये मिळते.

लहान आणि मध्यम व्यवसायांना (एसएमबी) वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगात वाढण्यास मदत करणाऱ्या नवीन कल्पना तयार करणे हे हॅकेथॉनचे उद्दिष्ट आहे. उत्पादने सूचीबद्ध करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करणे, विविध चॅनेल्सवरून ऑर्डर पूर्ण करणे, आंतरराष्ट्रीय व्यापार सुलभ करणे आणि ऑनलाइन खरेदीसाठी पर्यावरणास अनुकूल उपाय शोधणे यांसारख्या समस्यांवर हॅकेथॉनमधील स्पर्धकांना काम करावे लागेल.

हॅकेथॉनचे अनेक टप्पे असतील. त्यांची सुरुवात कल्पना सादर करण्यापासून होईल आणि शीर्ष उद्योगातील नेत्यांसमोर डेमो डेसह समाप्त होईल. यात सहभागी होणाऱ्यांना त्यांच्या कल्पना आणि प्रोटोटाइप सुधारण्यासाठी तज्ज्ञांची मदत मिळेल. सर्वोत्कृष्ट तीन संघांना ॲमेझॉनच्या सिएटल मुख्यालयाची सहल आणि लाख रुपयांपर्यंतची रोख बक्षिसे मिळतील. विजेत्यांना ॲमेझॉनसंभव या परिषदेमध्ये सन्मानित केले जाईल. तेथेत्यांना व्यवसायांचे मालक, उद्योजक, धोरणकर्ते आणि जागतिक नेते यांच्यासमवेत स्थान मिळेल.

विज्ञान व तंत्रज्ञान, भूविज्ञान या खात्यांचे, तसेच पंतप्रधान कार्यालय, अणुउर्जा, अंतराळ, कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन या विभागांचे केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंहया निमित्ताने म्हणाले, समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खासगी कंपन्या आणि सरकार एकत्र कसे काम करू शकतात, हे एनआयएफ, , स्टार्टअप इंडिया, डीपीआयआयटी आणि ॲमेझॉन यांच्यामधील भागीदारीतून दिसून येते. भारतातील तळागाळातील इनोव्हेटर्स, विद्यार्थी, उद्योजक, व्यावसायिक आणि एसएमबी यांच्यासाठी सर्जनशील बनण्याची आणि ई-कॉमर्सचेभविष्य घडवण्याची ॲमेझॉनसंभव हॅकेथॉनही एक उत्तम संधी आहे.अशा उपक्रमांतून आणि भागीदारीतून आपण भारताला नाविन्यपूर्ण आणि प्रगत ई-कॉमर्स सोल्यूशन्सविश्वात अग्रणी बनण्यास मदत करू शकतो.

वर्ल्ड ट्रामा डे: जोखीम आणि प्रतिबंधात्मक उपाय

डॉ. रोमिल राठी, एमबीबीएस, एमएस ऑर्थोपेडिक्स, वोक्हार्ट हॉस्पिटल

नागपूर, १६ ऑक्टोबर : वर्ल्ड ट्रामा दिनानिमित्त डॉ.रोमिल राठी यांनी ट्रामाशी संबंधित धोकादायक दुखापतींबद्दल माहिती देताना सांगितले, बाईकर्स, विशेषत: मोटारसायकल किंवा सायकल वापरणाऱ्या तरुणांना बाईक चालवण्याचा अनुभव नसणे, धोकादायक आणि चीडखोर वागणूक आणि योग्य संरक्षणात्मक गियर न वापरणे यासारख्या कारणांमुळे ट्रामा-संबंधित दुखापत होण्याचा धोका जास्त असतो. जेव्हा या व्यक्ती ट्रॉमा सेंटरमध्ये येतात तेव्हा त्यांच्या सर्वात सामान्य दुखापतींमध्ये खालील जखमांचा समावेश असतो: या दुखापतींची तीव्रता अनेकदा अपघाताचा वेग, बाईकस्वाराने संरक्षणात्मक गियर घातले होते की नाही आणि अपघात ज्या वातावरणात झाला होता त्यावर अवलंबून असते. ट्रामा सेंटर्स सामान्यत: रुग्णाला त्याच्या सामान्य स्थितीत आणणे, पुढे येणाऱ्या दुखापती टाळणे आणि आवश्यक सर्जिकल किंवा नॉन-सर्जिकल उपचार सुरू करण्यावर लक्ष केंद्रित करतात. हेल्मेट, रिफ्लेक्टिव कपड़े आणि संरक्षणात्मक गियर घालणे तसेच वाहतूक नियमांचे पालन करणे यासारखे प्रतिबंधात्मक उपाय गंभीर दुखापत होण्याचा धोका लक्षणीयरीत्या कमी करू शकतात.

मानिनी डे साकारणार एक आव्हानात्मक भूमिका झी टीव्हीवरील रब से है दुआमध्ये

मुंबई, १६ ऑक्टोबर : लोकप्रिय अभिनेत्री मानिनी डे ही रब से है दुआ ह्या मालिकेमध्ये गझल ह्या एका शक्तीशाली आणि आव्हानात्मक भूमिकेमध्ये दिसून येणार आहे. अनेक टेलिव्हिजन शोज्आणि चित्रपटांमधील आपल्या उत्तम अभिनयासाठी मानल्या जाणाऱ्या मानिनीच्या ह्या मालिकेमधील प्रवेशासह आगामी ट्रॅकमध्ये अनेक नाट्यमय वळणे येतील. दुआ (रेमॉन कक्कर) च्या आयुष्यात गझलचे पुनरागमन होत असून त्यामुळे पुन्हा एकदा दुआच्या आयुष्यात प्रचंड उलथापालथ होणार आहे. मानिनी म्हणाली, जेव्हा माझ्याकडे ही भूमिका आली तेव्हा माझ्या असे लक्षात आले की हे एक असे आव्हान असणार आहे जे स्वीकारायला मला निश्चितच आवडेल. जर व्यक्तिरेखा आव्हानात्मक नसेल तर मला मजा येत नाही. विभिन्न व्यासपीठांवर अनेक वर्षांपासून मी काम करत आले असून पुन्हा एकदा जिथून ह्या सगळ्याची सुरूवात झाली तिथे परतताना घरी आल्यासारखे वाटत आहे. हे केवळ महत्त्वपूर्ण पुनरागमन नसून ह्या उद्योगातील माझ्या जवळच्या मैत्रिणी रेमॉन आणि अलका दी यांच्यासोबतची पुनर्भेटही आहे. मी त्यांना गेल्या कित्येक वर्षांपासून ओळखत असून आम्ही जवळच्या मैत्रिणी आहोत. पुन्हा एकदा त्यांच्यासोबत चित्रीकरण करताना अनेक जुन्या आठवणी जाग्या होत असून अतिशय आनंदाने भरलेला अनुभवही प्राप्त होत आहे. ती पुढे म्हणाली, इथे प्रत्येक भूमिका ही नवीन काहीतरी शिकण्याची संधी प्रदान करत असते आणि रब से है दुआमुळे मला गझलच्या रूपात माझ्या कलेची एक वेगळी बाजू शोधता येणार आहे. झी टीव्हीवर परत येताना मी अतिशय उत्साहात असून प्रेक्षकांनी आमची ही मालिका पाहावी यासाठी उत्सुक आहे. तसेच, एलएसडी आणि मी मोठ्या काळापासून एकत्र काम करत असून पुन्हा एकदा त्यांच्यासोबत काम करताना आणि रब से है दुआचा हिस्सा बनताना मी अतिशय रोमांचित आहे. प्रतीक आणि पार्थसोबत काम करण्यासाठी आणि नवीन उच्चांक प्रस्थापित करण्यासाठी मी उत्सुक आहे.

आजचे राशिभविष्य

मेष : या राशीच्या लोकांनी आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे. पत्नीसोबत अधिक काळ घालवा. पत्नीला वेळ द्या. काही लोकांना आज राजकीय लाभ मिळण्याची शक्यता आहे. जीवनात संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करा.

वृषभ : नव्या प्रोजेक्टवर काम करण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या मनातील भावना आज जाहीर करा. नाही तर नंतर वेळ निघून गेलेली असेल.

मिथुन : पार्टनरला तुमच्या मनातील गोष्टी स्पष्ट करण्यासाठी वेळ काढा. घरात वाद होण्याची शक्यता आहे. नोकरदार महिलांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे.

कर्क : रागावर नियंत्रण ठेवा. गावाकडे जाण्याचा योग आहे. मल्टिनॅशनल कंपनीत काम करणाजयांना परदेशात जाण्याचा योग आहे. अडकलेला पैसा आज परत मिळण्याची शक्यता आहे.

सिंह : नव्या आव्हानांचा सामना करताना घाबरू नका. विपश्यना आणि योगाद्वारे मानसिक संतुलन चांगलं राखण्याचा प्रयत्न करा. कोणत्याही व्यक्तीशी विनाकारण भांडू नका.

कन्या : नव्या संधी मिळवण्यासाठी तुम्हाला कंबर कसावी लागणार आहे. नाही तर अडचणींचा डोंगर वाढत जाईल. दुसजयांच्या भांडणात लक्ष देऊ नका,

तुळ : काही मित्रांचे घरी आगमन होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती चांगली झाल्यावरच गुंतवणूक करा. गुंतवणूक करताना आर्थिक सल्लागाराची मदत घ्या. कुटुंबातील वादापासून दूर राहा.

वृश्चिक : शिस्तबद्ध पद्धतीने आयुष्य मार्गी लावा. वायफळ खर्च करू नका. धाडसाने पुढे या, तुम्हीही काही तरी करून दाखवू शकता हे जगाला दाखवा. आज धार्मिक स्थळांना भेट देण्याची शक्यता आहे.

धनु : आर्थिक बाबींमध्ये काही संबंध बिघडू शकतात. त्यामुळे व्यवहाराशी संबंधित कामांमध्ये सावधगिरी बाळगा. नकारात्मक विचारांना तुमच्यावर हावी होऊ देऊ नका, तुमच्या कार्यपद्धतीत बदल घडवून आणा.

मकर : आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी तुमच्या पार्टनरचा सल्ला घ्या. नव्या संधी आणि बदलांना सामोरे जा. करिअर अत्यंत उज्ज्वल होणार आहे. तुमचे स्टार जोरात आहेत.

कुंभ : तुमच्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी ही योग्य वेळ आहे, त्यामुळे वेळेवर मर्यादा घाला आणि कामाला गती द्या. वडिलोपार्जित मालमत्तेशी संबंधित प्रकरणे सोडवण्यासाठी वरिष्ठ सदस्याकडून मार्गदर्शन मिळेल.

मीन : आज तुम्हाला प्रचंड थकवा जाणवेल. अस्वस्थ वाटू लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे लगेच डॉक्टरकडे जा. आरोग्याकडे विशेष लक्ष द्या. नवी जबाबदारी घेण्याचा हा योग्य काळ आहे.

विदिशा श्रीवास्तव यांची विशेष करवा चौथ साजरीकरण योजना!

मुंबई, १६ ऑक्टोबर : एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये अनिता भाबीची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय असलेल्या विदिशा श्रीवास्तव उत्साहात करवा चौथ साजरा करण्याकरिता सज्ज आहेत. विदिशा सांगतात की सयक पॉल यांच्यासोबत विवाह होण्यापूर्वी देखील हा सण त्यांच्यासाठी खूप खास राहिला आहे. गप्पागोष्टी करताना त्यांनी यंदाच्या करवा चौथबाबत त्यांच्या योजना आणि त्या कशाप्रकारे या दिवसाला संस्मरणीय करणार आहेत याबाबत सांगितले. यंदा करवा चौथसाठी तुमच्या काही विशेष योजना आहेत का? करवा चौथ माझ्यासाठी नेहमी उत्साही सण राहिला आहे आणि यंदा, मी माझ्या पतीसाठी वधू म्हणून पेहराव करत या सणाला अधिक खास करण्याचे ठरवले आहे (हसते). मला अनेक कारणांसाठी हा सण आवडतो, त्यापैकी एक म्हणजे आकर्षक साडी नेसायला मिळते व सोलाह शृंगार (सोळा आभूषणे) करायला मिळतो. दरवर्षी, मी या सणासाठी विविध लाल रंगछटांमधील साडीची निवड करते आणि त्यासाठी शॉपिंगचा आनंद घेते. पण यावेळी, मी माझ्या विवाहाच्या दिवसाचा पोशाख पुन्हा परिधान करणार आहे, तो म्हणजे आकर्षक लाल रंगाची चुनरी. माझ्या पतीने पुन्हा मला वधूच्या पोशाखामध्ये पाहिल्यानंतर मी त्याची प्रतिक्रिया पाहण्यासाठी उत्सुक आहे. करवा चौथ हा वर्षातील असा दिवस आहे, जेव्हा आपण आपल्या पतीसाठी वधू प्रमाणे पेहराव करतो आणि प्रेमाला साजरे करतो.

गुरूवार १७ ऑक्टोबर २०२४

खुल जा सीम सीम
जबरदस्त पास होणारे चांसेस

कल्याण बाजार				मुंबई बाजार			
१	२	५	८	४	५	६	९
३८०	५८९	१२२	१७०	१४९	३६६	१२३	१९९
४७०	६७९	४५६	३६९	२४८	४४७	२६८	२३४
५६०	११०	७९९	२८८	३४७	२६७	३६७	३८८
१०	२०	५६	८६	४२	५१	६०	९०
१९	२९	५३	८३	४७	५७	६२	९२
१७	२७	५४	८६	४३	५३	६८	९८

१७ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी

३१	६१	७८	०८
३५	६५	७४	०४
३९	६९	७२	०२

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

HDFC BANK
We understand your world

नोंदणीकृत कार्यालय: एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई - ४०००१३ आणि त्याचे एक कार्यालय आहे एचडीएफसी बँक लिमिटेड, पहिला मजला येथे रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन आय-थिंक टेक्नो कॅम्पस, कांजूरमार्ग (पूर्व), मुंबई - ४०००४२.

लिलाव विक्री सूचना

कर्जदार (ज्याचे तपशील खाली दिलेल्या तक्त्यामध्ये येथे दिले आहेत) आणि विशेषत: आणि सर्वसाधारणपणे लोकांना हे कळवले आहे की खाली उल्लेखित कर्जदार परतफेडीसाठी थकीत आहेत आणि कर्जदार खातेदार / ने प्रतिसाद दिला नाही एचडीएफसी बँक लिमिटेडने ('बँक') पाठविलेल्या संप्रेषण आणि नोटिसांचे पालन केले तर कर्जदाराने स्वाक्षरी केलेल्या / स्वीकारलेल्या खाली दिलेल्या कर्जाच्या संदर्भात कागदपत्रांनुसार आपली देय देण्याची विनंती करणाऱ्याला विनंती केली जाते (अशी कागदपत्रे एकत्रितपणे 'कर्ज करार') आणि म्हणून त्यासंदर्भात डीफॉल्ट केले. बँकेने तारण म्हणून आपल्या हक्कांचा उपयोग केला आहे, तारणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे आणि म्हणूनच विक्री केलेल्या कर्जाची सुरक्षितता म्हणून बँकेला तारण म्हणून ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांची सार्वजनिक लिलाव रोखण्यासाठी व थकीत देय रक्कम वसूल करण्यासाठी / बसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. कृपया खाली दिलेल्या लिलावाच्या वेळापत्रकाचा संदर्भ घ्या जर कोणत्याही तारण ठेवलेल्या सुरक्षेचा लिलाव वर नमूद केलेल्या तारखेला आयोजित किंवा समाप्त केला जाऊ शकत नाही. पुढील कोणत्याही तारखेला या लिलावाचे आयोजन किंवा पुढे जाण्याचा अधिकार बँकेकडे आहे.

लिलाव दिनांक	कर्ज क्रमांक	कर्जदाराचे नाव	कर्ज रक्कम	लिलावाचे ठिकाण
23-Oct-24	75398052	योगिता गिरधारीलालजी अग्रवाल	353500	सेठी हाईट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१
23-Oct-24	74273642	अस्मा तमकानात रेयाजोद्दीन	337000	सेठी हाईट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१
23-Oct-24	74353378	दीपकसिंग इंद्रसिंग मोरे	299900	एचडीएफसी बँक लि. दीपक ट्रेडिंग जवळ, बसस्टँडच्या पुढे, एस नंबर २५५/डी, जिल्हा - बुलढाणा, मलकापूर, महाराष्ट्र४४३१०१
23-Oct-24	73665492	सुशांत वुष्णू इंगळकर	289500	व्हीनस प्लाझा, शेगाव नाका, अमरावती, महाराष्ट्र ४४४६०४
23-Oct-24	74622046	मोहम्मद अदनान मोहम्मदमीन	288000	ध्रुव मार्ट, एसबीआय मुख्य शाखेजवळ, खामगाव, महाराष्ट्र ४४४३०३
23-Oct-24	74290525	रोहित गुरुमुख केशवानी	240000	तळमजला, चोरडिया हाऊस, जुना एसबीआय रोड, जिल्हा- यवतमाळ, वणी, महाराष्ट्र ४४५३०४
23-Oct-24	74378743	आकाश सुधाकर खरबडकर	230900	ओम निवास, मेन रोड, जिल्हा-अकोला, मूर्तिजापूर, महाराष्ट्र ४४४१०७
23-Oct-24	74407651	योगेश सखाराम घुगे	146600	एस. क्र २/१, प्रभाग क्रमांक ०२, चिखली रोड, देऊळगाव राजा, जिल्हा - बुलढाणा, देऊळगाव राजा, महाराष्ट्र४४३२०४
23-Oct-24	74379373	भव्य मयूर बलवानी	132700	महेश भवन समोर, पोस्ट-कारंजा (लाड), जिल्हा-वाशिम, कारंजा, महाराष्ट्र ४४४१०५
23-Oct-24	74336045	ज्योत्सना विष्णू गुर्जर	121100	दुर्गा चॅंबर्स, बस स्टँड रोड, जिल्हा - अकोला, अकोट, महाराष्ट्र ४४४१०१
23-Oct-24	75224755	किरण विष्णुजी गोडमारे	120000	निर्मल बेकरी स्क्रेअर, समोर. बँक ऑफ महाराष्ट्र, वर्धा, महाराष्ट्र ४४२००१
23-Oct-24	73142705	हेमंत चिखाराम	120000	एचडीएफसी बँक लि., भारुका भवन, समोर. यशवंत स्टेडियम, धंतोली, नागपूर, महाराष्ट्र
23-Oct-24	75360116	हेमंत रामाजी भगत	119000	एचडीएफसी बँक लिमिटेड प्लॉट नं. २२५, २२६, एमपीएलएच नं. ८२, नझुल शीट नं. २७, ब्लॉक नंबर ११, न्यू शिवाजी वार्ड, हिंगणघाट, महाराष्ट्र४४२३०१
23-Oct-24	73755806	सुशांत विष्णू इंगळकर	119000	व्हीनस प्लाझा, शेगाव नाका, अमरावती, महाराष्ट्र ४४४६०४
23-Oct-24	74385008	विक्री रामभाऊ भारसाकळे	116000	अडगोकर कॉम्प्लेक्स, एपीएमसी मार्केट समोर, अंजनगाव, सुर्जी, जिल्हा अमरावती, अंजनगाव सुर्जी, महाराष्ट्र ४४४७०५
23-Oct-24	74735526	हर्षल सदाशिव ठाकरे	114000	सेठी हाईट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१
23-Oct-24	73533990	नितेश अनंतराव धुर्वे	102500	पोकामा टॉवर्स, महादेव मंदिर रोड, समोर. पोस्टल ग्राउंड, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५००१
23-Oct-24	74369708	भव्य मयूर बलवानी	101800	महेश भवन समोर, पोस्ट-कारंजा (लाड), जिल्हा-वाशिम, कारंजा, महाराष्ट्र ४४४१०५
23-Oct-24	74122998	शेषराव विठोबा मोहादरकर	96000	एचडीएफसी बँक लिमिटेड प्लॉट नं. २२५, २२६, एमपीएलएच नं. ८२, नझुल शीट नं. २७, ब्लॉक नंबर ११, न्यू शिवाजी वार्ड, हिंगणघाट, महाराष्ट्र ४४२३०१
23-Oct-24	74356212	प्रदिप मधुकर मोरे	95000	श्री दत्त कॉम्प्लेक्स, शुभम हार्डवेअर याशिवाय, डोणगाव रोड, मेहकर, मेहकर. महाराष्ट्र ४४३३०१
23-Oct-24	75061780	गजानन केसू पवार	92000	एस. क्र २/१, प्रभाग क्रमांक ०२. चिखली रोड, देऊळगाव राजा, जिल्हा-बुलढाणा, देऊळगाव राजा, महाराष्ट्र ४४३२०४
23-Oct-24	74355912	भोलेश्वर रामकृष्ण गावंडे	90900	महेश भवन समोर, पोस्ट-कारंजा (लाड), जिल्हा-वाशिम, कारंजा, महाराष्ट्र ४४४१०५
23-Oct-24	74883147	तुषार श्रीकृष्ण चपाटे	84000	व्हीनस प्लाझा, शेगाव नाका, अमरावती, महाराष्ट्र ४४४६०४
23-Oct-24	74357637	सुजाता सुशील तोबरे	83600	सेठी हाईट्स, जिल्हा परिषदेसमोर, अकोला, महाराष्ट्र ४४४००१
23-Oct-24	73971646	अहतेशामखान हफिजुल्लाखान	81200	महेश भवन समोर, पोस्ट-कारंजा (लाड), जिल्हा-वाशिम, कारंजा, महाराष्ट्र ४४४१०५
23-Oct-24	74418714	आकाश मधुकर बहनिया	78000	एचडीएफसी बँक लिमिटेड, फॉलीमार्केट, मेन रोड, काटोल, महाराष्ट्र
23-Oct-24	74400593	गोपाळ मधुकर बोरापी	75800	ध्रुव मार्ट, एसबीआय मुख्य शाखेजवळ, खामगाव, महाराष्ट्र ४४४३०३
23-Oct-24	74399600	गजानन चंद्रभान मडावी	75000	तळमजला, चोरडिया हाऊस, जुना एसबीआय रोड, जिल्हा- यवतमाळ, वणी, महाराष्ट्र ४४५३०४
23-Oct-24	74385858	पवन दिलीपराव गुल्हाने	74000	पोकामा टॉवर्स, महादेव मंदिर रोड, पोस्टल ग्राउंड समोर, यवतमाळ, महाराष्ट्र ४४५००१
23-Oct-24	74335450	सुनील गोपीचंद अलोणे	73000	एचडीएफसी बँक लि., तळमजला, प्लॉट क्रमांक ११९, प्रथम फॅशन मॉल, पटेल वार्ड, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली, मह

बँक मॅनेजरच्या घरातच चोरट्यांनी मारला डल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, पुसद दि. १६ :**

बँक मॅनेजरचे घर फोडून चोरट्यांनी तब्बल सव्वा दोन लाखाचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना शहरातील पवन नगरात सोमवारी दि. ऑक्टोबर रोजी दोन वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात चौकशी अंती शहर पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, बँक मॅनेजरची पत्नी दीपिका ओजस वाळले (वय) वर्ष रा. मंगलमूर्ती नगर यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनूसार, दीपिका यांचे पती जन संघर्ष अर्बन बँकेत मॅनेजर असून ते बाहेरगावी काम करतात. अशातच दीपिका घराच्या दरवाजाला कुलूप कोंडा लावून त्यांच्या माहेरी गेल्या होत्या. घरात कोणीही नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाज्याला लावलेला कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटात ठेवलेले दोन लाख पाच हजार रुपयांचे सोन्याचे दागीने, हजार रुपये किंमतीचे चांदीचे दागिने असा एकूण दोन लाख हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही बाब सोमवारी घरी आल्यानंतर वाळले कुटुंबीयांच्या लक्षात आली. या घटनेची माहिती पुसद शहर पोलिसांना देण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. या प्रकरणी पुसद शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात विविध कलमान्वये गुन्हे नोंद केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शहर पोलिस करीत आहेत.

महाविकास आघाडीत तिढा!

चारदा पराभव, तरीही काँग्रेस हट्ट सोडेना

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा दि. १६ :**

जिल्ह्यातील सातपैकी सहा जागांवर महाविकास आघाडीचे मतैक्य झाले असले तरी जळगाव जामोद मतदारसंघाचा तिढा कायमच आहे. या जागेसाठी शरद पवार आग्रही असून त्यांनी ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडण्याचा आग्रह धरल्याचे वृत्त आहे. दुसरीकडे, मागील सलग चार लढतीत दारुण पराभव होऊनही काँग्रेस ही जागा सोडायला तयार नसल्याचे चित्र आहे. २००४ ते २०१९ दरम्यानच्या चार लढतीत काँग्रेसचा या मतदारसंघात दारुण पराभव झाला आहे. यातील दोन लढतीत तर काँग्रेस चक्क तिसऱ्या क्रमांकावर होती. भारिप बहुजन महासंघाने दोनही लढतीत दुसऱ्या क्रमांकाची मते घेतली होती. रामविजय बुरुंगले सलग दोनदा पराभूत झाल्यावर २०१९ च्या लढतीत काँग्रेसने स्वाती वाकेकर यांना संधी दिली. मात्र, त्या ४० हजारांच्या फरकाने पराभूत झाल्या. विस्कळीत संघटन, गटबाजी, नेत्यांचा सुकाळ, सत्ताधाऱ्यांशी जुळवून घेण्याचे धोरण, आंदोलनापासून घेतलेली फारकत, आदी कारणांमुळे काँग्रेस या मतदारसंघात दिवसेंदिवस दुबळी होत राहिली. मात्र, यंदाही काँग्रेस जळगावसाठी आग्रही आहे. यावर कळस म्हणजे, यंदा चार पाच नव्हे तर तब्बल २२ उमेदवार इच्छुक आहेत. बुलढाण्यात पार पडलेल्या मुलाखतींत बहुतेक इच्छुक हजरही होते. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांचे बुलढाणा जिल्ह्याशी जुने ऋणानुबंध राहिले असून त्यांचा जिल्ह्यात मोठा चाहता वर्ग आहे. सिंदखेडराजापुरता मर्यादित पक्षाचा विस्तार संपूर्ण जिल्ह्यात करण्याच्या दृष्टीने पक्षाने जळगावावर मागील काही वर्षांपासून लक्ष केंद्रित केले. जिल्हा कार्याध्यक्ष ड. प्रसेनजीत पाटील यांना पाठबळ दिले. पाटील यांनी मागील वर्षभरात आंदोलनाचा धडाका लावत भाजप आमदार संजय कुटे यांच्या विरोधात आवाज उठवला. जळगाव बाजार समितीचे सलग पाचव्यांदा सभापती असलेले पाटील हे पणन महासंघाचे राज्य उपाध्यक्ष आहेत. २००९ मध्ये भारिपकडून लढतानाही तुल्यबळ मते मिळवत त्यांचा भाजपचे संजय कुटे यांच्याकडून ४०४७, तर २०१४ मध्ये ४६९५ मतांनी निसटता पराभव झाला होता. त्यानंतर ते राष्ट्रवादीत आले. सिंदखेडराजाचे आमदार राजेंद्र शिंगणे यांनी अनपेक्षितपणे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात जाऊन पक्षाला धक्का दिला. यामुळे आणि मतदारसंघातील अनुकूल स्थितीमुळे शरद पवार जळगावसाठी आग्रही आहेच. हरियाणा राज्यातील पराभवामुळे काँग्रेस बॅकफूटवर आल्याने राष्ट्रवादी जळगावसाठी आता आक्रमक झाली आहे.

भरपाई देऊन शेतकऱ्यांची दिवाळी गोड करा

माजी आमदार विजयराज शिंदे यांचे निवेदन

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा दि. १६ :**

जिल्ह्यात मागील तीन ते चार दिवसांपासून वादळी वारा व पावसाने थैमान घातले आहे. बुलडाणा व मोताळा तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची माजी आमदार विजयराज शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन १४ ऑक्टोबर रोजी पाहणी केली. आज १५ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन नुकसान भरपाईच्या मागणीचे निवेदन सादर करतांना शेतकऱ्यांची दिवाळी गोड करा, अशी विनंती केली. प्रातिनिधिक स्वरूपात माजी आमदार विजयराज शिंदे यांनी मोताळा तालुक्यातील पिंपळगाव देवी, महाळुंगी, वडगाव या गावात झालेल्या नुकसानीचे शेतकऱ्यां समवेत शेत बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. दरम्यान, परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. निवेदनात नमूद आहे की, झालेले नुकसान हे भयावह असून शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात घालणारे आहे. ऐन सणासुदीच्या काळात तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिसकावल्याने शेतकऱ्यांना आत्महत्येची वेळ या नुकसानीने आणून ठेवली आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करावे त्यांची दिवाळी गोड करावी अशी आग्रही मागणी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन सादर करताना भाजप प्रदेश प्रतिनिधी दीपक वारे, चंद्रकांत बर्दे, सचिन शेळके, अनंता शिंदे यांची उपस्थिती होती.

मानधनात वाढ, मात्र तरीही या लाडक्या बहिणी नाराजच

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा दि. १६ :**

राज्यातील महिला वर्गासाठी जे जे करता येईल त्याची घोषणा राज्य सरकार करून चुकले. लाडकी बहिण योजना चांगलीच गाजली. पण याच शासनाच्या अख्तयारीत काम करणाऱ्या काही भगिनी मात्र शासन निर्णयाने नाराजीत गेल्या आहेत. निवडणूक घोषित होण्यापूर्वी ऑक्टोबरला निघालेला हा आदेश अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना नाराज करणारा ठरल्याची भावना पुढे आली आहे.

या महिला कर्मचाऱ्यांना १ ऑक्टोबरपासून विविध श्रेणीत ३ ते ५ टक्के वाढ देण्यात आली. या निर्णयाने त्या सुखावल्या. पण १४ ऑक्टोबरच्या आदेशाने दुखावल्या आहेत. या आदेशानुसार त्यांच्या कामाच्या वेळेत दोन तासांनी वाढ करण्यात आली आहे. एकात्मिक बालविकास सेवायोजना विभागाने हा आदेश जारी केला आहे. पूर्वी कामाचे चार तास होते. ते आता सहा तास करण्यात आले आहे. या महिला कर्मचाऱ्यांच्या मते हि आता अधिकृत वाढ झाली. पण आताही चार तासापेक्षा अधिक काळ थांबवून विविध सेवा कामे करवून घेतातच. १ वाजता सुट्टी मिळत नव्हती. चार वाजेपर्यंत कामे पूरत होती. आता अधिकृत दोन तास वाढविल्याने अनधिकृतपणे वेळेत अधिक वाढ होण्याची भीती आहे. गरोदर महिला व स्तनदा माता तसेच कमी वजनाच्या कुपोषित बालकांना द्यायच्या सेवा, आहार व आरोग्य विषयक मार्गदर्शन, समुपदेशन व अन्य कार्ये या सेविका व मदतनीस महिलांना करावी लागतात. या कर्मचाऱ्यांसाठी विविध आंदोलने करणाऱ्या आयटक संघटनेचे नेते दिलीप उटाणे म्हणतात वेळ वाढविणे चुकीचे आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीबाबत सरकारने घोषणा केली ५००० रुपये अंगणवाडी सेविकेला व ३००० हजार रुपये मदतनीसाला वाढ केली असे जाहीर केले. परंतु प्रत्यक्षात अंगणवाडी सेविकेला ३००० व मदतनिसांना २००० एवढीच वाढ केली. त्यातही कामाचे दोन तास वाढविले. त्यामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना पूर्ण वेळ कर्मचारी करून टाकलं. हे खेद जनक आहे. शासनाने पूर्ण कर्मचाऱ्यांच्या दर्जा देऊन वेतनश्रेणी द्यायला पाहिजे. अंगणवाडी कर्मचारी शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राहण्यास तयार आहेत. एक प्रकारे कामाचे तास वाढवून अंगणवाडी कर्मचाऱ्यांची थट्टाच केली आहे नाही कां ? असा प्रश्न निर्माण होतो. आता आचार संहिता लागली त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या मागणीसाठी येणाऱ्या सरकार कडे पाठपुरावा करावा

शेतीत मुरादपूर अग्रेसर राहण्यासाठी काम करा

कुलगुरू शरद गडाख यांची शिवार फेरी

■ **महासागर प्रतिनिधी, बुलडाणा दि. १६ :**

शेती तंत्रज्ञानामध्ये मुरादपूर हे गाव अग्रेसर कसे राहील या बाबत काम करावे असे आवाहन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. मौजे मुरादपूर, तालुका चिखली येथे कृषि विज्ञान केंद्र बुलडाणा च्या माध्यमातून शेतकऱ्यांसोबत शिवारफेरी तसेच चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख बोलत होते. यावेळी संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, कुलगुरू यांचे तांत्रिक सचिव डॉ. नितीन कोष्टी, विज्ञान केंद्राची वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अनिल तारू, कृषी विभागाच्या सहाय्यक सवडतकर यांची उपस्थिती होती. कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब शेतकऱ्यांनी करावा आणि स्वतःची प्रगती साधावी याकरिता विविध उपक्रम घेण्यात आले, त्या उपक्रमांची पाहणी करण्याकरिता व पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्याकरिता मान्यवरांनी गावातील विविध ठिकाणी प्रक्षेत्रावर भेटी देऊन पाहणी केली. कृषी विज्ञान केंद्र व जिल्हा रेशीम कार्यालय बुलडाणा यांच्या माध्यमातून मुरादपूर येथे शेतकऱ्यांच्या शेतावर तुती लागवड करण्यात येत आहे. त्यामधील संजय श्रीराम गाडेकर यांच्या शेतावरील सुधारित पद्धतीने तुती लागवड व पुढील रेशीम प्रकल्प उभा करण्यात संदर्भात कामाची पाहणी केली. यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या विविध उपक्रमाबाबत शेतकऱ्यांची मते जाणून घेऊन विद्यापीठ आदर्श ग्राम या संकल्पने बाबत चर्चा केली. कुलगुरु डॉ. नितीन कोष्टी यांचे तांत्रिक सचिव यांनी शेतकऱ्यांसोबत आदर्श ग्राम संकल्पने करिता कृषी विज्ञान केंद्र तसेच इतर विभागांना सहकार्य करावे.

दिव्यांग सोशल फाउंडेशनतर्फे जागतिक पांढरी काठी दिन

अंध विद्यार्थ्यांना पांढरी काठी, ब्रेल बुक्स व शिष्यवृत्तीचे वाटप

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला दि. १६ :**

येथील दिव्यांग सोशल फाउंडेशन, देशमुख महिला मंडळ, वैजयंती माला ग्रुप व श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑक्टोबर रोजी जागतिक पांढरी काठी सुरक्षा दिन झाला. या कार्यक्रमात जिल्ह्यातील अंध विद्यार्थ्यांना पांढरी काठी, ब्रेल बुक्स व शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. दिवाळीनिमित्त दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या दिवाळी पूजा किटचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मंचावर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ .रामेश्वर भिसे शिवाजी महाविद्यालय अकोला, दिव्यांग सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे, देशमुख महिला मंडळाच्या नयना देशमुख, पौर्णिमा देशमुख, सीमाताई देशमुख, कविता ढोरे, डॉ.छाया देशमुख, भारती शेंडे, मीनाक्षी फिरके व वैजयंती ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. डॉ.रामेश्वर भिसे यांनी अध्यक्षीय भाषणात दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या माध्यमाने भारतात व भारताबाहेरही दिव्यांगांना सहकार्य करण्यासाठी जे उपक्रम चालत आहेत. त्या सर्व उपक्रमांना श्री शिवाजी महाविद्यालय अकोला तर्फे नेहमीच सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले. देशमुख महिला मंडळातर्फे नेहमीच दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला या संस्थेला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे मत पुष्पा देशमुख यांनी व्यक्त केले. दिव्यांग बांधवांनी तयार केलेली दिवाळी पूजा किट खरेदी करून दिव्यांगांना एक हात सहकार्याचा द्यावा, असे आवाहन नयना देशमुख यांनी केले. वभारती शेंडे यांनी दिव्यांग सोशल फाउंडेशनला पॉपकॉर्न मशीन देणगी म्हणून देणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनामिका देशपांडे यांनी केले. कविता ढोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अस्मिता मिश्रा, विशाल भोजने, अमित सोळंके, ईश्वरी गावंडे, प्रेरणा वैरागडे, मनिषा देशमुख, शारदा देशमुख, कल्पना देशमुख, भाग्यश्री देशमुख, व देशमुख महिला मंडळाने सहकार्य केले. अकोल्यात विविध ठिकाणी स्टॉल लावला जात असून विविध सामाजिक संस्था, महिला मंडळ व मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. दिव्यांगांना रोजगार देण्यासाठी संस्थेतर्फे विविध दिवाळी उत्पादने तयार केली असून, अधिकाधिक लोकांनी ही दिवाळी उत्पादने खरेदी करून दिव्यांगांच्या शिक्षण, रोजगार व आरोग्यासाठी सहकार्य करावे. तसेच ज्या दिव्यांगांना रोजगार प्रशिक्षण व ब्रेल बुक्स हवे आहेत. त्यांनी दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या ९४२३६५००९० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. छाया देशमुख यांनी केले आहे.

भारतीय संस्कृतीचे जतन, संवर्धन करण्यासाठी दांडिया प्राजक्ता गायकवाड यांची उपस्थिती

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा दि. १६ :**

भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासोबतच शहरी व ग्रामीण भागातील मुली, महिला-युवतींना आपली गरबा दांडिया कला सादर करण्यासाठी व्यासपीठ व संधी मिळावी यासाठी बीसीसीएन बुलडाणा अर्बन परिवाराचे वतीने मागील वर्षांपासून गरबा फेस्टीवलचे थाटात आयोजन करण्यात येते, असे मार्गदर्शन गरबा दांडिया उत्सवाच्या आयोजक कोमल झंवर यांनी केले.

येथील सहकार विद्या मंदिर च्या सभागृहात बीसीसीएन बुलडाणा अर्बन गरबाच्या वतीने मराठी सिने अभिनेत्री स्वराज्य रक्षक संभाजी फेम प्राजक्ता गायकवाड खास बुलडाणेकरांनासाठी भेटीस आल्या होत्या . यामुळे प्रेक्षकांची प्रचंड गर्दी झाली होती. सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड आपल्या सोबत असणार आहे ह्या भावनेने गरबा खेळणाऱ्या मध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण होते. यादरम्यान राष्ट्रमाता जिजाऊ या लघुपटाचे शानदार प्रिमियम पार पडला. यावेळी बुलडाणा अर्बन संस्थेचे अध्यक्ष राधेश्याम चांडक, चिफ मॅनेजिंग डायरेक्टर डॉ सुकेश झंवर, कोमल झंवर, ड जितेंद्र कोठारी, अनंता देशपांडे आदींची उपस्थित होती. या प्रसंगी कोमल झंवर बोलत होत्या.

बीसीसीएन बुलडाणा अर्बन गरबा फेस्टीवल मध्ये पारंपारीक वेशभुषा व पोशाख परिधान करुन नटलेली बालगोपाल मंडळी, -युवतीआणि महिला भगिनींची संगीत गाण्यांच्या ठेक्यावर थिरकणारी पाऊलं, अंबा माता की जय आणि गरबा खेळणाऱ्या सर्वांचाच नवरात्रोत्सवाच्या अंतिम दिवशी दिसून आलेला उत्स्फूर्त प्रतिसाद अशा मंगलमय उत्साहवर्धक आणि धमाल बातावरणात संपन्न झाला .

राष्ट्रमाता जिजाऊ शॉर्ट फिल्मचा भाग जिजाऊंच्या राजवाड्यात शूट

जिल्ह्यात मी प्रथमच आले आहे. मला असं वाटलं की आपण या जिजाऊ च्या माहेरी आलीय. मी ही शॉर्ट फिल्म करताना अक्षरशः भारावून गेले होते. या चित्रपटाचा काही भाग आम्ही माँ जिजाऊ च्या राजवाड्यात शुट केलाय. बुलडाणा अर्बन संस्थेच्या वतीने निर्मित केलेल्या या चित्रपटाला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित केला पाहिजे. जेणेकरून करून माँ जिजाऊ महाराष्ट्रातील प्रत्येक जनतेने पाहिला पाहिजे. असे आवाहन प्राजक्ता गायकवाड यांनी केले.

बुलडाणा अर्बन संस्थेचे चिफ मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. सुकेश झंवर यांनी बुलडाणा अर्बन यापुढे दर्जेदार व समाजप्रबोधन करणारे चित्रपट तयार करण्यास भर देईल, निश्चितच या पुढे संस्था असा विचार करेल. असे त्यांनी यावेळी सांगितले.

खेळाडूंना बक्षीसांचे वाटप

कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात परीक्षक, मीडिया बंधू ,मंडप डेकोरेशन यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुणे ड.शर्वरी तुपकर, कोमल झंवर, डॉ.सुकेश झंवर, डॉ.कनिष्का सुकेश झंवर, ड. जितेंद्र कोठारी, बीसीसीचे पवन सोनारे यांच्या शुभहस्ते गरबा खेळाडूंना बक्षीस वाटप करण्यात आले. यामध्ये लहान-मोठेट, बेस्ट कॉस्च्युम, प्रिन्स और प्रिन्सेस ऑफ द डे बक्षिसांचे वाटप करण्यात आले. अंतिम दिवशीच्या लहान-मोठे गट यांना प्रोत्साहनपर, बेस्ट कॉस्च्युम, प्रिन्स और प्रिन्सेस ऑफ द डे या गरबा खेळाडूंना मान्यवरांच्या शुभहस्ते बक्षिसांचे वाटप करण्यात आले. महानवमीच्या अंतिम गरब्यामध्ये दोन प्रिन्सेस व दोन प्रिन्स यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले. यावेळी अनंता देशपांडे, सरव्यवस्थापक कैलास कासट, किर्ती माहेश्वरी ,सुनयना अंभोरे, सुरेश गोरे राजेश बगाडे, गजानन रिंढे, मुख्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी, गरबा कार्यकारिणी तसेच नियंत्रक समितीचे सदस्य उपस्थित होते.

सिंदखेडराजा ते शेगाव भक्तिमार्ग अखेर रद्द

सिंदखेडराजा ते शेगाव हा प्रस्तावित किलोमीटरचा भक्तिमार्ग शासनाने अखेर रद्द केला आहे. सिंदखेडराजा, देऊळगावराजा, मेहकर, चिखली आणि खामगाव या तालुक्यामधून जाणाऱ्या या मार्गाबद्दल शेतकरी वर्गामध्ये नाराजीची भावना होती. हा मार्ग झाल्यास सुपीक जमीन मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना गमावावी लागणार होती. त्यामुळे या मार्गाला विरोध सुरू झाला होता. जन भावनेची दखल घेऊन शासनाकडे हा मार्ग रद्द करावा, यासाठी पाठपुरावा केला. विधानसभेच्या अधिवेशनात प्रश्न मांडून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र सादर करून त्यांनी आपली मागणी लावून धरली. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शासनाने भक्ती मार्ग रद्द करण्याचा निर्णय घेतला व या संदर्भातला शासन आदेश ऑक्टोबरला झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काढण्यात आला आहे. सिंदखेडराजा व शेगाव या दोन पर्यटन स्थळांना जोडणारा तसेच समृद्धी महामार्गाला संलग्न असणारा किलोमीटर लांबीचा हा संकल्पित भक्तिमार्ग त्याच्या घोषणेपासूनच वादात अडकला होता. या भक्ती महामार्गामध्ये आपली सुपीक जमीन जाणार असल्याने शेतकऱ्यांकडून या मार्गाला विरोध सुरू झाला होता. चिखली मतदार संघात देखील अनेक शेतकऱ्यांनी हा मार्ग रद्द करावा, अशी मागणी आ. श्वेता महाले यांच्याकडे केली होती. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पळसखेड दौलत येथे शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाशी बोलताना आ. श्वेता महाले यांनी भक्ती मार्ग रद्द करण्याचे ग्वाही दिली होती.

दुचाकी-शाळकरी रिक्षाचा अपघात

पुसद दिग्रस मार्गावरील वरुड जवळील पेट्रोल पंपाच्या समोर दुचाकीची व शाळकरी मुलांच्या ऑटोची समोरासमोर धडक झाली. ही घटना दि. १५ ऑक्टोबरला सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास घडली असून या धडकेत दुचाकीस्वारासह ऑटोत बसलेल्या विद्यार्थ्यांना गंभीर दुखापत झाली असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या प्रकरणी प्राप्त माहितीनुसार, शहरातील पुसद ते दिग्रस रोडवरील वरुडजवळ मंगळवारी दि. १५ ऑक्टोबरला सकाळच्या सुमारास पेऑटो वाहन क्रमांक (एमएच- २९-एडी-७१०५) व दुचाकी क्रमांक (एमएच -२९-एव्ह-३९) या दोघांची पेट्रोल पंपासमोर धडक झाली. यात विशेष म्हणजे पे ऑटो वाहनातील शाळकरी विद्यार्थी बसून होते. या अपघातात अंदाजे १० ते १२ विद्यार्थ्यांना गंभीर दुखापत झाल्याची माहिती मिळाली आहे. या अपघातात दुचाकी वाहन चालक सुद्धा जखमी झाला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता घटनास्थळी असलेल्या नागरिकांनी धाव घेवून ऑटोतील गंभीर जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना तत्काळ रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतू हा अपघात कसा घडला या प्रकरणाचा तपास पोलिस करीत आहेत. अज्ञात दुचाकीच्या धडकेत २ जण गंभीर जखमी अज्ञात दुचाकीच्या धडकेत दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना मोती नगरात सोमवारी सकाळी ११.३० वाजताच्या दरम्यान घडली. अज्ञात दुचाकी

पोलिस वसाहतीत साचले कचऱ्याचे ढिगारे

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ दि. १६ :**

डोळ्यात तेल घालून बारा तास कर्तव्य बजावत सर्वसामान्य वासीयांच्या सुरक्षीततेची जबाबदारी पेलणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबियांचे वास्तव्यच धोक्यात आले आहे. शहरातील पोलिस मुख्यालयामागे असलेल्या वसाहतीत कचऱ्याचे ढिगारे साचले असून सर्वत्र अस्वच्छता पसरली आहे. गुडघाभर वाढलेल्या गांजर गवतामूळे सरपटणाऱ्या प्राण्यांचे प्रमाणही वाढले आहे. याकडे नगरपालिकेने लक्ष देणे गरजेचे आहे. शहरातील पोलिस वसाहतीच्या समस्यांचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून गंभीर बनला आहे. पोलिस वसाहतीत मुलभूत समस्यांचा मोठा डोंगर उभा आहे. नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे पोलिस कर्मचारी समस्यांच्या गर्तेत सापडले आहे. एकीकडे वाढलेले गवत, गटारींची दुरावस्था डेंग्यू सारख्या आजारांना आमत्रंण देत आहे. दुसरीकडे पालिका प्रशासन कुठलीही ठोस भूमीका घेण्यास तयार नाही. त्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांची कोंडी होत आहे. शहरातील पोलिस मुख्यालयामागे असलेल्या वसाहतीत कचऱ्याचे ढिगारे साचले असून सर्वत्र अस्वच्छता पसरली आहे. गुडघाभर वाढलेल्या गांजर गवतामूळे सरपटणाऱ्या प्राण्यांचे प्रमाणही वाढले आहे. याकडे नगरपालिकेने लक्ष देणे गरजेचे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ह्या भागात एकही रस्ता तयार करण्यात आलेला नाही. त्यामुळे रस्त्यांची प्रचंड चाळणी झाली. या परिसरातील रहिवासीयांचे हाल होत आहे. तर डांबरी रस्ता असून नसल्यासारखा आहे. या रस्त्याला मोठे-मोठे खड्डे पडले आहेत.

मेडशी ग्रामपंचायतीला सुंदर गाव पुरस्कार प्रदान

■ **महासागर प्रतिनिधी, मालेगाव दि. १६ :**

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार योजनेत तालुक्यातील मेडशी ग्रामपंचायतीने तालुकास्तरीय प्रथम पुरस्कार पटकावला. आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना राज्य शासनाने जाहीर केली असून, नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर व लोकसहभागावर ही योजना आहे. ग्रामविकास कामांची सांगड घालण्याचे काम या योजनेतून होणार आहे. या योजनेत सुंदर गाव पुरस्कार मिळणाऱ्या गावास लाख तर सुंदर जिल्हा पुरस्कार मिळवणाऱ्या जिल्ह्यास लाखांचे बक्षीस देण्यात येते, ग्रामविकास विभागाकडून नोव्हेंबर पासून राबवण्यात येणाऱ्या स्मार्ट ग्राम योजनेअंतर्गत ग्रामपंचायतींना तालुका, जिल्हास्तरीय स्मार्ट ग्राम पुरस्कार या योजने अंतर्गत देण्यात येतात. हा पुरस्कार सोहळा मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे व जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्या उपस्थितीत मेडशीचे सरपंच शेख जमीर शेख गणीभाई यांना पुरस्कार प्रदान केला. -या वर्षात आर आर आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार योजनेअंतर्गत तालुकास्तरीय स्पर्धेत मेडशी ग्रामपंचायतीने प्रथम पुरस्कार पटकावला असून, या पुरस्काराचे जिल्हा परिषद येथे वितरण केले. या वेळी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जिल्हा परिषद बांधकाम सभापती सुरेश मापारी, मालेगाव पंचायत समितीचे सभापती काळे यांच्या उपस्थितीत मेडशीचे सरपंच शेख जमीर शेख गणीभाई यांना पुरस्कार प्रदान केला. या वेळी ग्रामविकास अधिकारी भागवत भुरकडे, उपसरपंच संध्या मेडशीकर, अमोल तायडे ,धीरज मंत्री, ज्ञानेश्वर मुंडे ,मूलचंद चव्हाण, जगदीश राठोड, कैलास ढाले, उमेश तायडे, गजानन झाटे, रमजानभाई गवरे, नितीन तायडे आदींची उपस्थिती होती.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

क्रिती निर्मितीक्षेत्रात...

क्रिती सेनॉनने निर्माती म्हणून पदार्पण केलं आहे. 'दो पत्ती'चित्रपटाची निर्माती म्हणून तिने नव्या इनिंगची सुरूवात केली आहे. निर्मात्याची जबाबदारी पेलणं वाटतं तितकं सोपं नक्कीच नाही. मात्र क्रितीने ही भूमिका अगदी समरसून निभावली. निर्माती म्हणून काम करताना आलेला अनुभव क्रितीने शेअर केला आहे. आजवर अनेक नायिकांची निर्मिती क्षेत्रात पाऊल ठेवलं. क्रिती सेनॉननेही त्यांचाच कित्ता गिरवला आहे. 'दो पत्ती'च्या निमित्ताने ती निर्मिती क्षेत्रात उतरली. निर्मिती क्षेत्रातल्या अनुभवाबद्दल क्रिती भरभरून बोलते. क्रिती सांगते, काही कथानकं मला खूपच जवळची वाटतात आणि या कथानकांवर काम करताना अधिकाधिक गुंतावंसं वाटतं. फक्त एक कलाकार म्हणून काम करताना कल्पकपणे एवढे गुंतता येत नाही. निर्माती म्हणून काम करताना वेगवेगळ्या मुद्यांना हात घालता येतो. निर्माती म्हणून तुम्हाला एकप्रकारचं स्वातंत्र्य मिळतं. तुम्ही चित्रपटनिर्मितीच्या प्रत्येक प्रक्रियेत मनापासून सहभागी होता. क्रिती पुढे सांगते, चित्रपटाची संहिता, अंतिम मसुदा, चित्रपटाचं चित्रिकरण, संगीत, संकलन या सगळ्या गोष्टींशी तुमचा संबंध येतो आणि मला हे सगळं करायचं होतं, अनुभवायचं होतं. हे फक्त आणि फक्त निर्माती म्हणून शक्य झालं. क्रिती म्हणते, अर्थात निर्माती म्हणून काम करणं वाटतं तितकं सोपं नसतं. निर्माती म्हणून पहिल्यांदाच काम करणं खरं तर खूपच कठीण असतं. अशा परिस्थितीत तुमच्याकडे एखादा साथीदार असायला हवा. निर्मिती प्रक्रियेतला भागीदार असायला हवा. या भागीदाराने तुमच्यावरची जबाबदारी वाटून घ्यायला हवी. त्यातच तुम्ही चित्रपटात भूमिका करत असाल आणि तीही दुहेरी भूमिका करत असाल तर तुम्हाला मदतीची जरा जास्तच आवश्यकता असते. मात्र हा काळ मी खूपच एंजॉय केला. 'दो पत्ती'मध्ये क्रिती दुहेरी भूमिकेत आहे. यासोबतच तिने निर्माती म्हणूनही उत्तम काम केलं आहे. क्रितीला भविष्यात हा अनुभव नक्कीच उपयुक्त ठरेल.

'देवरा'ची जादू

बॉक्स ऑफिसवर सध्या 'देवरा'ची हवा पहायला मिळते आहे. ज्युनिअर एनटीआरच्या स्टारडममुळे देवराला देशभरात चांगला प्रतिसाद मिळतो आहे. चित्रपटाने २०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला असून आता त्याची वाटचाल ३०० कोटी क्लबच्या दिशेने सुरू आहे. तिकडे 'नवरा माझा नवसाचा २' आणि 'धर्मवीर २' या दोन्ही सीक्वेल्सनी मराठी बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली आहे. ज्युनिअर एनटीआरच्या 'देवरा'ने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला असून चित्रपटाने अवघ्या आठवडाभरात २०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला. या चित्रपटाने भारतीय बॉक्स ऑफिसवर सात दिवसात २१८.८५ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. विविध भाषांमध्ये प्रदर्शित झालेल्या या पॅन इंडिया चित्रपटाला सगळीकडे तुफान प्रतिसाद मिळत असल्याचं दिसून येत आहे. 'देवरा'ने ८३ कोटी रुपये कमवत जबरदस्त ओपनिंग मिळवलं. त्यानंतर ज्युनिअर एनटीआरच्या स्टारडमवर स्वार होत या चित्रपटाने आपली घोडदौड सुरूच ठेवली. ज्युनिअर एनटीआरचे जवळपास अडीच वर्षांनी झालेले पुनरागमन त्याच्या चाहत्यांनी जल्लोषात साजरे केले. 'आरआरआर'मुळे ज्युनिअर एनटीआर संपूर्ण भारतात लोकप्रिय झाला. त्यानंतर आता 'देवरा'च्या यशामुळे त्याच्या लोकप्रियतेवर शिक्कामोर्तब झालं आहे. 'देवरा'ने आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या तेलगू भाषिक राज्यांमध्ये दणकून कमाई केलीच शिवाय हिंदी पट्टयातही 'देवरा'ला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. 'देवरा'ने हिंदी पट्टयात पहिल्या दिवशी ७.९५ कोटी रुपये कमावले होते. चित्रपटाच्या कमाईत चढ-उतार पहायला मिळाले. समिक्षकांकडून चित्रपटाला संमिश्र प्रतिसाद मिळाला. मात्र 'देवरा'मधली ॲक्शन प्रेक्षकांना भावल्यामुळे चित्रपटाने सात दिवसात हिंदी पट्टयात ४८.२७ कोटी रुपये कमावले. तेलगू राज्यांमध्ये 'देवरा'ने १६५ कोटी रुपयांचा व्यवसाय केला असून प्रभासच्या 'साहो'च्या कमाईला मागे टाकले आहे. 'साहो'ने तेलगू पट्टयात १५३ कोटी रुपये कमावले होते. भारतीय बॉक्स ऑफिसवर 'देवरा'ने २०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला असून लवकरच तो २५० कोटी रुपयांचा टप्पा गाठेल. त्यानंतर हा चित्रपट ३०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडणार का, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. मराठी बॉक्स ऑफिसवरही सध्या चैतन्यदायी वातावरण दिसून येत आहे. एकामागोमाग एक प्रदर्शित झालेल्या सीक्वेल्सनी तिकिटखिडकीवर चांगली कामगिरी केली आहे. 'धर्मवीर २' ने आठवड्याभरात १२.३१ कोटी रुपये गल्ला जमवला आहे. चित्रपटाने पहिल्या दिवशी १.९२ कोटी रुपये कमावले होते. वीकेंडलाही चित्रपटाने जबरदस्त कामगिरी केली. त्यामुळे आता 'धर्मवीर २' एकूण किती गल्ला जमवणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. तिकडे 'नवरा माझा नवसाचा २' नेही दोन आठवड्यांमध्ये जवळपास १९ कोटी रुपये कमावले आहेत. बॉक्स ऑफिसवर सलग दोन चित्रपट हिट ठरल्यामुळे मराठी बॉक्स ऑफिसवर आनंदीआनंद आहे.

कर्मयोगी आमदार रुपेरी पडद्यावर

मराठीत नेहमीच वेगवेगळ्या विषयांवरील चित्रपटांची निर्मिती होत असते. मराठीतल्या बायोपिक्सनाही चांगला प्रतिसाद मिळतो. एखाद्या व्यक्तीचं आयुष्य रुपेरी पडद्यावर पाहणं ही खरं तर पर्वणीच असते. दिवंगत आमदार गणपतराव देशमुख यांच्या आयुष्यावर आधारित असाच एक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आपल्या आसपास अनेक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व असतात. हे लोक इतरांचं आयुष्य सुलभ करण्यासाठी प्रयत्नशील असतात. राजकारणातले लोकही समाजासाठी बरंच काही करत असतात. असंच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे दिवंगत गणपतराव देशमुख. गणपतराव देशमुख बराच काळ सांगोल्याचे आमदार राहिले. सलग अकरा वेळा ते या मतदारसंघातून निवडून आले. शेतकरी कामगार पक्ष पश्चिम महाराष्ट्रात रुजवण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. गणपतरावांची राहणी अत्यंत साधी होती. त्यांनी नेहमीच लोकांसाठी काम करायला प्राधान्य दिलं. त्यांना जाऊन तीन वर्षं लोटली असली तरी सांगोल्याची जनता त्यांना विसरू शकलेली नाही. त्यांच्या कार्याचा उल्लेख नेहमीच सांगोल्याच्या राजकारणात होत असतो. गणपतराव देशमुखांची सांगोल्यात आबा अशी ओळख होती. ते एसटीतून फिरत असत. त्यांच्या साधेपणाचं सर्वसामान्य जनतेला खूप कौतुक होतं. त्यांचं कार्य आता रुपेरी पडद्यावर पहायला मिळणार आहे. त्यांच्या आयुष्यावर आधारित 'कर्मयोगी आबासाहेब' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटात अनिकेत विश्वासराव गणपतरावांच्या भूमिकेत दिसेल. अनिकेतला अशा वेगळ्या भूमिकेत बघणं त्याच्या चाहत्यांसाठी पर्वणीच ठरणार आहे. या चित्रपटाचं पोस्टर नुकतंच समाज माध्यमांवर सादर करण्यात आलं. चित्रपटात अनिकेतसोबच हार्दीक जोशी, देविका दफ्तरदार, पृथ्विक प्रताप, विजय पाटकर, प्रदीप वेलणकर, वृंदा बाळ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. छोटा पुढारी अशी ओळख असणारा घनश्याम दरोडेही चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने आबासाहेबांचे कार्य नव्या पिढीसमोर येणार आहे.

उत्सुकता 'बिग बॉस १८' ची

'बिग बॉस ओटीटी' आणि 'बिग बॉस'मराठीनंतर आता हिंदी 'बिग बॉस'च्या अठराव्या हंगामाची चर्चा आहे. या कार्यक्रमातल्या स्पर्धकांबद्दल प्रेक्षकांना उत्सुकता असते. 'बिग बॉस'च्या अठराव्या हंगामात कोण दिसणार याविषयी... 'बिग बॉस' म्हटलं की प्रेक्षकांच्या भुवया उंचावतात. 'बिग बॉस'मध्ये बरंच नाट्य पहायला मिळतं. स्पर्धकांची भांडणं, वाद, रूसवे-फुगवे, रोमान्स यामुळे 'बिग बॉस'नेहमीच चर्चेत असतो. 'बिग बॉस ओटीटी' आणि 'बिग बॉस मराठी'नंतर पुन्हा एकदा हिंदी 'बिग बॉस'ची चर्चा आहे. 'बिग बॉस'चा अठरावा हंगाम प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून त्यातल्या स्पर्धकांची नावंही समोर आली आहेत. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन अर्थातच सलमान खान करणार आहे. 'बिग बॉस'च्या घरात यंदा वेगवेगळ्या क्षेत्रातले चेहरे दिसणार आहेत. त्यांच्यातली जुगलबंदी आणि केमिस्ट्री पाहणं खूपच उत्सुकतेचं ठरणार आहे. बोल्ड अँड ब्युटिफुल निया शर्मा या कार्यक्रमात दिसणार आहे. 'खतरों के खिलाडी १४' च्या अंतिम फेरीत रोहित शेट्टीने निया शर्मा 'बिग बॉस'मध्ये सहभागी होणार असल्याचं म्हटलं होतं. त्यामुळे तिचं नाव स्पर्धकांच्या यादीत आहे. हरहुन्नरी अभिनेता धीरज धूपरही 'बिग बॉस १८' मध्ये दिसणार आहे. 'ये जादू है जीन का' तसंच अन्य मालिकांमध्ये झळकलेला चेहरा शहजादा धामीही बिग बॉसचा स्पर्धक आहे. अभिनेत्री नायरा बॅनर्जीही बिग बॉसचा भाग असेल. अभिनेता विवियन डिसेना, अभिनेत्री शिल्पा शिरोडकर, करणवीर मेहरा, चाहत पांडे, आफरीन खान आदी 'बिग बॉस १८' चे स्पर्धक असतील. या यादीतलं लक्षवेधी नाव म्हणजे ॲड गुणरत्न सदावर्ते. विविध कारणांनी गुणरत्न सदावर्ते चर्चेत असतात. आता 'बिग बॉस'च्या घरात त्यांना पाहता येणार आहे. त्यामुळे आता 'बिग बॉस १८'मध्ये चांगलीच धमाल पहायला मिळणार हे मात्र नक्की!



श्रद्धा की अंधश्रद्धा?

अनन्या पांडे सध्या ओटीटीवर दिसतेय. 'कॉल मी बे'च्या यशानंतर तिचा 'सीटीआरएल' हा चित्रपटही ओटीटीवर प्रदर्शित झाला आहे. अनन्या कितीही आधुनिक दिसत असली आणि त्या पद्धतीने राहत असली तरी ती थोडी अंधश्रद्धाळू आहे. अनन्यानेच एका मुलाखतीत याबाबत सांगितलं आहे. नजर लागणे या प्रकारावर आपला विश्वास असल्याचं तिने म्हटलं आहे. त्यामुळे ती दर आठवड्यातला आईकडून नजर काढून घेत असल्याचं सांगितलं आहे. खरं तर अनन्या खूपच गोड आहे. त्यामुळे तिच्याकडे पाहत राहावसं वाटतं. नजर लागणे या प्रकारात किती तथ्य आहे हे माहीत नसलं तरी अनन्याचा यावर विश्वास आहे, हे ऐकून तिच्या चाहत्यांना नक्कीच धक्का बसला असेल.

अनुभव तृप्तीचा

'ॲनिमल'नंतर तृप्ती डिमरी हे नाव सतत चर्चेत असतं. तृप्तीचा 'लैला मजनू' हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाबाबत तृप्तीने एक वक्तव्य केलं आहे. चित्रपटाच्या चित्रिकरणादरम्यान आपण खूपच रडत असल्याचं तिने म्हटलं आहे. आपल्याला अभिनयातलं काहीच माहीत नव्हतं, त्यामुळे त्यावेळी खूप रडू यायचं, असं तृप्तीने सांगितलं आहे. आपल्याला अभिनय जमेल का, असा विचार सतत मनात यायचा, असं तृप्तीने सांगितलं आहे.

सलमान करणार कॅमिओ

वरुण धवन 'बेबी जॉन 'या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटातले वरुणचे लूक्स चाहत्यांना भावले आहेत. या चित्रपटात सलमान खान कॅमिओ करणार आहे. या चित्रपटात सलमान खान पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. सलमान आपल्याच अंदाजात ही भूमिका करताना दिसेल. सलमानला या छोटेखानी भूमिकेत पाहणं चाहत्यांसाठी पर्वणी ठरणार आहे.

थोडक्यात

रासप स्वबळावर लढणार

■ **मुंबई :** विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर महायुतीला मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्या रुपाने महायुतीमधून पहिला मित्रपक्ष बाहेर पडला आहे. महायुतीमधून बाहेर पडल्यानंतर महादेव जानकर यांचा पक्ष स्वबळावर विधानसभा निवडणूक लढवणार आहेत. जातीय समीकरणांचा विचार करता भाजपला महादेव जानकर यांची मनधरणी करण्यात यश येते का? ते पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून महादेव जानकर महायुतीमध्ये नाराज असल्याची चर्चा होती. आमदारकीची टर्म पुन्हा न मिळाल्यामुळे देखील नाराज असल्याचे बोलले जात होते. याशिवाय जानकर यांनी आपल्या पक्षासाठी महायुतीकडे ४० ते ५० जागांची मागणी केली होती. मात्र त्यांना महायुतीकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे त्यांनी महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. आमचा पक्ष देशात मोठा झाला पाहिजे. त्यासाठी आम्ही स्वतंत्र लढणार असल्याचे महादेव जानकर यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे. काँग्रेस आणि भाजपच्या लायकीत राष्ट्रीय समाज पक्ष आला पाहिजे. आमची ताकद आम्ही आमजमावणार आहोत. आम्ही सर्वच्या सर्व २८८ जागा लढवणार असल्याचेही जानकर यांनी सांगितले.

जावेद श्रॉफ दादांच्या गटात

■ **मुंबई :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या असून त्यासोबतच नेते पक्ष बदलण्याच्या हालचाली देखील वाढल्या आहेत. निवडणुकीच्या घोषणेच्या दरम्यानच काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस जावेद श्रॉफ यांनी अजित पवार गटाशी हातमिळवणी केल्याने काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेससाठी हा मोठा धक्का मानला जातोय.

जावेद श्रॉफ यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादीच्या अधिकृत खात्यावर ही माहिती देण्यात आली आहे. या पोस्टमध्ये असे लिहिले आहे की, मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस अलहाज जावेद आर. श्रॉफ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

मुद्रांक शुल्काच्या किमतीत मोठी वाढ

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. १६ :

सर्वच वस्तूंच्या किमतीमध्ये सध्या मोठी वाढ झाली आहे. खाण्याच्या वस्तू, शिक्षण आणि आरोग्यासंदर्भातील उपचारांसह सर्वच गोष्टीच्या खर्चात दुप्पट वाढ झाल्यामुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे.

या महागाईने होरपळून निघालेल्या सर्वसामान्य जनेतेला आता राज्य सरकारने आणखी एक धक्का दिला आहे. यापुढे १०० आणि २०० रुपयांच्या मुद्रांक शुल्कसाठी ५०० रुपये मोजावे लागणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या खिशाला पुन्हा एकदा कात्री लागणार आहे.

खरेदी खत आणि हक्क सोडपत्रासाठी यापुढे आता ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क मोजावे लागणार आहे. याआधी १०० आणि २०० रूपयांचे मुद्रांक शुल्क लागत होते. मात्र, हे बंद करून यापुढे आता ५०० रुपयांच्या मुद्रांकावर सर्व व्यवहार करावे लागणार आहेत. याची १६ ऑक्टोबर पासून अंमलबजावणी सुरु झाली आहे.

महाराष्ट्र मुद्रांकाच्या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी राज्यपालांनी सोमवारी अध्यादेश काढला होता. त्यानंतर त्याची अंमलबजावणी आज १६ ऑक्टोबरपासून सुरु झाली आहे.

दरम्यान, महायुती सरकारने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९९८ मध्ये सुधारणा करत आता प्रतिज्ञापत्रे, करारनामे आणि संबंधित कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क सध्याच्या १०० रुपयांवरून ५०० रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल विभागाच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्र मुद्रांक कायद्यातील दुरुस्तीमुळे मुद्रांक शुल्क आणि नोंदणीमधून मिळणाऱ्या राज्याच्या महसूलामध्ये जवळपास दोन हजार कोटी रुपयांची वाढ होण्यास मदत होणार आहे.

खरं तर राज्य सरकारच्या महसूलाचा मुद्रांक शुल्क हा एक महत्वाचा स्त्रोत आहे. या अनुषंगानेच आता राज्य सरकारने मुद्रांक शुल्कांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेत मुद्रांक शुल्काच्या किमतीत मोठी वाढ केली आहे.

खरेदी खत, हक्क सोडपत्र, दस्त नोंदणी किंवा सदनिकांच्या विक्री व्यवहार नोंदणीसाठी आधी १०० रूपयांचे मुद्रांक शुल्क मोजावे लागत होते. नोटरी करणे किंवा बँकेमधून कर्ज घेण्यासाठी १०० रुपयांचे मुद्रांक शुल्क द्यावे लागायचे. पण आता याच मुद्रांक शुल्कसाठी ५०० रूपये लागणार असून, हा मोठा भूर्दंड बसणार आहे.

महायुतीत शिंदे, पवारांसह भाजपनेही त्याग केला

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. १६ :

आपण कामठी मतदारसंघांतून लढणार नाही, पक्षाने दिलेला उमेदवार निवडून आणणार, असे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे प्रसार माध्यमांशी बोलतांना सांगितले. महायुतीमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह भाजपनेही त्याग केला, असेही ते म्हणाले.

बावनकुळे विधान परिषदेचे सदस्य आहेत. कामठीत भाजपचे टेकचंद सावरकर विद्यमान आमदार आहे. 2019 मध्ये बावनकुळे यांना पक्षाने उमेदवारी दिली नव्हती. त्यामुळे यावेळी बावनकुळे कामठीतून लढणार का, या विषयी उत्सुकता होती. मात्र बावनकुळे यांनी आपण कामठी विधानसभा मतदार संघात उमेदवारी मागितली नाही आणि मागणार नाही, असे सांगितले.

पक्षाने दिलेला उमेदवार निवडून आणणार. पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने प्रदेशाध्यक्ष म्हणून दिलेली जबाबदारी सांभाळत राज्यात महायुतीची सत्ता आणणण्यासाठी प्रयत्न करू असे ते म्हणाले.

कोणाचा त्याग किती मोठा आहे हे मोजता येत नाही हे खरे आहे. मात्र राज्याला आज महायुतीची गरज आहे. त्यामुळे काही बाबतीत त्यांनी मोठे मन करुन भाजपला पाठिंबा द्यावा. राज्याचे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी त्यांनी जास्त जागा लढल्या पाहिजे, असे नाही. मात्र जिथे तिघांपैकी ज्यांचे प्राबल्य आहे आणि उमेदवार सक्षम आहे, त्या ठिकाणी त्यांचा विचार झाला पाहिजे. महायुतीमधील ताणतणाव निवडणुकीच्या काळात परवडणारे नाही. महायुती एकत्रित राहणार असून ती जिंकण्यासाठी लढणार आहे, असेही बावनकुळे म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये काय चर्चा झाली त्याबद्दल मला माहिती नाही. मात्र महायुतीत एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह भाजपनेही त्याग केला आहे. सर्वाधिक आमदार आमच्याकडे आहे. त्यामुळे कोणी किती मोठा त्याग केला हे महत्त्वाचे नाही. तर महायुतीचे नुकसान होवू नये यासाठी तीनही नेत्यांनी समन्वय ठेवत आणि मोठे मन करीत आमच्या पाठिशी त्यांनी उभे राहिले पाहिजे, असेही बावनकुळे म्हणाले.

भाजपच्या आमदारांबद्दल अँटी-इन्कम्बन्सी असेल तर ते बदलले जाऊ शकतात का? त्याबद्दल केंद्रीय भाजप सर्वेक्षण केलेलं आहे, ते निर्णय करतील. मात्र, काही आमदारांबद्दल इन्कम्बन्सी असेल, तर सीट आम्हाला गमवायची नाही, म्हणून केंद्रीय निवडणूक समिती त्याबद्दल निर्णय करू शकते, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी मतमोजणी करावी

ईव्हीएमवरील आरोप टाळण्यासाठी वंचितचा निवडणूक आयोगाला सल्ला

■ **महासागर प्रतिनिधी**
मुंबई, दि. १६ :

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाला आहे. 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. मात्र ही मतमोजणी मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.

यासंदर्भात निवडणूक आयोगाला लेखी निवेदन देखील देणार असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. ते आज सकाळी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, महाराष्ट्र हे शांततप्रिय राज्य असल्याचे निवडणूक आयोगाने मान्य केले आहे. त्यामुळे त्यांनी एका टप्प्यात निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाचा हा निर्णय चांगला असून सर्वच राज्यांमध्ये अशाप्रकारचा निर्णय घ्यायला हवा. मात्र निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी लगेच मतमोजणी व्हावी, अशी आमची मागणी आहे. निवडणूक

आयोगाने या मागणीवर विचार करावा. यापूर्वी बॅलेट पेपरद्वारे मतदान व्हायचे तेव्हा दुसऱ्याच दिवशी मतमोजणी केली जायची.

मला वाटते की, ईव्हीएम हे मशीन आहे त्यामुळे लगेच मतमोजणी करता येते. दुसऱ्या दिवशी मतमोजणी झाल्यास हरियाणा निवडणुकीवेळी झालेले आरोप पुन्हा होणार नाहीत. याबाबत निवडणूक आयोगाला आम्ही लेखी पत्र देखील पाठवणार आहोत, असेही प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

क्रिमीलेयर जीआरवर बोलताना आंबेडकर म्हणाले, सुप्रीम कोर्टाने वर्गीकरण आणि क्रिमीलेयर बाबत जो निर्णय घेतला होता, तो काय होता? त्यावर पॉलिसी बनू शकते की, संसद यावर केवळ निर्णय घेऊ शकते. तर यावर फक्त संसदच निर्णय घेईल आणि हा मुद्दा कोर्टात आहे. मात्र त्याआधीच या राज्य सरकारनेच त्याची अंमलबजावणी सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि जीआरही जारी केला, हे कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

ओबीसी समाज भाजपला मतदान करेल, असे मला वाटत नाही. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावेळीही आमच्या पक्षाने भूमिका जाहीर केली होती. आम्ही ओबीसींच्या समर्थनासाठी पुढे आलो होतो आणि आरक्षण बचावासाठी उभे राहिले होतो. त्यामुळे भाजपने कितीही प्रयत्न केला तरी ओबीसी समाज त्यांना मतदान करणार नाही, असे त्यांनी ठासून सांगितले. गेल्या अडीच वर्षात या राज्याची सत्ताधारी नेत्यांनी पुरती वाट लावली, त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतील, असेही ते म्हणाले.

महिला आयोगाच्या अध्यक्षपदी पुन्हा रूपाली चाकणकर

■ **महासागर प्रतिनिधी**
मुंबई, दि. १६ :

महिला आणि बालविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ हा तीन वर्षांचा असतो.

सध्या या आयोगाची जबाबदारी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या रूपाली चाकणकर यांच्यावर आहे. येत्या २२ तारखेला चाकणकर यांचा कार्यकाळ संपणार होता. मात्र, पूर्वीच आयोगाच्या अध्यक्षपदाची धुरा पुन्हा एकदा त्यांच्याकडेच सोपवण्यात आली आहे. या संदर्भात नुकतेच गॅजेट प्रसिद्ध करण्यात आले आहे.

गुरुकुंज आश्रमात १८ ला भव्य रक्तदान शिबिर

■ **महासागर प्रतिनिधी**
अमरावती, दि. १६ :

गुरुकुंज मोझरी- श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालाच्या राष्ट्रीय सेवा योजना व रॅनबो बल्डबँक नागपूर यांच्या सयुंक्त विद्यमाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्य भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

१८ आक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराला श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय गुरुकुंज आश्रम येथे आयोजित केले आहे. रक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीगुरुदेव आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुरलीधर खारोडे यांनी केले आहे.

लोकसंस्कृतीच्या गाढ्या अभ्यासक तारा भवाळकर

अक्षरधारा

लोकजागर

लेखिका डॉ. तारा भवाळकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. ६ ऑक्टोबर रोजी पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेची बैठक पार पडली. या बैठकीत तारा भवाळकर यांचं नाव निश्चित करण्यात आलं.

दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. तारा भवाळकर कोण आहेत याची माहिती आपण जाणून घेऊ. तारा भवाळकर या लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत. १९७० ते १९९० या कालावधीत तारा भवाळकर या श्रीमती चंपाबेन वालचंद शाह या सांगलीतील महाविद्यालयात डॉ. तारा भवाळकर प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. लोकसाहित्य, लोकसंस्कृती यांच्या अभ्यासासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातलं आहे.

लोकसंस्कृतीचा अभ्यास, स्त्री मुक्ती चळवळ, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ हे देखील डॉ. तारा भवाळकर यांच्या आवडीचे विषय आहेत. स्त्रीवादी दृष्टीकोनातून संशोधन करुन लिहिणाऱ्या महत्वाच्या लेखिका म्हणूनही डॉ. तारा भवाळकर यांची ओळख आहे. अलिकडेच त्यांनी सीतायन हे पुस्तक लिहिलं आहे. या पुस्तकात त्यांनी सीतेच्या वेदना आणि विद्रोह यांचं चित्रण केलं आहे. सांगलीत प्रायोगिक नाट्यसंस्था सुरु करण्यातही तारा भवाळकर यांचा सहभाग होता. डॉ. तारा भवाळकर यांनी चाळीसहून अधिक पुस्तकं लिहिली आहेत.

तिसऱ्या बिंदूच्या शोधात, महामाया, आकलन आणि आस्वाद, लोकपरंपरेतील सीता, माझिये जातीच्या, लोकनागर रंगभूमी, मातीची रुपे ही त्यांची पुस्तकं चर्चेत राहिलेली आहेत. डॉ. तारा भवाळकर यांचा जन्म १ एप्रिल १९३९ मध्ये झाला. प्रामुख्याने वैचारिक ल ा ख न ा करणाऱ्या एक मराठी लेखिका आहेत. प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम केलं आहे. निवृत्त झाल्यावर पुण्यातील ललित कला अकॅडमी आणि मुंबई विद्यापीठ लोककला अकॅडमीमध्ये अतिथी प्राध्यापक देखील होत्या.

त्यांच्या या साहित्य संपदेचा आणि लोकसंस्कृती अभ्यासाच्या योगदानाचा अनेक पुरस्कारांनी सन्मान केला गेलेला आहे. यामध्ये, पुणे विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट प्रबंधासाठी पुरस्कार, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार, अखिल भारतीय दलित साहित्य अकादमी दिल्ली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरववृत्ती, वि. म. गोखले पुरस्कार, वाङ्मय समीक्षा प्रथम पुरस्कार वाडमय चर्चा मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे जीवनगौरव पुरस्कार, विशेष सन्मानवृत्ती महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, रत्नशारदा पुरस्कार सह्याद्री वाहिनी दूरदर्शन या पुरस्कारांनी डॉ. तारा भवाळकर यांचा गौरव करण्यात आला आहे.

मराठी साहित्यविश्वात मोलाचं योगदान देणाऱ्या डॉ. तारा भवाळकर या आता दिल्लीत होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनात काय भूमिका मांडणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

■ ■

शब्दार्थ

CEO
CEO हे संक्षिप्त रूप . Chief Executive Officer म्हणजेच मुख्य कार्यकारी अधिकारी होय. सीईओ हे पद कंपनी किंवा संस्थेतील उच्च स्थान दर्शवते आणि सीईओ व्यवस्थापन आणि प्रशासनाचा मुख्य प्रभारी म्हणून कार्य करत असतो.
सीईओ हा सर्वांत वरिष्ठ प्रशासकीय किंवा कार्यकारी अधिकारी आहे जो कंपनी संपूर्ण कामकाज चालवण्या करिता तसेच व्यवस्थापन करण्यास सक्षम असतो आणि तो कंपनीच्या फायद्याच्या संबंधित निर्णय घेत असतो. तसेच कंपनीचे सीईओ अध्यक्ष किंवा संचालक मंडळाला थेट अहवाल देतात.

■ ■

दिव्यांग कल्याणकारी संस्थेकडून आत्मविश्वासाचे पंख

लोकसेवार्थ

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

उत्तरोत्तर वाढत गेले. यंदा संस्थेतील दहावीतील विद्यार्थ्यांचा निकाल ९३ टक्के लागला असून, अनेक तरुणांनी चांगले गुण मिळवले आहेत. तर, विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रावीण्यही मिळवले आहे. संस्थेच्या सुरूवातीला संस्थेत केवळ सहा मुले होती.

ही संख्या कालांतराने वाढत गेली अन् वसतिगृह झाले. २००० साली येथे मुलांसाठी शाळा बांधण्यात आली. मुला-मुलींचे वसतिगृह, सांस्कृतिक सभागृह, सुसज्ज ग्रंथालय, मैदान अशा विविध सुविधा विद्यार्थ्यांसांठी उपलब्ध आहेत. शिक्षणाबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच, त्यांच्यातील सुप्त गुण ओळखण्यासाठी इथे वेगळे वर्गही चालवले जातात, स्पर्धाही घेतल्या जातात. उत्कृष्ट सादरीकरणासाठी प्रोत्साहन म्हणून बक्षिस देऊन सन्मानही केला जातो. एवढ्यावरच न थांबता पुढे जिल्हास्तरीय व राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी त्या खेळाडुंना संस्था सहकार्य करते. दिव्यांगांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे. संस्थेच्या या बहुमोल कायार्साठी दिव्यांग व्यक्तीच्या सशक्तीकरणाबरोबरच संस्थेला राष्ट्रपतींच्या हस्ते दिला जाणारा राष्ट्रीय पुरस्कार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार असे दोन नामांकित पुरस्कार मिळाले आहेत.

■ ■

संशोधन केंद्र अशी केंद्राची ओळख आता बनलेली आहे. आजपर्यंत हजारो विद्यार्थी या संस्थेतून माठ्या हुद्द्यावर पोहचले असल्याने संस्थेचे सार्थक झाले आहे. शिक्षण, आरोग्य तर हवेच पण, त्याचबरोबर त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्था नेहमीच प्रोत्साहन देते असते

पुण्यातील वानवडी येथे १९५९ पासून सुरु असलेल्या संस्थेत काम सुरु तर आहेच, ते दिव्यांग व विशेष विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दिव्यांग कल्याणकारी शिक्षण संस्था व वैद्यकीय संशोधन केंद्र ६७ वर्षांपासून कार्यरत आहे.

दिव्यांगांनी इतरांपेक्षा आपण वेगळे असल्याची भावना विसरायला हवी, त्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांनीही आयुष्य भरभरून जगावे, या दूरदृष्टीने डॉ. रघुनाथ गोविंद काकडे यांनी ६ नोव्हेंबर १९५६ साली ह्यदिव्यांग कल्याणकारी शिक्षण संस्था व वैद्यकीय संशोधन केंद्राह्ची मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीला कोथरुडच्या भालेराव बंगल्यात संस्थेचा प्रारंभ झाला. इवल्याशा रोपट्याचे वटवृक्ष झाले असून त्याच्या सावलीने दिव्यांगांना सकारात्मक जगण्याची दिशा दाखवली. दिव्यांगासाठी पुण्यातील उत्तम कार्य करणारी दिव्यांग कल्याणकारी शिक्षण संस्था व

मनोज जरांगे यांच्याकडे ८०० जणांचे अर्ज

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. १६ :**

लोकसभा निवडणुकीपूर्वी ताकदवान भाजपमध्ये राजकीय भवितव्य आहे, असे मानून प्रवेश घेणारी मंडळी आता पर्याय चुकला का, याची तपासणी करत आहेत. तर पक्षांतराच्या चाचपणीमध्ये आपण शरद पवार यांचे नेतृत्व स्वीकारले तर कसे, याचीही चाचपणी करू लागले आहेत.

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते ते राजकीय पटलावर ताकद दाखविणाऱ्या मनोज जरांगे यांनी उमेदवार उभे केले तर आपणही त्यात असावे असे वाटणाऱ्या उमेदवारांच्या अजार्ने आंतरवाली सराटीमध्ये गर्दी झाली आहे. आतापर्यंत राज्यातून ८०० हून अधिक अर्ज आले असल्याचे जरांगे यांनी सांगितले.

शिवसेनेत फूट पडल्यानंतर मराठवाड्यातून नऊ आमदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारले. यामध्ये मंत्री तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, संदीपान भुमरे, प्रदीप जैस्वाल, संजय शिरसाठ, ज्ञानेश्वर चौगुले, बालाजी कल्याणकर, संतोष बांगर, प्रा. रमेश बोरनारे यांचा समावेश होता. या मतदारसंघात संघटना मजबूत करणे किंवा नवे उमेदवार ठरवणे उद्धव ठाकरे यांना आवश्यक आहे.

पैठणमध्ये राष्ट्रवादीतून दत्ता गोर्डे, पैठण येथील संत एकनाथ साखर कारखान्याचे अध्यक्ष सचिन घायाळ, औरंगाबाद पश्चिम मतदारसंघात सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाठ यांच्या विरोधात राजू शिंदे, वैजापूरमध्ये प्रा. बोरनारे यांच्या विरोधात दिनेश परदेशी आदींना ठाकरे गटात प्रवेश देण्यात आला. या पूर्वी याच मतदारसंघातून भाऊसाहेब चिकटगावकर यांनी प्रवेश केला होता. परंतु परदेशी यांच्या प्रवेशानंतर त्यांनी ठाकरे गटाला रामराम ठोकला. सिल्लोडमध्ये मात्र उद्धव ठाकरे यांना नवा भिडू मिळवता आला नाही.

निवडणुकीच्या तोंडावर बीड, परभणी, धाराशिव, लातूर, जालना या मतदारसंघातून शरद पवार यांना भेटून येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. नांदेडमधील पक्षांतराचा खेळ काँग्रेस, भाजप आणि पुन्हा माघारी असा आहे.

सत्ता असल्यामुळे आरक्षण देणे तुमच्या हातात होते. आता विधानसभेचे मतदान आमच्या हातात आहे. तुम्हाला सत्तेत येऊ द्यायचे की नाही, हे आमच्या हातात आहे, कोणतेही आंदोलन नसताना १५ जातींचा ओबीसींमध्ये समावेश केला. परंतु मराठा समाजाच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याचे जरांगे म्हणाले.

गतवर्षीपेक्षा १० दिवस उशिराने मान्सून माघारी

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. १६ :**

महाराष्ट्रासह उर्वरित देशातून मंगळवारी मान्सून पूर्णपणे परतला. महाराष्ट्रातून गतवर्षापेक्षा यंदा तो दहा दिवस उशिराने परतला आहे. 2023 ला तो 5 ऑक्टोबरला परतला होता.

परतीचा मान्सून नंदुरबार जिल्ह्यात 14 ऑक्टोबरपर्यंत थबकला होता. 15 ऑक्टोबरला मात्र महाराष्ट्र- मध्य प्रदेशच्या सीमेला लागून असलेला भाग, छत्तीसगड, पूर्व ओडिशा, तेलंगण, उत्तर कर्नाटकसह संपूर्ण देशातून एका दिवसात त्याने निरोप घेतला. गेल्या आठवड्यापासून बंगालच्या उपसागरात ताकदवान तसेच वेगवान पूर्वीय वाऱ्यांच्या प्रणालींमुळेच महाराष्ट्र, मध्य प्रदेशचा काही भाग, छत्तीसगड, पूर्व ओरिसा, तेलंगणा, उत्तर कर्नाटकसह महाराष्ट्रातून मान्सून माघारी परतला आहे. मात्र तरीही पाच दिवसांच्या कालावधीत मराठवाड्यासह राज्यभरात तुरळक पाऊस पडण्याची शक्यता आहे. पावसाचे हे दुसरे आवर्तन असून ते चार दिवस आधी येणार आहे. महाराष्ट्रातून मुख्य मान्सून परतला. मात्र, आता आगामी तीन महिने पाऊस झाल्यास तो ईशान्य मान्सून किंवा हिवाळी पाऊस राहणार आहे.

महायुतीतून निवडणूक लढण्यासाठी
पूर्ण क्षमतेने सज्ज..

■ **महासागर प्रतिनिधी**
मुंबई, दि. १६ :

तटकरेंचे संकेत

आगामी विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीतून बाहेर पडून स्वतंत्र निवडणूका लढवणार असे विविध अंदाज येथील राजकीय निरीक्षक मोठया दाव्याने करत असतानाच, प्रसार माध्यमांशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष व खा.सुनील तटकरे यांनी मात्र पक्ष महायुतीच्याच माध्यमातून पूर्ण क्षमतेने निवडणूका लढवण्यासाठी सज्ज झाल्याचे वक्तव्य करत तसे स्पष्ट संकेत तर दिलेच पण भल्या भल्या राजकीय पंडितांनाही चांगलेच तोंडावर आपटले.

प्रतिनिधींनी खा. तटकरे यांच्याकडे निवडणुकीसंदर्भात विचारणा केली असता त्यांनी तर थेट आपला पक्ष महायुतीच्याच माध्यमातून निवडणूक लढण्यासाठी सज्ज झाल्याचे स्पष्ट संकेत देत राष्ट्रवादी काँग्रेस विषयी विविध अफवा व चर्चांना पूर्णविराम दिला.

खा.तटकरे म्हणाले की,आता अधिक गतीने उरलेल्या जागावाटपांचा निर्णय येत्या दोन दिवसात होईल.याचे नियोजन आज आणि उद्या एकत्र बसून करणार आहोत.महायुती म्हणून २८८ जागांवर बुथनिहाय महायुतीतील पक्ष व घटकपक्ष यांची ताकद एकत्रितपणे कशी करता येईल यादृष्टीने विधानसभा निहाय निरीक्षक नेमलेले असून आता या सर्व कामाला गती द्यावी लागणार असल्याचेही खा.तटकरे यांनी ठामपणे नमूद केले. यावेळी खा. तटकरे यांनी विरोधकांचाही खरपूस समाचार घेतला.

भाजपच्या 'त्यागा'ला शिंदे गटाचे 'त्यागा'ने उत्तर

■ **वृत्तसंस्था, रायगड, दि. १६ :**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपने त्यांच्यासाठी केलेल्या त्यागाची आठवण करून दिली.

भाजपने त्याग केल्यामुळेच ते मुख्यमंत्री झाल्याची बाब त्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर आता शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी आम्ही केलेल्या त्यागामुळेच राज्यात महायुतीचे सरकार आल्याचा दावा करत एकप्रकारे आपणही भाजपसाठी त्याग केल्याचे ठणकावून सांगितले आहे.

शिवसेनेतील फुटीनंतर राज्यात देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याचे सांगितले जात होते. पण ऐनवेळी भाजपने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली होती. अमित शहा यांनी एका बैठकीत शिंदे यांना या घटनाक्रमाची आठवण करून देत त्यांना भाजपसाठी मन मोठे करण्याची विनंती केली होती.

महायुतीत बेबनाव निर्माण होत असल्याची चर्चा असतानाच देवेंद्र फडणवीस यांनी अमित शहा असे काहीही बोलले नसल्याचा दावा केला. पण त्यानंतरही शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी भाजपला आपल्यामुळेच राज्यात महायुतीचे सरकार आल्याची आठवण करून दिली आहे.

भरत गोगावले म्हणाले, त्यांनी जसा त्याग केला, तसा आम्ही देखील त्याग केला. किंबहुना आम्ही केलेल्या त्यागामुळेच आम्हाला मुख्यमंत्री पद मिळाले. महायुतीची सत्ता आणायची असेल तर सर्वांना मिळून मिसळून काम करावे लागेल, असे ते म्हणाले.

महासागर वृत्तसागर

नागपूर

■ गुरूवार, दि. १७ ऑक्टोबर २०२४ ■

मागितली उमेदवारी, झाले निलंबन!

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. १६ :

भाजपचे माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी यांच्यावर भारतीय जनता पक्षाने निलंबनाची कारवाई केली आहे. देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री म्हणून हवे आहेत, अशी मागणी मल्लिकार्जुन रेड्डी यांनी केली होती. त्यांच्या या मागणीमुळे पक्षाने त्यांना तब्बल ६ वर्षांसाठी निलंबित केले आहे.

मल्लिकार्जुन रेड्डी यांनी रामटेकचे विद्यमान आमदार आशिष जयस्वाल यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेकडून दिलेल्या उमेदवारीला देखील विरोध केला होता.

मल्लिकार्जुन रेड्डी यांना भाजप पक्षाने अधिकृत पत्र पाठवले आहे. यात, आपण आपण भारतीय जनता पाटीर्चे जबाबदार पदाधिकारी असताना पक्ष विरोधी कारवाया करत पक्षशिस्त आणि अनुशासन भंग करणारे कृत्य केले आहे. आपली ही कृती पार्टीचे अनुशासन भंग करणारी असून आपल्याला ६ वर्षांकरता पक्षातून निलंबित करण्यात येत आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रामटेकचे विद्यमान अपक्ष आमदार आशिष जयस्वाल यांना शिवसेना पक्षाकडून उमेदवारी जाहीर केली आहे. पण त्यांच्या उमेदवारीला रामटेकचे माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी यांनी विरोध केला होता. एकनाथ शिंदे हे ॲक्सिडेंटल मुख्यमंत्री आहेत. त्यांना आता आम्हाला मुख्यमंत्री करायचे नाही. भाजपचा मुख्यमंत्री हवा. मला फाशी दिली तरी चालेल पण आशिष जयस्वाल यांच्या रामटेक मतदारसंघात काम करणार नाही, असे रेड्डी यांनी ठासून सांगितले होते.

आमच्या कार्यकर्त्यांची बैठक झाली. मी महायुतीचा सन्मान करतो. मात्र आशिष जयस्वाल यांना विरोध आहे. नागपूर जिल्ह्यातून शिंदे गटाचा आमदार येऊ नये, अशी आमची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी आहे, अशी भूमिका त्यांनी घेतली होती.

पुढे मल्लिकार्जुन रेड्डी म्हणाले, महायुतीचे धर्मपालन कसे करणार? आशिष जयस्वाल यांनी आमच्या कार्यकर्त्यांना मदत केली नाही. कार्यकर्त्यांना मानसन्मान नाही. निधी देत नाहीत. ते अपक्ष बंडखोर आमदार होते. विदर्भात न्याय मिळाला पाहिजे. ४५ जागा निवडून आणण्याचा संकल्प केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केला आहे.

आम्ही आशिष जयस्वाल यांचे काम करणार नाही फाशी दिली तरी चालेल. उमेदवार बदलला पाहिजे, हे पक्षाचे वफादार नाहीत. भाजपने पुन्हा विचार करावा. माझ्याकडे काय आहे, काहीच नाही, आमच्यावर काय कारवाई करणार, असे रेड्डी म्हणाले होते.

दरम्यान, शिंदे समर्थक अपक्ष आमदार ॲड. आशिष जयस्वाल यांना खुला विरोध करणे माजी आमदार रेड्डी यांना भोवले असून, उमेदवारी तर दूरच त्यांना निलंबीत करण्यात आले.

आश्वासन को काय भये गा देवाभाऊ?

चौसर

मनोज बागडे

निवडणुका आल्यात की समर्थनार्थ आणि विरोधात बॅनरबाजी करण्याची एक प्रथा आहे. नेतेच स्वतःचा उदोउदो करण्यासाठी मतदार संघात जागा मिळेल तिथे बॅनर लावतात. विधानसभेची निवडणूक जाहीर झाली आहे, राज्यात सगळीकडे महायुती सरकारचे मंत्री, विद्यमान आमदार आणि ईच्छूक उमेदवारांचे बॅनर झळकत आहेत, गेल्या पाच वर्षात आपण काय काय आणि कसे कसे दिवे लावले? याचा लेखाजोखा मांडला जात आहे. या बॅनरमध्ये भाऊ, साहेब, कार्यसम्राट आणि साहित्यीकांना बुचकळ्यात पाडतील, अशा उपाधी व शब्दांचा वापर करण्यात आला आहे.

तथापि, नागपूर शहराच्या काही भागात लागलेले बॅनर लक्षवेधी आहेत. आदिम जागृती समितीच्या नावाखाली हलबा कोष्टी समाजाने लावलेल्या या बॅनरमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि नागपूरचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साधा, सोपा, सरळ प्रश्न विचारला आहे, पाच वर्षांपूर्वी दिलेल्या आश्वासनाचे काय झाले? या हलबा कोष्टी समाजाच्या बोलीभाषेत हा प्रश्न मांडायचा झाला तर, देवाभाऊ, काय भये गा तोरो आश्वासन को? असे विचारता येईल.

पूर्व विदर्भाच्या नागपूर, भंडारा या दोन जिल्ह्यात हलबा कोष्टी समाज मोठ्या संख्येने आहे. नागपूर शहराच्या मध्य भागातील गोळीबार चौक, गांजाखेत, जागनाथ बुधवारी, बिनाखी मंगळवारी अशा काही भागात हा समाज बहुसंख्येने दिसतो. विधानसभेच्या मध्य नागपूर या मतदारसंघावर तर त्यांचा दबदबा आहे येथील भाजपाचे आमदार विकास कुंभारे याच समाजाचे. तिकडे, भंडारा शहरासह या जिल्ह्यातील मोहाडी, आंधळगाव, सिहोरा, मुंढरी, सानगडी, पवनी ही काही गावे या समाजाच्या अधिक लोकसंख्येने व्यापली आहेत. नागपूर जिल्ह्यातील उमरेड, भिवापूर, खापा येथेही हा समाज बहुसंख्येने आहे.

हातमागावरील विणकरी हा या समाजाचा मुख्य व्यवसाय. यंत्रयुगात हातमाग बंद पडले, विणकरी बुडाली, समाज देशोधडीला लागला. साधारणतः ३० वर्षापूर्वीपर्यंत या समाजातील लोकांना अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळायचे. त्याआधारे हजारो तरूण विविध शासकीय विभागात विशेषतः बँका, रेल्वेत नोकरीवर लागले. नंतर त्यांना हलबा कोष्टी जातीचे प्रमाणपत्र मिळणे बंद झाले आणि वाताहत सुरू झाली.

पुढे या समाजाचा विशेष मागास प्रवर्ग म्हणजे एसबीसीमध्ये समावेश झाला. आरक्षण २ टक्क्यांवर आले. हलबा कोष्टी समाजाला एसटी प्रवर्गात सामावून घेण्यासाठी समाजाचा गेल्या कित्येक वर्षांपासून लढा सुरू आहे. आदिम संघर्ष समिती, जनजागृती समिती आणि अशाच अनेक संघटना उभ्या झाल्यात. समाजाचे नेते, प्रतिनिधी वेगवेगळ्या पक्षात विखुरले असले तरी त्यांची मागणी एकच आहे, एसटीचे आरक्षण द्या.

समाजाची गठ्ठा मते लक्षात घेता, यापूर्वी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी त्यांचा एसटीमध्ये समावेश करण्याचे आश्वासन दिले होते. त्याच आश्वासनाच्या आधारे विकास कुंभारे हे मध्य नागपूरमधून भाजपाकडून निवडून आले. गेल्या अनेक वर्षात नेते बदलले, सत्ता बदलली, परंतु, हलबा कोष्टी समाजाच्या मागण्या होत्या तिथेच आहेत. या समाजाचा अनु. जमातीमध्ये समावेश करण्याचे गाजर तेवढे दाखवले जात आहे.

गेल्या वर्षी विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशन काळात समाजाच्या अनेक प्रतिनिधींनी आमदार विकास कुंभारे यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली असताना, एसटी प्रवर्गात आरक्षणाचा विषय आपण ज्येष्ठ नेत्यांकडे मांडला. मात्र, ते आश्वासनांची पूर्तता करू शकले नाहीत, अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली होती. मागच्या १० वर्षात केंद्रातील भाजपा सरकारने हा विषय बासनात गुंडाळून ठेवला. नागपूरच्या खासदारांनी याविषयी ब्र काढला नाही, २०१४ ते २०१९ या पाच वर्षात आणि आताच्या अडीच वर्षात सत्तारूढ सरकारांनी तोंड फिरविले.

निवडणूक काळात नेत्यांकडून केवळ आश्वासनांची खिरापत वाटली जात असल्याने हलबा कोष्टी समाज कमालीचा संतापला आहे. आश्वासनांचे काय झाले देवाभाऊ? म्हणून प्रश्न विचारले जात आहेत. या संतापाचे दुष्परिणाम नागपूर शहराच्या काही मतदारसंघात दिसू शकतात.

मुळक सहायता कक्षाच्या माध्यमातून
सिहोरा वस्तीत स्ट्रीट लाईट

सुरक्षिततेसाठी माजी मंत्री राजेंद्र मुळक यांचा पुढाकार

■ **महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. १७ :**

कन्हान - पिपरी नगरपरिषद अंतर्गत सिहोरा वस्तीमध्ये राजेंद्र मुळक सहायता कक्षाच्या माध्यमातुन स्ट्रीट लाईट लावण्यात आले. मागील काही दिवसांपासून सिहोरा वस्तीमध्ये वाघाने चांगलाच धुमाकुळ घातला होता. शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांवर हल्ले करुन आतापर्यंत ४ गाईंना ठार मारले तर ३ गाईंना जखमी केल्याच्या घटना घडल्यात.

या पार्श्वभूमीवर नागपूर जिल्हा ग्रामिण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी भेट देऊन नागरिकांच्या समस्यां समजून घेतल्या. यावेळी स्थानिक नागरिकांनी अंधारलेल्या परिसरातील स्ट्रीट लाईट्सच्या अभावी निर्माण झालेल्या समस्यांबद्दल तक्रार केली. या समस्यांच्या निराकरणासाठी राजेंद्र मुळक सहायता कक्षाच्या माध्यमातून त्वरित उपाययोजना करण्यात आल्या आणि सिहोरा वस्ती येथे स्ट्रीट लाइट लावण्यात आले. नागरिकांनी त्यांचे आभार मानले. स्ट्रीट लाइट लावल्याने आता परिसरात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मध्य नागपूरसाठी काँग्रेसमध्ये भाऊगर्दी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :**

नागपूर शहराच्या सहाही विधासभा मतदारसंघासाठी काँग्रेस इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या. नागपूरच्या सहाही जागा काँग्रेस लढणार असल्याचा दावा शहर अध्यक्ष व आमदार विकास ठाकरे यांनी केला आहे.

नागपूर शहरातील सर्व सहाही विधानसभा मतदारसंघावर आतापर्यंत ७१ इच्छुक उमेदवारांनी शहर काँग्रेसकडे उमेदवारी मिळावी, यासाठी अर्ज केले आहे. यात सर्वाधिक ३० अर्ज हे मध्य नागपूर विधानसभेसाठी आलेत.

२०१९ च्या निवडणुकीत येथून काँग्रेसचे बंटी शेळके हे अवघ्या ४००८ मतांनी पराभूत झाले होते. यावेळी शेळकेंसह ॲड. नंदा पराते आणि अनेकांनी दावेदारी केली आहे. भाजपाचे विद्यमान आमदार विकास कुंभारे यांच्याविषयी संपूर्ण मतदारसंघात असलेली नाराजी काँग्रेससाठी फायद्याची ठरेल, हे लक्षात घेवून काँग्रेसच्या ३० जणांनी लढण्याची तयारी दर्शविली आहे. दुसरीकडे, देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात लढण्यासाठी देखील काँग्रेस मध्ये इच्छुकांची मोठी यादी असल्याचे अर्जावरून दिसून येत आहे.

मध्य नागपूरमध्ये फैजल रंगूनवाला प्रबळ दावेदार

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. १६ :

महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच मध्य नागपूर मतदारसंघात मुस्लिम समाजाला प्रतिनिधीत्व देण्याची मागणी सध्या जोर धरू लागली आहे.

शहरातील मुस्लीम समाजातील प्रमुख कार्यकर्ता आणि तडफदार तरूण म्हणून फैजल रंगूनवाला यांचे नाव घेतले जाते. काँग्रेसच्या यादीत त्यांचे नाव आघाडीवर आहे. मुस्लीम समाजाचे प्रतिनिधी म्हणून फैजल रंगूनवाला हे काँग्रेसमध्ये तिकीट मिळविण्याचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. मुस्लिम तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय असलेले फैजल स्वच्छ प्रतिमा, मिलनसार व्यक्तीत्व आणि प्रत्येक गरजूंसाठी धावून जाणारे म्हणून ओळखले जातात.

मुस्लिम आणि इतर समाजातील सर्व प्रकारच्या कार्यक्रमात सहभाग असणारे फैजल गरजूंना शिक्षणासाठी आर्थिक तसेच वस्तूंच्या रूपात मदत करण्यामुळे लोकप्रिय आहेत. सामाजिक समरसतेसाठी पुढाकार घेतल्याने इतर समाजातही त्यांची चांगली प्रतिमा आहे. काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांकडून फैजल रंगूनवाला यांच्या नावावर सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत. शहरातील अनेक अल्पसंख्याक समाजाच्या नेत्यांनीही त्यांचे नाव पुढे केले आहे. यावरून फैसल रंगूनवाला हे मध्य नागपुरात काँग्रेसचे उमेदवार असू शकतात, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

भाजप आमदाराच्या शाळेत मतदान केंद्र

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :**

राज्यात निवडणूकीची घोषणा झाली असून निवडणूक आयोग मतदानाच्या तयारीला लागले आहे. मतदानसाठी राज्यभरातील विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये मतदान केंद्र उभारले जाणार आहेत.

मात्र नागपूर जिल्ह्यातील हिंगणा विधानसभा क्षेत्रातील मतदान केंद्रावर आक्षेप नोंदविण्यात आले. हिंगणा मतदारसंघात भाजपचे आमदार समीर मेघे यांच्याद्वारा संचालित शाळेत मतदान केंद्र दिल्यामुळे राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) माजी आमदार विजय घोडमारे व पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंटे यांनी आक्षेप घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली.

याचिकेनुसार, हिंगणा-वानाडोंगरी येथील शिक्षण संस्थेतील महात्मा गांधी इंग्लिश मीडियम हायस्कूल येथे निवडणूक आयोगातर्फे मतदान केंद्र उपलब्ध करून देण्यात येतात. ही शाळा मेघे ग्रुप ऑफ इंन्स्टिट्यूशनतर्फे संचालित केली जाते.

ही शाळा हिंगणा मतदारसंघात येत असून याच मतदार संघाचे भाजपाचे आमदार समीर मेघे या शिक्षण संस्थेचे सचिव आहे. या शाळेमध्ये मतदान केंद्र क्रमांक २६० ते २६६ असे सात मतदान केंद्र आहेत. यावर याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला. त्या विरोधात माजी आमदार विजय घोडमारे यांनी हिंगणा विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान नोंदणी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. मात्र त्यावर सकारात्मक निर्णय न घेतल्याने त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. याचिकेत जिल्हा निवडणूक अधिकारी व जिल्हाधिकारी, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, केंद्रीय निवडणूक आयोग, उप जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व मतदान नोंदणी अधिकारी यांना प्रतिवादी करण्यात आले.

नियमानुसार मतदान केंद्र हे शासकीय शाळा, महाविद्यालय किंवा संस्थेच्या परीसरामध्ये असायला हवे. परंतु, ही सात केंद्र समीर मेघे यांच्या शिक्षण संस्थेमध्ये असल्याचा त्याचा प्रभाव मतदानावर पडू शकतो.

त्यामुळे, ही अवैध मतदान केंद्र इतर ठिकाणी स्थानांतरीत करावे, अशी विनंती याचिकेतून करण्यात आली. याचिकाकर्त्यांने एकाच शाळेत सात मतदान केंद्रावर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केला.

उच्च न्यायालयात याप्रकरणी न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. न्यायालयात दोन्ही पक्षांनी जोरदार युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांच्या युक्तिवादानंतर आरोप तथ्यहीन असल्याचे निरीक्षण नोंदवित उच्च न्यायालयाने याचिका निकाली काढली.

काँग्रेस कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला
दोन आरोपींना शिताफीने अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :**

चंद्रमणीनगर परिसरात २ आरोपींनी काँग्रेस कार्यकर्त्यावर हल्ला केला. शस्त्राने वार करून ठार मारण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच अजनी पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि दोन्ही आरोपींना अटक केली.

लोकेश सुरेश गयाल (२४) रा. रामेश्वरी चौक आणि कार्तिक सूरज बालगुहरे (२३) रा. चंद्रमणीनगर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच काँग्रेस कार्यकर्त्यावर हल्ला झाल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. हा हल्ला राजकीय द्वेषातून झाल्याचे बोलल्या जात आहे. मात्र पोलिसांनी आपसी वादातून हा हल्ला झाला.

जखमी सुहास रमेश नानवटकर (३८) हे शहर काँग्रेस कमिटीचे सचिव आहेत. मंगळवारी रात्री ते पत्नीसोबत चंद्रमणीनगरात सासूला भेटायला गेले होते. रात्री ९ वाजताच्या सुमारास सुहास आणि त्यांची सासू घरासमोर उभे राहून बोलत होते.

त्याच दरम्यान दोन्ही आरोपी तेथे आले. आता तुझे राजकारण संपवतो, असे म्हणत कार्तिकने सुहास यांना मारहाण सुरू केली. लोकेशने शस्त्र काढून सुहासचे डोक्यावर मागच्या बाजूला वार करून गंभीर जखमी केले. रक्तबंबाळ होऊन सुहास जागीच कोसळले. पोलिसांनी दोन्ही आरोपींना पकडून सुहास यांना उपचारार्थ रुग्णालयात रवाना केले. तृप्तीच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. कार्तिकवर यापूर्वीही तीन गुन्हे नोंद आहेत. तसेच लोकेश याच्यावरही एक गुन्हा नोंद आहे.

राजकीय द्वेषातून झाला हल्ला

राजकीय द्वेषातून सुहास यांच्यावर हल्ला करण्यात आला आहे. बुधवारी दक्षिण नागपूरच्या पदाधिकाऱ्यांनी झोन ४ च्या डीसीपी रश्मिता राव यांची भेट घेऊन सुरक्षा देण्याची मागणी केली आहे. तर अजनी पोलिसांनुसार, दोन्ही आरोपींचे सुहासच्या सासूच्या शेजाऱ्याकडे येणे-जाणे होते. त्यावर सुहास यांनी अनेकदा आक्षेप घेतला होता. त्यामुळे दोन्ही आरोपींनी याचा वचपा काढण्यासाठी सुहास यांच्यावर हल्ला केला.

नागपूर जिल्ह्यात ४६१० मतदान केंद्र

राज्य सीमेवर विशेष दक्षता : समाज माध्यमांवर विशेष लक्ष : जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांची माहिती

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. १६ :

जिल्ह्यातील 12 विधानसभा मतदारसंघातील 4610 मतदान केंद्रांवर 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. सुमारे 44 लाख 94 हजार 784 मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून सर्वांनी आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, सहपोलिस आयुक्त निसार तांबोळी, जिल्हा पोलिस अधीक्षक (ग्रामीण) हर्ष पोद्दार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रवीण महिरे आदी उपस्थित होते.

जिल्हा प्रशासनाचे ७५ टक्क्यांवर मतदानाचे लक्ष्य आहे. केवळ प्रशासनाने मानस व्यक्त करून हा संकल्प साध्य होणार नाही. यासाठी मतदारांनीही प्रशासनाच्या या

आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत अधिकाधिक संख्येने मतदानासाठी पुढे येण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. इटनकर यांनी यावेळी केले.

सहाय्यक पोलिस आयुक्त निसार तांबोळी यांनी शहरी भागात तर जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी ग्रामीण भागात पोलीस विभागाने केलेल्या तयारीची माहिती यावेळी दिली. यामध्ये कायदा व सुव्यवस्था, चेक पोस्टवरील बंदोबस्त, मनुष्यबळाची उपलब्धता, प्रतिबंधात्मक कारवाई आदी विषयांची माहिती देऊन निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस विभागामार्फत सुरक्षेच्या सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात 12 विधानसभा मतदारसंघ असून या मतदारसंघातील निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. दि. 22 ऑक्टोबर रोजी निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल. 29 आक्टोबर हा नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक असणार आहे. 30 ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येणार आहे. 4 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. 20 नोव्हेंबर रोजी मतदान तर 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया 25 नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात एकूण 4610 मतदान केंद्र असणार आहेत. यात काटोल विधानसभा - 332, सावनेर 370, हिंगणा 472, उमरेड 395, कामठी 524, रामटेक 359, नागपूर दक्षिण पश्चिम 378, नागपूर दक्षिण 350, नागपूर पूर्व 364, नागपूर मध्य 308, नागपूर पश्चिम 351, आणि नागपूर उत्तर 407 अशी एकूण 4610 मतदान केंद्र असणार आहेत.

राज्य सीमेवर विशेष दक्षता

मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे यासाठी मतदार चिठ्ठी, एकाच ठिकाणी 5 पेक्षा जास्त मतदान केंद्र असल्यास गर्दी नियंत्रणासाठी विशेष उपाययोजना करण्यात येणार आहे. तसेच मध्य प्रदेशलगतच्या राज्य सीमेवरील चेकपोस्टवर विशेष दक्षता घेण्यात येणार आहे. राज्य उत्पादन शुल्क, परिवहन, वन तसेच पोलीस विभागांच्या पथकांमार्फत चेक पोस्टवर विशेष दक्षता घेण्यात येणार आहे.

सोशल मीडियावर विशेष लक्ष

सोशल मीडिया, फेक न्यूजवर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. सोशल मीडियावर प्रसारित होणारे, गैरसमज पसरविणारे संदेश व इतर घटनांवर लक्ष ठेवून कारवाई करण्याची खबरदारी घेणार असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले.

ट्रॅव्हल्सच्या तिकिट दरांमध्ये पुन्हा प्रचंड वाढ

तक्रार करण्यासाठीचे क्रमांक बंद

■ **महासागर प्रतिनिधी**
नागपूर, दि. १६ :

दिवाळीच्या आगमनापूर्वी खासगी प्रवासी बस चालकांकडून पुन्हा तिकिट दरांमध्ये वाढ करत प्रवाशांची लूट चालू झाली आहे. सुट्ट्या आणि सण यांच्या काळात प्रवासासाठी अधिक तिकिट दराचा भुर्दंड भरावा लागणारच, अशी धारणा सर्वसामान्यांची झाली आहे.

वर्ष २०१८ मध्ये राज्य शासनाने आदेश काढला आणि प्रवासी बसचे तिकिटदर निश्चित केले. परंतु ६ वर्षे होऊन गेली परिस्थिती जैसे थे आहे. आदेशात अधिक तिकीटदर आकारणाऱ्या खासगी बस चालकांच्या विरुद्ध तक्रार करण्यासाठी (०२२) ६२४२६६६६ त्याचप्रमाणे १८००२२०११० हे दोन संपर्क क्रमांक दिले होते. ते सध्या बंद स्थितीत आहेत. ही प्रवाशांची लूट केव्हा थांबणार, असा प्रश्न हिंदु जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक अभिषेक मुरुकटे यांनी केला आहे. या

संदर्भात एक निवेदन महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्तांना यांना सादर करण्यात आले.

काही प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी तक्रार करण्यासाठी व्हॉट्सॲप हेल्पलाइन क्रमांक जाहीर केले. पण आयुक्त कार्यालयाने असे करण्यासाठी आदेश निर्गमित केले असल्यास, अन्य प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी असे क्रमांक का जाहीर केले नाहीत? परिवहन अधिकाऱ्यांची भेट घेऊन अधिक तिकिट दर आकारणाऱ्या खासगी बस चालकांविरुद्ध काय कार्यवाही केली, असे विचारले असता आमच्याकडे तक्रारीच आल्या नाहीत, असे उत्तर देण्यात आले. जर तक्रारीसाठीचा क्रमांकच बंद आहे, तर तक्रारी येणार कशा? अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, हे संपर्क क्रमांक तत्काळ चालू करून ते २४ तास चालू रहायला हवेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

यासह ॲप आणि वेब-बेस्ड ॲग्रीगेटर्सवर देखील नियंत्रण यावे, या दृष्टीने महाराष्ट्र रेग्युलेशन्स ऑफ एग्रिगेटर रुल्स २०२२ तयार करण्यासाठी ५.४.२०२३ यादिवशी समिती गठित केली, परंतु अद्यापर्यंत या समितीकडून अहवालच सादर झालेला नाही. तो कधी सादर करणार आणि त्याची अंमलबजावणी कधी होणार? असे प्रश्न समितीने उपस्थित केले आहेत. सुराज्य अभियानने या आधी अनेकदा परिवहन विभाग आणि राज्य शासनाकडे पत्र, ई-मेल, आणि ट्विटरच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष भेटून संवाद साधला आहे. तरीही बराच काळ लोटूनही प्रश्न अनुत्तरितच आहेत आणि प्रवाशांची लूट सुरूच आहे.

दरम्यान, महासागर प्रतिनिधीने नागपूर येथून सुटणाऱ्या काही ट्रॅव्हल्स कंपनीच्या संचालकांसोबत संवाद साधला असता, वर्षभर प्रवासी मिळत नाही, दिवाळीत गर्दी असते, त्यामुळे या हंगामात काही प्रमाणात तिकीट दर वाढविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु, १२०० रूपयांचे तिकीट ३ हजारावर कसे? असा प्रश्न विचारला असता एकानेही यावर बोलण्यास नकार दिला.

नक्की काय आहे ऑस्टियोपोरोसिस ?

एका निरीक्षणानुसार भारतात ३ कोटी ६० लाख लोक ऑस्टियोपोरोसिस या आजाराशी झुंज देत आहेत. या आजाराचे वैशिष्ट्य म्हणजे हाडांना ठिसूळ करणे. या आजाराने, आजच्या तरुणाईला आपला विळखा घातला आहे. तिशी पार केलेल्या महिलांमध्ये हात-पाय दुखण्याचे मुख्य कारण म्हणजे ऑस्टियोपोरोसिस. या आजाराशी सामना करायचा असेल तर हाडांची काळजी कशा प्रकारे घ्यावी हे जाणून घेणे सर्वात महत्वाचे आहे.

हाडांचे दुखणे आज एक सामान्य समस्या झाली आहे. पुरुषांपेक्षा महिलांना ही समस्या जास्त भेडसावते. तसेच वाढत्या वयासोबत हा आजार वाढण्याचा धोका जास्त संभवतो. आधुनिक जीवनशैलीने दिनश्चर्या व अनियमित खाण्यापिण्याच्या सवयींमुळे या आजाराचे प्राबल्य वाढले. त्यामुळे आजच्या तरुणाईवर या आजाराचा जास्त प्रभाव जाणवतो. शरीरात कॅल्शियम व व्हिटॅमिन डी'च्या कमतरतेमुळे ऑस्टियोपोरोसिसचा धोका वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. साधारण वयाची ४५ गाठल्यानंतर या आजाराची सुरुवात होते, मात्र ६०-७० वयापर्यंत हा आजार जास्त त्रासदायक होतो.

नक्की काय आहे ऑस्टियोपोरोसिस ?

ऑस्टियोपोरोसिस हा एक हाडांचा आजार असून या आजारात हाडांच्या ठिसुळपणात वाढ होऊन त्यात फ्रॅक्चर होण्याची शक्यता वाढते. याचे मुख्य कारण म्हणजे बोन मिनरल डेन्सिटीचा अभाव. वाढत्या वयाबरोबर हाडांमध्ये कॅल्शियम कमी होण्यास सुरुवात होते. त्यामुळे हाडांचा मजबुतपणा कमी होऊन त्यामुळे हाडे तुटण्याची शक्यता वाढते.

ऑस्टियोपोरोसिस या आजाराचे मुख्यत: दोन प्रकार पडतात.

ङ टाईप १ : पहिला प्रकार हा महिलांमध्ये आढळून येतो, विशेषत: मॉनोपॉज़नंतर.

ङ टाईप २ : ७५ वर्षांवरील स्त्री-पुरुष या आजाराचे बळी ठरतात.

ऑस्टियोपोरोसिसचा सर्वात जास्त प्रभाव मणका व मनगटाची हाडे यांवर असतो.

आकडेवारी

१) वयाची पन्नाशी पार केलेल्या १२ पैकी एका पुरुषाला तर ३ पैकी एका स्त्री या आजाराला बळी पडलेली असते.

२) स्पाइनल फ्रॅक्चरमुळे ८० टक्के लोकांना ऑस्टियोपोरोसिस या आजाराची लागण होते. ऑस्टियोपोरोसिस झालेल्या ५० टक्के महिलांमध्ये विटॅमिन डीची कमतरता दिसून येते.

३) राष्ट्रीय ऑस्टियोपोरोसिस फाउंडेशनच्या आकडेवारीप्रमाणे आतापर्यंत १ कोटी लोकांना या आजाराची लागण झाली आहे.

४) जागतिक स्वास्थ संघटनेच्या आकडेवारीनुसार भारतात पन्नाशीत असणाऱ्या २ पैकी १ स्त्रीमध्ये या रोगाची लक्षणे आढळतात.

बोन डेन्सिटी टेस्ट :

बोन डेन्सिटी टेस्टसाठी एका विशेष प्रकारचा एक्स-रेचा वापर केला जातो. त्याला डीएक्सए (ड्यूअल एनर्जी एक्स-रे) असे संबोधतात. याद्वारे मणका, माकडहाड व हातांच्या हाडांचे स्क्रीनिंग करण्यात येते. या भागातील हाडांची डेन्सिटी पडताळली जाते. जेणेकरून हाडे ठिसूळ होऊन तुटण्याच्या आधी त्यांच्यावर उपचार सुरु करता येऊ शकतात. साधारणत: वयाच्या ४५ नंतर दर ५ वर्षांने ही तपासणी करणे आवश्यक आहे.

स्त्रीयांना जास्त धोकादायक

१) स्त्रीची आजाराला बळी पडण्याची शक्यता पुरुषांपेक्षा जास्त असते. विशेषत: ठेंगण्या व शरीराने बारीक असणाऱ्या महिलांना हा आजार होण्याची शक्यता जास्त असते.

२) अनुवंशिकतेने या आजाराची लागण होण्याची शक्यता ७० टक्क्याने वाढते.

३) तरुण स्त्रीयांमध्ये नियमित मासिक धर्माच्या आधी येणाऱ्या मोनोपॉज़ स्थितीत जाणाऱ्या महिलांना या आजाराचा धोका संभवतो.

osteoporosis ऑस्टियोपोरोसिसची कारणे :

१) ऑस्टियोपोरोसिस आजाराचे मुख्य कारण म्हणजे पुरुषांमध्ये असणाऱ्या एण्ड्रोजन व महिलांमध्ये असणाऱ्या एस्ट्रोजन या हार्मोन्सची कमतरता.

२) शरीरात असणारी कॅल्शियम व विटॅमिन डीची कमतरता

३) थायरॉईडची समस्या व अनुवंशिकता

४) हाडांचा कॅन्सर

५) औषधांचा शरीरावर भडीमार

६) शारीरिक हालचालींची कमतरता किंवा मोठी बेड रेस्ट

७) धुम्रपान व मद्यपानामुळे हाडे ठिसुळ होतात.

ऑस्टियोपोरोसिस लक्षणे :

१) सामन्यात: ऑस्टियोपोरोसिस आजाराची लक्षणे ठळकपणे दिसून येत नाहीत. याचे प्रमुख लक्षण म्हणजे हाडांना फ्रॅक्चर. सामान्यत: माणसाची हाडे सहजासहजी मोडत नाहीत, परंतू या आजाराच्या प्रभावामुळे हाडे मोडतात, त्यामुळे याला फ्रेजाईल फ्रॅक्चर असे म्हणतात. असे फ्रॅक्चर केवळ मणका, माकडहाड व मनगटाचे हाड अशा ठिकाणी होते.

२) या आजारामध्ये हाडे आकुंचन पावतात. बोनमास व बोन टिशुचे देखील विघटन होण्यास सुरुवात होते.

३) सुरुवातीला या रोगाची कोणतीच लक्षणे दिसून येत नसली तरी नंतर कमरेच्या खालचा हिस्सा व मानेला त्रास होण्यास सुरुवात होते.

४) हिवाळ्यामध्ये हाडांचे दुखणे वाढणे, शारीरिक सक्रियेत कमतरता.

ऑस्टियोपोरोसिस थांबविण्यासाठी घ्यावयाची काळजी

१) जीवनशैलीत बदल आवश्यक आहेत. जेवणामध्ये कॅल्शियम व विटॅमिन 'डी'चा प्रामुख्याने समावेश असावा. हिरव्या पालेभाज्या, डेअरी प्रोडक्ट्स, मासे या घटकांमध्ये कॅल्शियम व विटॅमिन 'डी' मोठ्या प्रमाणात असतात.

२) १५०० मिलीग्रॅम कॅल्शियमचे सेवन करणे आवश्यक आहे.

३) शरीराचे वजन प्रमाणात ठेवणे आवश्यक आहे.

४) दररोज एक मैल पायी चालणे लाभदायक. चालणे हाडांसाठी चांगले असते.

५) व्यायाम, योग यांच्या माध्यमातून शारीरिक हालचाल होणे आवश्यक

उपचार :

ऑस्टियोपोरोसिस या आजाराच्या रुग्णाला विटॅमिन 'डी', विशेषत: विटॅमिन 'डी' ३ व बायोफॉस्फोनेट पूरक स्वरूपात देण्यात येते. व्हिटेमिन 'के' देखील बोन डेन्सिटी वाढविण्यास मदतगार सिद्ध होते. सिलेक्टिव एस्ट्रोजन रिसेप्टर मॉड्यूलेटर सिरम थेरपी देखील या आजाराच्या उपचारासाठी वापरली जाते.

कॅल्शियम शरीरासाठी आवश्यक का ?

हाडे बळकट करण्यासाठी शरीर कॅल्शियम व फॉस्फेटचा वापर करते. कॅल्शियम हृदय, मेंदू व दुसऱ्या अवयवांसाठी देखील आवश्यक आहे. या अंगांचा देखील व्यवस्थित वापर करण्यासाठी पुन्हा शरीराला कॅल्शियमची आवश्यकता असते. योग्य प्रमाणात शरीरात कॅल्शियम नसेल तर त्याचा परिणाम हाडे व टिशुवर होतो. त्यामुळे हाडे ठिसूळ व लवकर तुटणारी बनतात. यासाठी वयाच्या ३० वर्षापर्यंत जेवणात कॅल्शियम योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे कारण याच काळामध्ये हाडाचा विकास मोठ्या प्रमाणात होत असतो.

एका निरीक्षणानुसार भारतात ३ कोटी ६० लाख लोक ऑस्टियोपोरोसिस या आजाराशी झुंज देत आहेत. या आजाराचे वैशिष्ट्य म्हणजे हाडांना ठिसूळ करणे. या आजाराने, आजच्या तरुणाईला आपला विळखा घातला आहे. तिशी पार केलेल्या महिलांमध्ये हात-पाय दुखण्याचे मुख्य कारण म्हणजे ऑस्टियोपोरोसिस. या आजाराशी सामना करायचा असेल तर हाडांची काळजी कशा प्रकारे घ्यावी हे जाणून घेणे सर्वात महत्वाचे आहे.

हाडांचे दुखणे आज एक सामान्य समस्या झाली आहे. पुरुषांपेक्षा महिलांना ही समस्या जास्त भेडसावते. तसेच वाढत्या वयासोबत हा आजार वाढण्याचा धोका जास्त संभवतो. आधुनिक जीवनशैलीने दिनश्चर्या व अनियमित खाण्यापिण्याच्या सवयींमुळे या आजाराचे प्राबल्य वाढले. त्यामुळे आजच्या तरुणाईवर या आजाराचा जास्त प्रभाव जाणवतो.

घरात मुलाला एकटं ठेवण्याचं योग्य वय ओळखा

- ❒ मूल शारीरिक आणि मानसिकदृष्टया सक्षम आहे ना ?
- ❒ कोंडून घेणार नाही, याची काळजी घ्या.
- ❒ मूल घरात एकटे राहण्याने आत्ममग्न होण्याची भिती

शाळा सुरू झाल्या, की आई- वडिलांना त्यांच्या शाळेबरोबर त्यांच्या पाळणाघराची किंवा त्यांना घरी ठेवणार असाल, तर ते सुरक्षित राहतील याची सतत काळजी सतावत असते. आई-वडील आज दोघे जण कामानिमित्त बाहेर पडत असल्यामुळे मुलांना बघायला किंवा त्यांची काळजी घ्यायला कोणी नसतं. अनेकदा आजी-आजोबा गावाकडे असल्यामुळे या बाबतीत त्यांची मदत घेता येत नाही. एका विशिष्ट मर्यादेनंतर मुलाला घरात एकटं ठेवायचं का नको. अशी काळजी सतत पालकांना वाटत असते. तेव्हा या बाबतीत निर्णय घेताना थोडा विचार करण्याची गरज आहे. तुमचं मुल शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम आहे ना, ते स्वत:ची जबाबदारी स्वत: घेऊ शकतं ना, याचा विचार करा. तुमचं मुल घरी एकट राहतांना त्याला काही अडचण येणार नाही ना, याची काळजी घ्या. मुलाशी बोला त्याचं मत लक्षात घ्या.

* सराव: घेतलेला निर्णय लगेचच प्रत्यक्षात आणू नका. त्यासाठी सराव करा. लाइट गेल्यावर काय करायचं. घरात आग लागली तर काय करायचं अशा गोष्टीचं मुलांना प्रशिक्षण द्या. जरी तुम्ही त्यांना एकट सोडून जात असला तरी तुम्ही आवश्यकता वाटल्यास येऊशकता याची जाणीव मुलांना करून द्या. त्यांच्याबरोबर किंवा आजूबाजूला शेजारी किंवा त्यांच्या वयाची मुले जर असतील, तर ती रमू शकतील. तुमचं मूल मानसिकदृष्टया किती खंबीर आणि मोठं आहे, याचा अंदाज घेऊन त्याला एकटं सोडा अन्यथा हा प्रयोग करू नका. यामुळे मूल आत्ममग्न होण्याची भिती असते.

ते स्वत:ची जबाबदारी स्वत: घेऊशकतं ना, याचा विचार करा. तुमचं मूल घरी एकटं राहताना त्याला काही अडचण येणार नाही ना, याची काळजी घ्या. याबाबत स्वत:मनाने निर्णय घेऊनका, मुलाशी बोला, त्याचं मत लक्षात घ्या. दिलेली कामे आणि शिस्त मुलामध्ये असेल, तर तो ही जबाबदारी योग्यरित्या पाळू शकतो. तुमच्या मुलाला फोनचा वापर करता येतो ना ? या सर्व प्रश्नांची उत्तरे होय असतील, तर त्याला एकटं घरी ठेवण्यास हरकत नाही.

* काळजी-

तुमचा आणि घरांच्याचा मोबाइल नंबर त्याच्याकडे आहे ना, याची खात्री करा. आवश्यकता वाटल्यास पोलीस किंवा डॉक्टरांना कसं बोलावयाचं हे त्यांना शिकवा. दारं आणि खिडक्या लावून ते स्वत:ला कोंडून घेणार नाहीत, याची काळजी घ्या. रेडिओ, टि.व्ही आणि व्हिडिओ गेमचा आवाज घरात असताना लहान ठेवण्याचा सल्ला द्या.

स्वत:च्या घरात प्रवेश करायचा, मग हे करा!

प्रत्येक व्यक्तीच्या मनात आपलं स्वत:चं घर असाव, अशी इच्छा नेहमीच असते. आम्ही तुम्हाला काही उपाय सांगत आहोत ज्यामुळे तुम्ही भाड्यांच्या घरातून आपल्या स्वत:च्या घरात पाऊल टाकू शकता.

पाहुयात काय आहेत हे उपाय...

सर्वात महत्त्वाचे म्हणजे घरातील जड वस्तू किंवा अनावश्यक सामान घरातील दक्षिण-पश्चिम भागामध्ये ठेवावे. इतर ठिकाणी जड सामान किंवा वस्तू ठेवणे वास्तुशास्त्रानुसार अशुभ मानले जाते.

❒ घरातील उत्तर-पूर्व भाग नेहमी रिकामा ठेवावा. या ठिकाणी सामान ठेऊन घरात अडगळ निर्माण करू नये. त्यामुळे आर्थिक अडचणी नेहमी सतावत राहतील.

❒ जुन्या घरात वास्तूदोष आहे का ? हे तपासून घ्या. भाड्याच्या घरातील वास्तूदोष तुम्ही सुधारू शकणार नाही मात्र नवीन भाड्याचं घर नक्कीच शोधू शकता.

❒ बाथरूम किंवा स्वयंपाकघरातील पाण्याचा नळ उत्तर-पूर्व दिशेकडून घ्या. त्याचबरोबर बाथरूम, स्वयंपाकघर, इतर ठिकाणी असलेल्या नळातून पाणी टपकनार नाही याची काळजी घ्यावी.

❒ बेडरूममध्ये पलंगाचे डोके दक्षिण दिशेकडे असावे.

❒ झोपताना तुमचे डोके दक्षिणेकडे आणि पाय उत्तर दिशेला असावेत. हे शक्य नसेल तर पश्चिम दिशेला डोके करून झोपावे. अशाप्रकारे झोपल्यास विविध आजारांपासून बचाव होईल.

❒ जेवताना तुमचे तोंड पूर्व दिशेला असावे. हा उपाय केल्यास जेवणाची पूर्ण शक्ती प्राप्त होते आणि वास्तुदोष नष्ट होतो.

नियमित चाला, स्मरणशक्ती वाढवा

वृद्धासांठी एक खुशखबर आहे. ज्या वृद्धांना विस्मृती किंवा स्मृतीभ्रंषाचा आजार आहे, त्यांना आपल्या आजारावर मात करण्यासाठी एक चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे. तो पर्याय म्हणजे नियमित चालणे. नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनानुसार नियमित चालण्यामुळे वयोवृद्ध व्यक्तींची स्मरणशक्ती टिकून राहण्यास मदत झाल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. रहिवासी भागाचा परिणाम माणसाच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करत असल्याचा निष्कर्षही कंन्सास विद्यापीठाच्या या संशोधनावरून होत असल्याचंही समोर आलं आहे. संशोधकांच्या मते, चालण्यामुळे परिसरातील भौगोलिक माहिती आणि नकाशा डोक्यात फिक्स होते. त्यामुळे व्यक्तीला आपल्याला हवे असलेले ठिकाण किती अंतरावर आहे याचा अंदाज येतो. बऱ्याचदा व्यायामाला वेळ मिळत नसल्याची तक्रार अनेक जण करतात. मात्र व्यायामाऐवजी चालणे हा त्यावरचा एक उत्तम उपाय आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते दीर्घकाळ आरोग्य चांगले राखण्यासाठी चालणे हाच सर्वोत्तम व्यायाम आहे. नियमित चालण्यामुळे तुमच्या अवयवांचा व्यायाम होतो. चालण्यामुळे शरीर मजबूत होण्यासाठी मदत तर होतेच शिवाय मनावरील तणाव कमी करण्यासाठीही याचा चांगला फायदा होतो. त्यामुळे ज्यांची स्मरणशक्ती कमी झाली आहे किंवा ज्यांना आपली स्मरणशक्ती आहे, तशी राखायची असल्यास आजपासूनच चालायला सुरूवात करायला हरकत नाही.

नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील अनुकंपा शालार्थ आयडी, भ्रष्टाचार प्रकरणात कार्यवाही करा

खाजगी शिक्षक संघाचे आंदोलन

महासागर प्रतिनिधी
वाडी,दि. १६ ऑक्टोबर : नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील शालेय विभागातील भ्रष्टाचार प्रकरणे वाढत असुन सुरकर विद्यालय, कवठीचे शिपाई शहिद पाटील, शिपाई गीताबाई अर्जुनकर यांना शालार्थ आयडी प्रदान करण्यात आल्या नाहीत. शासन परिपत्रक, माहिती अधिकार खाजगी अनुदानित शाळेत सद्यस्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा, लहान कुटुंबाचे नियम-२००५ लागू नसल्याचे लिखित असुन याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे,लिपिक सेवक आशुतोष गाजेवार व स्वामी विवेकानंद विद्यालय मुलच्या शिपाई सेवक जयश्री करकाडे यांच्या शालार्थ आयडी प्रकरणे त्रुटीची पूर्तता करण्यात आली आहे तरी अजूनही शालार्थ आयडी मिळाली नाही. अनुकंपा नियुक्ती गायत्री सुधिर मेटांगळे,अक्षय पब्बेवार, सत्यजित डंभारे, शालार्थ आयडी प्रदान करणे, अनुकंपा नियुक्ती प्रांजल देशमुख लिपिक सेवक स्वर्गीय प्रदीप सितरामजी देशमुख, लिपिक मातोश्री लक्ष्मीबाई मुडे उच्च प्राथमिक शाळा, महात्मा गांधी नगर,हुडकेश्वर रोड, नागपूर शुंभम विजय हेडाऊ शिक्षण सेवक अनुकंपा नियुक्ती प्रागतिक प्राथमिक विद्यालय विदयुत विहार कोराडी शालार्थ आयडी प्रदान करण्यात आली नाही,राधिका रामेश्वर खंते, अनुकंपा नियुक्ती शिक्षण सेवक,शांती विद्या भवन कन्या विद्यालय, डिगडोह,तुषार अशोक निवल, विज्ञान परिचर, इंदिरा गांधी हायस्कूल,जुना सुभेदार, नागपूर, दिनांक १३ सप्टेंबर २०२४ ला शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करण्यात आले आहे, संघर्ष गौतम बनकर लिपिक सेवक स्वर्गीय बळीरामजी देवताळे हायस्कूल आष्टा तहसील,जिल्हा नागपूर,रेखा देविदास ठोंबरे शाळा स्व. भगवानजी नारनवरे विदयालय भगवानपुर, पं स.भिवापूर यांच्या शालार्थ आयडी बाबतवरिल प्रकरणातील काही प्रकरणे अनेक दिवसांपासून शिक्षण उपसंचालक नागपूर कार्यालयात प्रलंबित आहे, आजच्या आंदोलन याचा आढावा घेण्यात आला. निकिता ठाकरे,उपशिक्षणाधिकारी यांचेकडे अधिक्षक वेतन पथक माध्यमिक चंद्रपूर पदांचा कार्यभार असतांना लोकमान्य विद्यालय, वरोरा येथील नियमबाह्य शिक्षकेतर कर्मचारी मान्यता यांचे वेतन अदा करण्यात आले, याबाबत चौकशी व कार्यवाही करणे,दिव्यांग उमेदवार उपलब्ध असतांनाही इतर प्रवर्गातील उमेदवारास चांदा शिक्षण प्रसारक मंडळातील शाळेत उपमुख्याध्यापक / मुख्याध्यापक म्हणून मान्यता प्रदान करण्यात आल्या बाबत तपासणी करून कार्यवाही करणे, दिव्यांग उमेदवार पदोन्नती बाबतीत शिक्षण विभाग नागपूर धारणा पक्की करणे,शिक्षण व आरोग्य विभागाच्या निर्देशनातून कोरोना-२०१९ सर्वेक्षणात मयत पावलेल्या कोरोना योद्धा सानुगृह अनुदान ५० लक्ष रुपये मिळालेले नाही. नागपूर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मयत शिक्षक संजय कृपाल ,वाडी, माध्यमिक विभाग नागपूर मयत रामदास काकडे (हिंगणा) तसेच माध्यमिक विभाग जिल्हा गडचिरोली मयत दीपक सोमनकर,बोमनवार हायस्कूल चामोर्शी जिल्हा गडचिरोली यांच्या वारसांना अनुग्रह अनुदान मिळणे,शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

अनिल भुरे, पर्यवेक्षक तथा प्रभारी मुख्याध्यापक, साईनाथ विद्यालय, प्रगती नगर, नागपूर, शाळा न्यायाधिकरण यांचे निर्णय अनिल भुरे यांचे बाजुला असतांनाही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागपूर यांनी चुकीच्या पद्धतीने रजनी मानकर यांना स्वाक्षरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे, मानकर यांना दिलेले स्वाक्षरी अधिकार रद्द करण्याचे निर्देश शिक्षणाधिकारी माध्यमिक यांना देणे. शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करण्यात आलेले अपिल विचारात घेण्यात यावे अशी मागणी आंदोलनात सहभागी शिक्षकांनी कली आहे

आंदोलनात माजी आमदार नागोराव गाणार, प्रमोद रेवतकर, ज्ञानेश्वर वाघ, मोरेश्वर मौदेकर, लोकपाल चापले, सिद्धार्थ कांबळे, तेजराज राजुरकर,मोहन परसोडकर, दिलीप निखाडे,रहमत्तुलाह खान, ज्ञानेश्वर घंगारे, वसंतराव थाटे,तेजराम बांगडकर, रेखा ठोंबरे, मनिषा गाजेवार, जयश्री करकाडे, भिमराव वानखेडे, पितांबर गायधने,सदाराम कुर्वे, उर्गसेन देऊळकर इत्यादी शिक्षक व अनुकंपा ग्रस्त उपस्थित होते.

दिवाळीपूर्वी मंदिर स्वच्छता, दिवाळीला मंदिरावर रोषणाई आणि भगव्या ध्वजाचे विविध समाजाच्या तरुण जोडप्यांतर्फे पूजन

विश्व हिंदू परिषदेचा त्रिसूत्री कार्यक्रम

महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १६ ऑक्टोबर : दिवाळीपूर्वी मंदिर स्वच्छता दिवाळीला मंदिरांवर रोषणाई, मंदिरावर भगवा ध्वज उभारणे/ बदलणे आणि विविध समाजाच्या तरुण जोडप्यांच्या हस्ते ध्वज पूजन, असा त्रिसूत्री कार्यक्रम विश्व हिंदू परिषदेने यंदा महाराष्ट्रात आणि गोव्यामध्ये मंदिरांना आणि मंदिराशी संबंधित सर्वांना दिला आहे.

विश्व हिंदू परिषद यंदा महाराष्ट्र-गोवा राज्यात किमान ५००० मंदिरात गाभारा ते अंगण, स्वच्छता सेवा अभियान राबविणार आहे. यंदा रविवार २० ऑक्टोबरला सकाळी ७ते ११ या चार तासात हे अभियान सर्व दूर राबविले जाणार आहे. माझे मंदिर, माझे जबाबदारी!

सौगंध राम की खाते है हम मंदिर स्वच्छ बनायेंगे!, स्वच्छ राहील मंदिर, प्रसन्न होईल ईश्वर!, अशी विविध उत्तमोत्तम घोषवाक्ये यासाठी भाविकांनी तयार केली आहेत. भाविकांनी स्वच्छता सेवा देण्यासाठी नावे नोंदवावी यासाठी अनेक मंदिरांमध्ये मंदिराच्या बाहेर फलक लावण्याची योजना केली आहे.

भाविक, भक्त यांची भूमिका फक्त मंदिरात जाऊन दर्शन करणे आणि प्रसाद घेणे, महाप्रसादात सहभागी होणे, याच्या पुरती मर्यादित राहू नये तर मंदिराच्या एकूणच व्यवस्थेमध्ये भाविकांनी आपली करसेवा द्यावी. त्यांनी स्वतःला मंदिराच्या रचनेमध्ये जोडावे, यासाठी हे अभियान आहे.

गाभारा ते अंगण, हा मंदिर स्वच्छता सेवेचा उपक्रम बिन खर्चिक असून सेवाभाव जागवणारा आहे. प्रत्येक मंदिर हे तितकेच स्वच्छ, सुंदर ,आल्हाददायी, रमणीय व पवित्र असले पाहिजे, ही हिंदू संस्कृतीची मान्यता आणि विश्व हिंदू परिषदेचे भूमिका आहे. आणि यासाठी हे महा अभियान आहे. मंदिर विश्वस्त, मंदिरातील पुजारी, पुरोहित वर्ग, भक्त भाविक ,सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणात रूची असणारी मंडळीही यात जोडली जात आहेत.

जनता हायस्कूल खैरगावची विद्यार्थिनी जिल्हास्तरीय स्पर्धेत अव्वल

विभागीय स्पर्धसाठी विद्यार्थिनीची निवड

महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. १६ ऑक्टोबर : सेवादल एज्युकेशन सोसायटी मोवाड द्वारा संचालित जनता हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय खैरगाव ता. नरखेड जि. नागपूर येथील विद्यार्थिनी क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुलन नागपूर मानकापूर येथे घेण्यात आले होते सदर स्पर्धेत जनता हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय खैरगाव येथील १४ वर्षे वयोगटातील कुमारी श्रेया संजय गजभिये वर्ग ७ वा या विद्यार्थिनीं थाळीफेक या खेळात विक्रमी १५:८७ मीटर थाळी फेकून प्रथम क्रमांक प्राप्त करत यश संपादन केले. तिची नुकत्याच होणाऱ्या विभागीय स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल चंद्रपूर येथे निवड करण्यात आली. सेवादल एज्युकेशन सोसायटीचे सचिव तथा जनता हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय खैरगावचे प्राचार्य अनिल साठोणे , पर्यवेक्षिका सौ सुषमा साठोणे ,क्रीडा मार्गदर्शक मंथन साठोणे, क्रीडा शिक्षक नरेंद्र बालपांडे, तसेच जनता हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय खैरगाव येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक व अभिनंदन करून पुढील आगामी स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

मतिमंद मुलांना शालेय सामग्री वितरित करुन धम्मचक्र प्रवर्तन दिवस उत्साहात साजरा

शारदा बहुउद्देशीय महिला मंडल संस्थेचा शाळेला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट

महासागर प्रतिनिधी
कन्हान,दि. १६ ऑक्टोबर : कन्हान हॉकर्स युनियन।, कन्हान कृती समिति व प्रशांत भाऊ मित्र परिवार यांचा संयुक्त विद्यमाने ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिवस निमित्त कार्यक्रमाचे आयोजन शारदा बहुउद्देशीय महिला मंडल संस्था शाळा बोर्डा रोड कांद्री येथे करण्यात आले . कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित प्रशांत वाघमारे , चिराल वैद्य , शाळा प्रमुख सौ.राजश्री रंगारी , सौ.सुषमा रंगारी सह आदि मान्यवरांचा हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रतिमेला पुष्प हार अर्पण आणि दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली . यावेळी सतिश भसारकर , प्रशांत पाटील केतन भिवगडे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले . कार्यक्रमात कन्हान हॉकर्स युनियन , कन्हान कृती समिति व प्रशांत भाऊ मित्र परिवार यांचा द्वारे शारदा बहुउद्देशीय महिला मंडल संस्थेचा शाळेला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या . त्यानंतर शालेय मुलांना नोटबुक , पेन , फळ वाटप करुन धम्मचक्र प्रवर्तन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला .

या प्रसंगी पंजाब वानखेडे , बाबा भाई , प्रफुल्ल आगास , राजेंद्र चौधरी , अमर मोहबे , शैलेश माटे दिनेश ढोके , आनंद वाघमारे , राजा अहिरवार , संजय वानखेडे , सुरज गजभिऐ , बीरेन्द्र सिग , धर्मराज चिखले , चंदमणी गजभिऐ , सचिन नागदिवे , सौरभ वाघमारे , ज्योति मेश्राम सविता दिग्रसकर , सुजाता मेश्राम , अंजना वासनिक , किरण तारसेकर , राजेश भामकर , कैलास आचरकाटे , नंदा कारनाथ सह आदि शाळेचे कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते .

बबलू गायकवाडवर एमपीडीए

नागपूर, क्राईम रिपोर्टर. गत अनेक वर्षांपासून गुन्हेगारीत सक्रीय गुंड विशाल उर्फ बबलू राम गायकवाड (२५) रा. कैकाडीनगर झोपडपट्टी विरुद्ध पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी एमपीडीए लावला आहे. बबलूविरुद्ध बेलतरोडी, सीताबर्डी, वाठोडा, एमआयडीसी, हुडकेश्वर, बुटीबोरी, उमरेड, हिंगणघाट, समुद्रपूर आणि वरोरा येथे खुनाचा प्रयत्न, लैंगिक अत्याचार, लुटपाट, खंडणी वसुली, चोरी, अपहरण, तोडफोड आणि दंगा करण्यासह गंभीर गुन्हे नोंद आहेत.

सन २०१९ आणि २०२१ मध्ये बेलतरोडी पोलिसांनी त्याच्यावर सीआरपीसीच्या कलम ११० अंतर्गत प्रतिबंधक कारवाईही केली होती. त्यानंतरही बबलू गुन्हेगारीत सक्रीय होता. त्याची लगाम कसण्यासाठी बेलतरोडीचे ठाणेदार मुकुंद कवाडे यांनी गुन्हे शाखेमार्फत एमपीडीएचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठवला. पोलिस आयुक्तांनी त्याला एक वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. सध्या त्याला नागपूर कारागृहात ठेवण्यात आले आहे.

मुलांच्या प्रेमासाठी आई वडिलांच्या मनाची घालमेल

महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १६ ऑक्टोबर : परदेशी राहणाऱ्या मुलांच्या प्रेमासाठी आसुसलेले, एकलकोंडे आयुष्य जगणाऱ्या म्हाताऱ्या आईवडिलांची तगमग संध्याछाया या नाटकात कलाकारांनी उत्कृष्टपणे मांडली. प्रसिद्ध नाटककार जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त या नाटकाचे अतिशय सुंदर सादरीकरण सायंटिफिक सभागृहात करण्यात आले. नाटकाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, सरचिटणीस विलास मानेकर, विवेक अलोणी, प्रकाश एदलाबादकर आदी मान्यवर उपस्थित होते.

विदर्भ साहित्य संघ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई द्वारा आयोजित आणि मानिनी बहुउद्देशीय संस्थेतर्फे निर्मित हे नाटक स्थानिक कलाकारांनी उत्कृष्ट साकारले. ७० च्या दशकात अतिशय गाजलेले हे नाटक आजच्या परिस्थितीतही तेवढेच सुसंगत आहे.

रेबीज मुक्त नागपूर अंतर्गत २० हजार ३९२ श्वानांचे लसीकरण

महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. १६ ऑक्टोबर : नागपूर ता : नागपूर महानगरपालिकेच्या मिशन रेबीजच्या सहकार्याने सुरू असलेल्या रेबीज मुक्त नागपूर मोहिमेला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. मगील सप्टेंबर महिन्यात राबविण्यात आलेल्या सामूहिक श्वान लसीकरण मोहिमेअंतर्गत २० हजार ३९२ श्वानांना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली, विशेष म्हणजे, या मोहिमेच्या अवघ्या १५ दिवसांत १५ हजार श्वानांचे मूळ उद्दिष्ट ओलांडून २० हजार ३९२ श्वानांना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली.

या रेबीज मुक्त नागपूर मोहिमेचे यश हे रेबीजचे उच्चाटन आणि निरोगी, सुरक्षित नागपूर घडविण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे,असे प्रतिपादन मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांनी केले असून, मोहिमेच्या यशाबद्दल विभागाचे अभिनंदन केले आहे.

नागपूर महानगरपालिका, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय आणि निर्मिती पीपल्स अँड ॲनिमल वेलफेअर सोसायटी यांच्या एकत्रपणे ही मोहीम राबविण्यात आली. तसेच २८ सप्टेंबर जागतिक रेबीज दिनी मोहिमेला समारोप झाला. लसीकरण मोहिम दोन विभागात राबविण्यात आली. पहिल्या १५ दिवसांत नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील पशुवैद्यकीय विद्यार्थी, श्वान पकडणारे आणि मिशन रेबीज आणि होप अँड ॲनिमल ट्रस्टचे लसीकरण करणारे अशा नऊ पथकांनी अथक परिश्रम घेत १७ हजार ३९२ श्वानांचे लसीकरण केले. या यशानंतर दोन पथकांनी उर्वरित ३००० श्वानांचे लसीकरण करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले आणि आपले ध्येय गाठले, अशी माहिती डब्ल्यू व्ही एस मिशन रेबीजचे विशेष कार्य संचालक डॉ. शशिकांत जाधव यांनी सांगितले.

लसीकरण मोहिमे बरोबरच रेबीज प्रतिबंधात्मक उपाय तसेच पाळीव प्राण्यांचा जबाबदारीने सांभाळ करण्याबाबत स्थानिक समुदायांना शिक्षित करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. मिशन रेबीज शिक्षणाधिकाऱ्यांनी २० शाळांमध्ये जाऊन २,६७३ विद्यार्थी आणि १६४ शिक्षकांना माहिती दिली आणि २७ स्थानिक समुदायांना सहभागी करून घेतले, ज्या मधुन एकूण १,७७९ व्यक्तींनी सहभाग नोंदविला.

सुमित कोठारी मित्र परिवार तर्फे नगरपरिषदच्या शालेय विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप

महासागर प्रतिनिधी
रामटेक ,दि. १६ ऑक्टोबर : नगरपरिषद रामटेक अंतर्गत येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना सुमित कोठारी मित्र परिवार यांच्या कडुन ४०० विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले.यावेळी हटवार प्राथमिक शाळा,स्व.जतीराम बर्वे प्राथमिक शाळा, सदाशिवराव किंमतकर शाळा, सांगोडे प्राथमिक शाळा, मठकर शाळा तसेच रामटेक मधील सर्व नगरपरिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ४०० स्वेटर वाटप करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्षा नलिनीताई चौधरी , शिवसेना शहर प्रमुख राजेश किंमतकर , माजी नगरसेवक सुमित कोठारी,माजी नगरसेविका सुरेखाताई माकडे , पडोळे ताई , दिनेश माकडे , विष्णू लोखंडे सुनिल हतीठेले , राजेश नानोटे , दिपक मिरुंडवार , शाळेतील समस्त शिक्षकवृंद उपस्थित होते.

जाहिरनामा / सायटेशन नोटीस

कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय कामठी, जि. नागपुर
एम.जे.सी. नं. ८९/२०२४ पे.ता.: १८/११/२०२४
प्रोसेस नं १६२५/२०२४

Applicants : Shri. Rashtrapal S/o Rama @ Ramaji Deshpande, Aged 46 Years, Occu. Labour,
R.o Nr. Yashdhara Boudh Vihar Parsipura Kalamna Road, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur.
2. Smt. Kamla Wd/o Rama @ Ramaji Deshpande, Aged 59 Years, Occu. Household.
R/o 124, Rama Nagar Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur.
----- V/S ----
Non applicant :- NIL

मयतः- **Rama @ Ramaji S/o Sitaram Deshpande,** मयत दि. १८/०१/२०१०, मयत ठिकाण कामठी

सदरहु अर्जदारांनी वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत **Rama @ Ramaji S/o Sitaram Deshpande,** मयत दि. १८/०१/२०१०, याचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांनी दि. १८/११/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळयाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारांना **Rama @ Ramaji S/o Sitaram Deshpande,** मयत दि. १८/०१/२०१०, यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/१०/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

जाहिरनामा

कोर्ट विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी, पारशिवनी यांचे न्यायालय पारशिवनी
रा.मा.क्र. /जन्म, मृत्यु नोंद/२०२४-२५
मौजा-साटक, प.ह.नं. १८
तालुका-पारशिवनी, जि. नागपूर

मौजा-साटक, तह. पारशिवनी, जि. नागपूर येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, श्री. वसंता शामराव येणुरकर, राह. साटक तह. पारशिवनी, जि. नागपूर यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून त्यांची आई कवडाबाई शामराव येणुरकर याच्या मृत्यु दिनांक २६/११/२०२० रोजी, मौजा-साटक, ग्रामपंचायत, साटक येथे मृत्युची नोंद घेण्यात आलेली नाही. ग्रामपंचायत, साटक, ता. पारशिवनी, जि. नागपूर येथे मृत्युची नोंद होण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केले आहे. तरी अर्जदार यांनी त्यांची आई कवडाबाई शामराव येणुरकर हिच्या मृत्युची नोंद करण्याबाबत आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उजर घ्यावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यंत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, पारशिवनी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे, नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आर्ज दिनांक २९/०८/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

कार्यकारी दंडाधिकारी
पारशिवनी

-: जाहिरनामा :-

कोर्ट विद्य. कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालय भिवापूर रोड, भिवापूर जिल्हा नागपूर पिन कोड - ४४१२०१
E-mail ID-tahsilbhiwapur@gmail.com
दुरध्वनी क्रमांक -०७१०६ २३२२४९.
क्र. प्रस्तु-१/तह.भि./कावि /२५/२०२४
दिनांक: २४/०९/२०२४

वाचा :- १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ २. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचे कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र. ३. जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ २०२३ चा २०) च्या खंड १ आणि उपखंड. ४. मा. जिल्हादंडाधिकारी, नागपुर यांचे कडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावि-१५८/२०२३ दिनांक ११/०५/२०२४ अन्वये. ५. मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांचे पत्र क्र. प्रस्तु.४/उविअ/उम/कावि-१५/२०२४. दिनांक ३०/०५/२०२४, अन्वये. ६. अर्जदार श्री. सोमेश्वर नामदेव मेश्राम, राह. भिवापूर तह. भिवापूर जि. नागपूर

ज्याअर्थी अर्जदार श्री. सोमेश्वर नामदेव मेश्राम, राह. भिवापूर तह. भिवापूर जि. नागपूर यांनी त्यांचे स्वतःचे जन्माची नोंद बाबत नगर पंचायत, भिवापूर ता. भिवापूर येथे दप्तरी घेणे करीता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार यांचा जन्म दिनांक १/७/१९६२ रोजी मौजा भिवापूर, तह. भिवापूर, जि. नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३, ४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकाराच्ये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, भिवापूर यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मागाने या जाहीरनामाच्या दिनांका पासून तीस दिवसाचे आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा नायब तहसिलदार, भिवापूर

-: जाहिरनामा :-

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/कावि- /२०२४
दि.:११/१०/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५ /२०२३ ५) विनोद उकंडराव भैसारे वय ५४ वर्ष यांचा अर्ज दिनांक २७/०९/२०२४

ज्याअर्थी अर्जदार विनोद उकंडराव भैसारे वय ५४ वर्ष रा. क्वार्टर नं.७ ट्रूपे ४ ऑफीसर कॉलनी बंगला नं.१०, इंदोर यांनी त्यांच्या पत्नीच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांची पत्नी नामे अश्विनी वसंत कराडे यांचा जन्म दिनांक ०३/०९/१९७६ रोजी भंडार मोहल्ला इंदोरा नागपूर येथे राहत्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकाराच्ये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मागाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

जाहीर सूचना

आम जनतेस सुचित करण्यात येते की माझे पक्षकार श्री. पंकज पुरुषोत्तम ठाकरे हे यांच्या कडून श्री. नंदकिशोर धर्मदास अलोणे व सुनिता नंदकिशोर अलोणे हे दोघेही राहणार - प्लॉट क्रमांक १०२ आरमान रेसिडेन्सी महाल किल्ला रोड नागपूर यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्ता व स्वतःच्या कब्जातील स्वतःच्या मालकीची खालील वर्णाची स्थावर मालमत्ता विकण्याचा करार टोकन बयाना पत्राचा लेख केलेला आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

मौजा नागपूर शिट २२१ न.भु.क्र ४२६/२ अरमान होम ड्रीम्स मधील पहिल्या माळ्यावरील फ्लॅट आहे. वार्ड क्रमांक २६ घर क्रमांक २८४/१०२ याप्रमाणे आहेत. उपरोक्त स्थावर मालमत्तेचे बाबत कोणाचेही कोणत्याही कुठल्याही प्रकारचे विक्री, आदान प्रदान, गहाण, उत्तराधिकार, बक्षीस, ग्रहणाधिकार, गहाण, किंवा भाडेकरू, देखभाल, कब्जा, ताबा, मागणी, हितसंबंध किंवा इतर कुठलेही प्रकारचे आक्षेप अथवा करार असल्यास सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील माझ्या पत्त्यावर कागदपत्रासह लेखी आक्षेपासह संपर्क साधावा. या मुदतनंतर कुणाचाही उजर , आक्षेप मान्य केला जाणार नाही व माझे पक्षकार विक्रीपत्र करून घेतील.

दि. १४-१०-२०२४
ॲड. एस. आर. तिवारी

Change Of Name

MY OLD NAME WAS **MOHD ASHRAF KACHI.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ASHRAF MOHAMMAD ANEES VIRANI.**
ADD : FATEMA COLONY UMARKHED DISTRICT YAVATMAL 445206

MY OLD NAME WAS **RENUKA CHOTHE.** NOW MY NEW NAME IS **RENUKA NANDKISHOR CHOTHE.**
ADD : PLOT NO 159 JAWAHAR HOU SOC. BHAUSAHE SURVEY NAGAR, NAGPUR 440022

MY OLD NAME WAS **SNEHA ADESH SURANA.** NOW MY NEW NAME IS **AARTI ADESH SURANA.**
ADD : P NO. 50 C F . NO. 201 SHRIHARI APT GOKULPETH NAGPUR - 440010

MY OLD NAME WAS **RESHMA PARVIN.** NOW MY NEW NAME IS **RESHMA PARVIN MOHAMMAD ASHRAF VIRANI.**
ADD : FATEMA COLONY UMARKHED DISTRICT YAVATMAL 445206

MY OLD NAME WAS **MD ASHRAF.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ASHRAF VIRANI.**
ADD : FATEMA COLONY UMARKHED DISTRICT YAVATMAL 445206

MY OLD NAME WAS **NASHRAH MOHAMMAD ASHRAF.** NOW MY NEW NAME IS **NASHRAH MOHAMMAD ASHRAF VI

साहेबांचा बॅनर काढण्यास मनपाची कसरत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

मुख्य निवडणूक आयुक्तांनी मंगळवारी दुपारी महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणुकांची घोषणा केली आणि आचारसंहिता लागू झाल्याचेही जाहीर केले. आचारसंहितेची कठोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले.

त्यानंतर लगेचच महापालिका यंत्रणा सजग होत कामाला लागली. शहरातील राजकीय पक्षाचे फलक हटवण्याचे काम हाती घेण्यात आले. कारवाईचा फटका थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या फलकालाच बसला.

नागपूर हे भाजपच्या तीन प्रमुख नेत्यांचे शहर मानले जाते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा समावेश आहे. महायुतीतील सर्वात मोठा घटक पक्ष म्हणून भाजपकडे

बघितले जाते. त्यामुळे सरकारी यंत्रणाना नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितावर कारवाई करताना अनेकदा विचार करावा लागतो.

यातूनच प्रशासनावर अनेकदा आरोपही झाले आहेत. आचारसंहिता लागू झाल्यावर नेहमीप्रमाणे प्रशासनाने राजकीय फलक हटवणे सुरू केले. राजकीय नेत्यांचे छायाचित्र असलेले अनेक सरकारी योजनांचे फलकही काढले जात आहेत. मात्र काही फलक हे सत्ताधारी राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लावलेले आहेत. अशाच प्रकारचा अनेक फलक सिव्हील लाईन्समध्ये लागले होते.

सिव्हील लाईन्समध्येच मुख्यमंत्री निवासस्थान असलेल्या रामगिरी जवळ आणि उपमुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या देवगिरी बंगल्याजवळही लावण्यात आले आहे. यापैकी एक फलक खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा होता. दहा बाय पन्नास फुटाच्या या फलकावर शिंदे पूर्णाकृती छायाचित्र होते. महापालिकेच्या पथकाने हा फलक काढला, तो काढताना त्यांना चांगलीच कसरत करावी लागली.

उपमुख्यमंत्र्यांच्या शहरातून मुख्यमंत्र्यांचे फलक काढले असे संदेश समाजमाध्यमांवर फिरू लागले. याच फलकाप्रमाणे सरकारच्या विविध योजनांवर मंत्र्यांचे फोटो असल्याने तेही काढण्यात आले. अशा प्रकारे आचारसंहितेच्या पहिल्याच दिवशी कारवाईची झळ थेट मुख्यमंत्र्यांच्याच फलकाला बसली.

आचारसंहितेच्या काळात मंत्र्यांवरही अनेक निर्बंध येतात. त्यांना सरकारी वाहने, सरकारी इमारीत विशेषतः विश्रामगृह व तत्सम प्रकारच्या इमारतींचा वापर करता येत नाही. या शिवाय कुठल्याही सरकारी अधिका?यांना बोलवता येत नाही, सरकारी बैठकाही घेता येत नाही, कुठलेही आदेश सुद्धा देता येत नाही. या नियमांचा भंग झाल्यास आचारसंहितेचा भंग ठरतो व त्यानुसार कारवाई केली जाते.

वैदर्भीय लेखकांचे लेखन साहित्य समृद्ध करणारे : प्रा. अविनाश कोल्हे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

विविध वैदर्भीय लेखक जसे वामन कृष्ण चोरघडे, यशवंत मनोहर, कवी ग्रेस यांचे विपुल लेखन हे साहित्य समृद्ध करणारे असल्याचे सांगत आपल्या वाचन प्रवासात याचे भरीव योगदान असल्याचे प्रतिपादन प्रा. अविनाश कोल्हे यांनी केले.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त वि. सा. संघ, जिल्हाधिकारी कार्यालय आणि भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यात विदर्भ, माझ्या मातीतील लेखक आणि माझा वाचन प्रवास या विषयावर मुंबईचे प्रसिद्ध व्याख्याते प्रा. अविनाश कोल्हे यांनी आपल्या अनोख्या शैलीत अभ्यासपूर्ण व्याख्यान केले. त्यावेळी ते बोलत होते.

दरम्यान डॉक्टर कलामांसोबत साहित्यिक नारायण सुर्वेंचा देखील वाढदिवस एकत्रितपणे साजरा व्हावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नारायण सुर्वे यांचे योगदान भरीव असून त्यांचा आठव या माध्यमाने व्हावा असे ते म्हणाले.

त्यांनी पुढे बोलताना संगीतले की आपल्या वाचन प्रवासाची सुरुवात खामगावच्या दस्तुरे लायब्ररी पासून झाली. लायब्ररीचे कामअधिकृत बंद झाले होते तरीही आपण आत बसून पुस्तक वाचण्याचा आनंद घेतल्याचं कोल्हे म्हणले. आपलं पहिलं वाचन इंग्रजी कॉमिक्स असलं तरीही त्यामुळे आपली कल्पनाशक्ती अफाट झाली त्यातून पुढे वर्णभेद आणि वंशभेदाची जाणीव झाली असं ते म्हणाले. प्रत्येक साहित्याला संस्कृतीचा अस्तर असतं त्यामुळे संस्कृती

कळणं महत्त्वाचं हे लक्षात आलं. बायबल वाचण्याचा सल्ला गुरूंनी दिला. इंग्रजी संस्कृतीचा पाया समजायला इंग्रजी साहित्य वाचायला या मुळे अर्थ मिळणार होता.

खामगावच्या शाळेत सातवी मध्ये वाचनाची गोडी लागलीआणि वामन चोरघडे यांची 'सलमा', मुक्तीबोध आणि मनोहर यांचे साहित्य आपल्या वचन प्रवासाला अधिकअधिक समृद्ध करत होते. शब्दांचा वापर, शैली, इत्यादि यातून कळू लागल्याचे ते म्हणाले.

याशिवाय आलं फर्ग्युसन महाविद्यालयातील शिक्षण आणि समांतर वाचन या बद्दल ते बोलले. केशवसुत आणि मनोहर यांच्या बंदतील फरक आपल्याला वाचनाने काळाला असे सांगून त्यांनी अनेक वैदर्भीय लेखक आणि कवींच्या लेखनातील निवडक ओळी आणि संवाद वाचून दाखवले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली देशपांडे यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वि सा संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते होते. यावेळी लेखक अनुवादक प्रफुल्ल शिलेदार , ज्येष्ठ पत्रकार प्रकाश एदलाबादकर यांची उपस्थिती होती.

शस्त्राच्या धाकावर दरोडा चार आरोपी गजाआड

३ पिस्तूल, २ काडतूस व २ चाकू जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

धारदार शस्त्राच्या धाकावर दरोडा घालणा?या आरोपींच्या वाठोडा पोलिसांनी मुसक्या आवळल्या. हिंगणा येथील एका हॉटेलमधून त्यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून तिन पिस्तूल, दोन काडतूस आणि दोन धारदार शस्त्र जप्त केले. न्यायालयाने त्यांना १९ ऑक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

कुणाल हेमने (२७), विशाल उर्फ फल्ली गुप्ता (२२), सुजित घरडे (२३) सर्व रा. वाठोडा आणि बावरी (२९) रा. बुटीबोरी अशी अटकेतील दरोडेखोरांची नावे आहेत. याशिवाय अफसर अंडा हा फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. तो मुळचा वधेर्चा असून गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. कुणालवरही गंभीर स्वरुपाचे ९ गुन्हे आहेत. विशाल हा तीन महिण्यापूर्वीच कारागृहातून बाहेर आला.

चारचाकी वाहनाने आलेल्या आरोपींनी वाठोडा येथील रहिवासी फियार्दी आरीफ खान पठाण (२८) याला घेवून गेले. शस्त्राच्या धाकावर दहा हजार रुपयांची मागणी केली. माहिती मिळताच आरीफचे वडिल आणि पत्नी घटनास्थळी पोहोचले. वडिलांनी गयावया केली. मात्र, आरोपी ऐकण्यास तयार नव्हते. दहा हजार रुपये मिळाले नाही तर खून करण्याची धमकी दिली. ही घटना १२ ऑक्टोबरला वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. आरीफच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला. तक्रार मिळाल्याच्या २४ तासांच्या आत चारही आरोपींच्या मुसक्या आवळल्या. आरोपी गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्याने त्यांचा पोलिसांकडे रेकार्ड होता. पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारे त्यांचा शोध घेतला असता चौघेही हिंगणा येथील एका हॉटेलमध्ये दडून होते. पोलिसांनी सापळा रचून त्यांच्या मुसक्या आवळल्या.

सुपारीतील हिस्सा मागितला

ऋषी खोसला हत्या प्रकरणात आरीफचा समावेश होता. ही घटना २०१९ मध्ये सदर पोलिस ठाण्याअंतर्गत घडली होती. कारागृहात आरोपी कुणाल आणि आरीफ हे दोघेही होते. ऋषी खोसलाची हत्या सुपारी देवून करण्यात आली होती. सुपारीची रक्कम अलिकडेच मिळाली. त्यातील हिस्सा मागण्यासाठी आरोपी कारने आले होते. आरोपींनी कदाचित एक राउंड फायर केला. मात्र, गोळी अडकली. दुसरी गोळी कारमध्ये सिट कव्हरवर मिळाली. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली कार, कारमधून दोन पिस्तूल, एक रिव्हाल्वर, दोन जिवंत काडतूस, दोन चाकू जप्त केले.

श्याम मानव यांच्या कार्यक्रमात भाजपा कार्यकर्त्यांचा गोंधळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने नागपूरमध्येश्याम मानव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्याम मानव यांचे भाषण सुरू होण्यापूर्वीच भाजपा युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी जोरजोरात घोषणाबाजी करत गोंधळ घातला. त्यामुळे काही काळ कार्यक्रम स्थळी तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी हस्तक्षेप करत भाजपाच्या कार्यकर्त्यांना बाहेर काढले.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने नागपूरमध्ये श्याम मानव यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांचे भाषण सुरू होण्यापूर्वी भाजपा युवा मोर्चाच्या कार्यकत्यार्ने व्यासपीठावरील व्यक्तींना प्रश्न विचारला की, २०१४ पासून संविधानात काय बदल झाले? आम्हाला सांगा. त्यानंतर भाजपा युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला.

भाजपा युवा मोर्चाचे कार्यकर्ते म्हणाले, अंधश्रद्धा निर्मूलन समिती संविधानाचा आधार घेऊन जर समाजात भेदभाव करत असेल आणि फडणवीस साहेबाचं नाव घेत असेल, तर हे कुणाचे समर्थक आहेत? यांनी उत्तर द्यावं.

यांनी कुणाचा ठेका घेतला आहे? २०१४ नंतर संविधानात असे कुठले बदल झाले? हे कोणत्या पक्षाचं प्रतिनिधित्व करतात, हे त्यांनी सांगावे, असे सवाल भाजपा कार्यकर्त्यांनी केले. दरम्यान, या गोंधळामुळे कार्यक्रमस्थळी काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.

श्याम मानव काय म्हणाले?

ज्या नागपूरमध्ये वेगवेगळ्या विचारधारेचे लोक एकत्र राहतात. जाहीरपणे एका व्यासपीठावर येऊन मते मांडतात. त्या नागपूरमधूनच संविधान खतम होत आहे, या पद्धतीची परिस्थिती निर्माण होत चालली आहे. मला अशा गोष्टींची नेहमी सवय आहे. माझ्यासाठी नवी गोष्ट नाही, असे श्याम मानव म्हणाले.

दोन ऑटोमध्ये धडक, महिला जखमी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

भरधाव ऑटोच्या चालकाने महिला प्रवासी असलेल्या दुसऱ्या ऑटोला मागून जबर धडक दिली आणि पळून गेला. यात महिला प्रवासी गंभीर जखमी झाली.

ही घटना मानकापूर उड्डाणपुलावर घडली. या प्रकरणी पोलिसांनी जखमी महिला निर्मला दिपनारायण चतुर्वेदी (५०) रा. श्रीकृष्णधाम, सेक्टर क्र. ६, कोराडी रोडच्या तक्रारीवरून आरोपी ऑटो चालकावर गुन्हा नोंदविला आहे.

मंगळवारी सकाळी निर्मला ऑटोत बसून घरी जात होत्या. मानकापूर उड्डाणपुलावरून जात असताना मागून भरधाव आलेल्या ऑटोच्या चालकाने निर्मला बसून असलेल्या ऑटोला जबर धडक दिली आणि पळून गेला.

यात निर्मला यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना त्यांच्या ऑटो चालकाने उपचारार्थ जवळच्या खासगी रुग्णालयात भरती केले. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी ऑटो चालकाचा शोध सुरू केला आहे.

भारतीय मानक ब्युरोतर्फे जागतिक मानक दिन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

भारतीय मानक ब्युरो, नागपूर तर्फे हॉटेल रेडिसन ब्लू, नागपूर येथे जागतिक मानक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन नागपूर मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल सूद गोयल यांनी केले. नागपूर शाखा कार्यालयाचे संचालक श्री हेमंत बी आडे, यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट सादर करीत जागतिक मानक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.

सहसंचालक तपन हलदर, यांनी मानक दिनाचा संदेश आणि थीम पेपर सादर केला. या वर्षीच्या थीमचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले. सहसंचालक निशा कणबर्गी यांनी प्रेक्षकांसोबत गुणवत्तेची प्रतिज्ञा घेत गुणवत्ता आणि दर्जाबाबतची बांधिलकी निश्चित केली.

श्रीमती आंचल सूद गोयल यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ग्राहक जागरूकता आणि संरक्षण क्षेत्रातील बीआयएसच्या प्रयत्नांचे कौतुक केले. उद्योग आणि वैज्ञानिक समुदाय यांच्यात सकारात्मक संवादाच्या गरजेवर भर देत आम्ही शाश्वत भविष्यातील वाढीसाठी चांगले उपाय शोधू शकू, असे त्या म्हणाल्या. प्रमुख वक्ते म्हणून पर्सिस्टंट सिस्टम्स लिमिटेड, नागपूरचे मुख्य आर्किटेक्ट तुषार जोशी, आयआयएम नागपूरचे प्राध्यापक राजीव अग्रवाल, अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, चंद्रपूरच्या महाव्यवस्थापक डॉ. रिना शिंदे, एजीएम डॉ सुरेश पल्ला, युनिट हेड डालमिया सिमेंटचे युनीट हेड सुब्बरायडू अय्यागरी, हिंदाल्को इंडस्ट्रीज लि. मौदाचे विश्वास कांबळे यांच्यासमवेत तांत्रिक सत्र आयोजित करण्यात आले.

बीआयएसच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल बीआयएस, नागपूरतर्फे सुमारे ३० भागधारकांचा सत्कार करण्यात आला. परवानाधारक, प्रयोगशाळा आणि राज्य सरकारी अधिकारी एक्सपोजर भेटी, कॅप्सूल कोर्स आणि इतर मानक प्रोत्साहन याबद्दल उत्कृष्ट संसाधन व्यक्ती आणि मार्गदर्शकींना स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

मानक महोत्सवाचा दुसरा भाग स्टँडर्ड क्लबच्या मार्गदर्शक आणि विद्यार्थी सदस्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. दुसऱ्या सत्रात सुमारे १५० स्पर्धकांनी हजेरी लावली. माणक गीत, नुक्कड नाटक, नृत्य, नाटक आणि थीमवर आधारित स्किट्स असे विविध परफॉर्मन्स अमरावती, जालना, नागपूर, वर्धा, चंद्रपूर येथील शाळांच्या स्टँडर्ड्स क्लब सदस्यांनी सादर केले. स्टँडर्ड क्लबच्या सदस्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांसह बीआयएसने आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनात १२ विज्ञान मॉडेल्सचे प्रदर्शन केले.

सहसंचालक संदेश गोकनवार यांनी आभार प्रदर्शन केले. सर्वांनी गुणवत्ता आणि दर्जाचा संदेश पुढे नेण्याचे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन सहाय्यक विभाग अधिकारी श्रीमती माया पी बोके यांनी केले.

विमानतळावरील हॉटेल झिरो माईलमध्ये आग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

विमानतळावरील हॉटेल झिरो माईलमध्ये अचानक आग लागली. आगीचे डोंब उठताना पाहून परिसरात खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले आणि काही मिनिटातच आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र हॉटेलचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर विमानतळावर झिरो माईल कॅफे नावाने हॉटेल आहे. बुधवारी सायंकाळी 4 वाजताच्या सुमारास अचानक हॉटेलच्या स्वयंपाकखोलीतून धूर निघताना दिसला. पाहता-पाहता आगीचे डोंबही उठू लागले. यावेळी विमानतळ परिसरात प्रवाशांची चांगलीच गर्दी होती.

आगीचे वृत्त पसरताच परिसरात खळबळ उडाली. तत्काळ अग्निशमन विभागाला घटनेची माहिती देण्यात आली. नरेंद्रनगर केंद्रातून लगेच एक बंब घटनास्थळी रवाना झाले. काही मिनिटातच आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. मात्र तोपर्यंत आगीत कॅफेची गॅस भट्टी, २ कपाट, ओव्हन, ग्रिलर, फ्रीज आदी वस्तू जळून राख झाल्या होत्या. नागपूर शहरात आगीच्या घटना सामान्य असल्या तरी अनेक प्रतिष्ठानांकडे अग्नीशमन यंत्रणा उपलब्ध नसल्याचेही समोर आले आहे.

ओबीसी महासंघाद्वारे २२ ला खुलासा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे हे राजस्थान येथे अखिल भारतीय वाणिज्य परिषदेच्या चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी २० ऑक्टोबरपर्यंत उदयपुर येथे आहेत.

ते आल्यानंतर मंगळवार २२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय ओबीसी महासंघाची विशेष पत्रकार परिषद घेऊन माध्यमामध्ये आलेल्या जाहिरातीमुळे संभ्रम निर्माण झाल्याने खुलासा करणार आहेत.

पळवून नेत विद्यार्थिनीशी लग्न

पोलिसांनी अखेर हुडकून काढलेच

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही ऑटो चालकाने तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. पळवून नेत १८ वर्षांची होताच तिच्याशी लग्न केले. अल्पवयीनच्या आईच्या तक्रारीवरून अपहरणाचा गुन्हा नोंदविण्यात आला. अपहरणाची तक्रार असल्याने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने दोघांनाही शोधून काढत एमआयडीसी पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र कितीही विरोध झाला तरी वेगळी होणार नाही, असा ठाम निर्णय तिने घेतला आहे.

मुलीचे बारावीपर्यंत तिचे शिक्षण झाले. आरोपी ऑटोरीक्षा चालवतो. काही वषार्पूर्वी आई तिला घेवून नागपूरात राहायला आली. आई तिला ऑटोरीक्षाने शाळेत पाठवायची. मात्र, ऑटोचालकाची नजर फिरली. ती अल्पवयीन असल्याचा फायदा घेत त्याने तिला जाळ्यात ओढले. १८ वर्ष व्हायला केवळ दहा दिवस शिल्लक असताना त्याने तिला पळविले.

तिला घेवून गोंदियाला आजोबाच्या घरी गेला. इकडे आईने पोलिस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणाचा समांतर तपास गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथक करीत होता. पोलिसांनी लोकेशन मिळविले असता आधी गोंदिया नंतर नागपूर मिळाले. पोलिसांनी परिसरात शोध घेतला असता दोघेही घरीच मिळून आले. पथकाने दोघांनाही ताब्यात घेवून एमआयडीसी पोलिसांच्या स्वाधीन केले. परंतु, काहीही झाले तरी त्याला सोडणार नाही, असा ठाम निर्णय या मुलीने घेतल्याने पेंच निर्माण झाला आहे.

प्रेमासाठी महिलेने पतीला सोडले.. प्रियकरानेही दगा दिला!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

तीन मुलांची आई असलेली महिला एका युवकाच्या प्रेमात पडली. तिने प्रेमासाठी पती व एका मुलाचा त्याग केला आणि प्रियकराच्या घरी राहायला आली. दोन महिन्यांतच प्रियकराने घर सोडून पलायन केले. त्यामुळे एकाकी पडलेल्या महिलेने पोलिसांत तक्रार केली. पोलिसांनी महिलेच्या प्रियकराविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला. चेतन बावनकर (४०) असे आरोपी प्रियकराचे नाव आहे.

पीडित २६ वर्षीय विवाहित महिला वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका वस्तीत राहते. तिला तीन मुले असून पतीला दारुचे व्यसन आहे. तो बेरोजगार असून मिळेल तेव्हाच काम करतो. घरात आर्थिक चणचण असल्यामुळे तिने स्वतः घराबाहेर पडण्याचे ठरवले. ती गेल्या काही महिन्यांपासून एका कपड्याच्या मोठ्या दुकानात सेल्सगर्ल म्हणून काम करते.

तिची बहिण वाठोड्यातील एका वस्तीत राहते. तिच्या घरी पाहुणी म्हणून उन्हाळ्यात ती आली होती. त्यावेळी बहिणीच्या नात्यातील युवक चेतन बावणकर याच्याशी ओळख झाली. चेतनचे लग्न झाले होते. परंतु, काही महिन्यांतच पत्नीने त्याच्याकडून घटस्फोट घेतला होता. तर त्याच्या आईवडिलाचे कोरोनामध्ये निधन झाले.

तो एकटाच राहत होता आणि एका स्विमिंग क्लासेसवर प्रशिक्षक म्हणून कामाला होता. दोघांची ओळख झाल्यानंतर एकमेकांचे मोबाईल क्रमांक घेतले. त्यानंतर दोघेही संपर्कात राहायला लागले. यादरम्यान, दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. संजना वारंवार चेतनला भेटायला घरी यायला लागली. दोघांचे एकमेकांच्या सहमतीने शारीरिक संबंध प्रस्थापित झाले. तेव्हापासून संजनाचे स्वतःच्या संसाराकडे दुर्लक्ष झाले.

पतीला सोडल्यानंतर लग्न

चेतन आणि या महिलेच्या अनैतिक संबंधाची नातेवाईकांमध्ये चर्चा होती. त्यामुळे तिने त्याच्यापासून दुरावा ठेवण्याचे ठरविले. मात्र, चेतनने तिला दिवाळीत लग्न करु, असे आमिष दाखवले. त्यासाठी पतीला सोडण्याची अट ठेवली. तिने भविष्याचा विचार करता एका मुलाला पतीकडे सोडले आणि दोन मुलांना घेऊन थेट प्रियकर चेतनच्या घरी राहायला आली. ऑगस्ट महिन्यापासून दोघेही पती-पत्नीप्रमाणे राहायला लागले. दोघांचेही संबंध सुरळीत होते.

प्रियकराने काढला पळ

काही दिवसांपूर्वी तिने लग्नाचा तगादा लावल्याने चेतन त्रस्त झाला. समाजात बदनामी होऊ नये म्हणून मंदिरात जाऊन लग्न करण्याचा पर्याय तिने सूचवला. मात्र, चेतनने लग्नासाठी चक्क नकार दिला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी चेतनने घरातून पलायन केले. त्यामुळे तिने लगेच वाठोडा पोलीस ठाणे गाठले. ठाणेदार हरिषकुमार बोराडे यांना घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांनी संजनाच्या तक्रारीवरुन बलात्काराचा गुन्हा दाखल केला. आरोपी चेतनचा शोध सुरु आहे.

वीज कर्मचाऱ्यांकडून दिक्षाभूमिवर माहिती पुस्तिका वितरण व भोजनदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनी कर्मचारी, अधिकारी आणि अभियंते यांच्या वतीने दिक्षाभुमीवर आलेल्या अनुयायांसाठी भोजनदान आणि बाबासाहेब यांची माझी आत्मकथा हे पुस्तक तसेच महावितरणच्या विविध योजनांची माहिती असलेली उपयुक्त पुस्तिका भेट म्हणून वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटक महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी महावितरणच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचाव्यात म्हणून माहिती पुस्तिका वितरण करण्यात येत असल्याचे सांगितले. जनतेच्या वीजेसंबधी तक्रारी समजून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी सदर उपक्रम भोजनदान व पुस्तक वितरण समितीने सुरु केला, या उपक्रमात सर्व कर्मचारी अधिकारी अभियंते यांनी सक्रिय सहभाग घेतला त्याबद्दल सर्वांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि अकोला परिमंडलाचे मुख्य अभियंता सुहास रंगारी यांनी मार्गदर्शन करतांना

भोजनदाना पेक्षा दिक्षाभुमीवरुन बाबासाहेबांचे विचारांचे आदानप्रदान होणे तसेच पुस्तकांचे माध्यमातून ज्ञानभुक भागवणे हाच उद्देश असल्याचे सांगितले. तर प्रमुख पाहुणे महापारेषणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सतीश अणे, चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता हरिष गजबे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला नागपुर ग्रामीण परिमंडलाचे अधीक्षक अभियंता राजेश नाईक, निवृत्त अधिक्षक अभियंता गाणार, उमेश शहारे साहेब, सम्राट वाघमारे, धोंगडे, महानिर्मितीचे विंचुरकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मधुकर सुरवाडे यांनी तर आभारप्रदर्शन भैय्या रेवतकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभियंता कुणाल पाटील, प्रफुल्ल मेश्राम, भिमराव सोमकुंवर, नरेंद्र तिजारे, प्रमोद मेश्राम, अविनाश अंबादे, रणजित पानतावणे, शेंडे, वीरेंद्र मेश्राम, हेमंत सोळंकेसर, श्रीरंग मुत्तेपवार, सोनू बारसागडे, रमेश वाटकर, प्रकाश निकम, राजेश पोफळी,पांडुरंग कुकडे, लक्ष्मण वैरागडे, सुशांत श्रृगारे, अविनाश पाटील, चंद्रशेखर तिजारे, पिरुसिंग राठोड, मनोज मेश्राम, रामेश्वर भगत, मुकेश वानखडे, संजय भिष्णुरकर,प्रदिप नारनवरे, प्रकाश लोखंडे, प्रफुल्ल शंभरकर,गणेश शंभलकर, विनोद कोवे, संतोष हिरुळकर, महेंद्र पाचघरे, रवी दुरटकर, आशिष सोमकुवर, मंगला भांगे, सुमीत रेवतकर, गणपती सुरजागडे यांनी परिश्रम घेतले.